
# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे



खंड ४२

शांतीपर्व

# महाभारत

## महाभारत खंड बेचाळीसावा

## शांती पर्व भाग सातवा

## मोक्ष धर्म पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जुलै २०२१**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा बेचाळीसावा खंड, शांती पर्व, भाग सातवा, मोक्ष धर्म पर्व, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये शुद्ध अध्यात्म विद्या सांगितली आहे. ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.

शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुप कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू

समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत

त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

## - शांती पर्व भाग सातवा –

## मोक्ष धर्म पर्व

## भाग एक्याऐंशीवा

व्यास सांगतात, कल्पना कर अरे शुका, समज एक विलक्षण वृक्ष आहे त्याचे नांव आहे वासना. तो माणसाच्या ह्रदयात आहे, त्याच्या फळात दोषाची बीजं आहेत, त्याशिवाय क्रोध, गर्व त्याच्या खोडात आहेत, त्याच्या मुळांत अज्ञान व इच्छा आहेत, त्याशिवाय बेशिस्त त्याच्या मुळात आहे, त्या वासनामय वृक्षाची पानं द्वेष मत्सराची आहेत, त्यातून त्या वृक्षाला जोर मिळत असतो, चिंता आणि चुकीचे निर्णय हे त्याच्या फांद्यात आहेत. त्याच्या पानांत दुःख आणि क्षणभंगूर आनंद आहे. अशा वृक्षाकडे मोठ्या आशेने लोभी माणसें पहात आहेत. ते मूर्ख लोक त्या वृक्षाला जोपासत असतात जो त्याचे खरे सुख नष्ट करत असतो. चतूर मनुष्य योगाच्या अभ्यासाने त्या वीषवृक्षाची मुळं, फांद्या आणि खोड छाटून टाकण्याचा प्रयत्न करत असतो. त्या वृक्षाच्या अभिलाषेने जे त्यांचे जीवन जगतात ते जन्म मरणाच्या भोवर्यात कायमचे अडकत असतात. त्याचा नाश तो योगी करत असतो. त्या वासनेच्या वृक्षाचा नाश झाला कीं, तो योगी त्याचे जीवन शांतपणे व्यतीत करत असतो.

दुसरी कल्पना ऐक, समज आपले शरीर एक नगरी आहे, त्याची मालकीण मन त्या नगरात रहाते. त्याच्या निर्णया प्रमाणे त्या नगरीचा कारभार चालतो. शरीराचे ज्ञानेंद्रिये म्हणजे त्या नगराचे रहिवाशी, मनाच्या सांगण्या बरहुकूम काम करत आहेत, त्या ज्ञानेंद्रियांना संतुष्ट ठेवण्यासाठी मन कित्येक गोष्टी करत असते. त्यामुळे दोन दोष त्यात उत्पन्न होतात. ते दोष आहेत रजो आणि तमो गुण. त्या दोषपूर्ण कामावर त्या नगरातील सगळे अवलंबून आहेत. त्या नगरात मना बरोबर बुद्धी आणि सत्प्रवृत्ती जी आत्म्याची आहे, रहात आहेत. त्याना सगळ्यांना त्या दोषांचा उपद्रव होत असतो. त्यामधील बुद्धी त्या दोषांना दाद देत नाही. त्यामुळें ज्ञानेंद्रियांत असंतोष उत्पन्न होतो. शरीराचा (त्या नगराचा) तोल जातो. जे कांहीं बुद्धी चांगले करण्याचा प्रयत्न करते त्यामुळें उलट दुःख उत्पन्न होते. त्यानंतर मन पुन्हा त्या सगळ्या वासना गोळा करते.

मनाला त्यांबद्दल कांहीं निर्णय घेता येत नाहीत कारण ते काम बुद्धीचे असते. परंतु, रजोगुणात अडकलेले त्यातून फक्त दुःख मिळवत असतात. त्यामध्ये मन प्रथम रजोगुणाला जवळ करते कारण तो अधिक सोयिस्कर वाटतो. त्यामुळे ती शरीररुपी नगरी रजोगुणाच्या ताब्यात जाते.

मोक्ष धर्म पर्व भाग एक्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग ब्यांऐंशीवा

भिष्म पुढे सांगतात, व्यास पुढे पंचमहाभूतांच्या गुणांची माहिती सांगतात, त्यात पृथ्वीचे सांगतात, स्थैर्य, भार, घट्टपणा, सर्जनता, गंध, घनता, गंधशोषकता, संघटीत रहाणे, जीवांना रहण्यासाठी योग्य. मनाचे गुण ते सांगतात, धैर्य, सहनशिलता, पाण्याचे गुण ते सांगतात, थंडावा, रुची, ओलसरपणा, वहाणे याचा गुण (प्रवाहशिलता), मृदू, सहनशिल, थिजण्याची प्रवृत्ती, तसेच द्रवीभूत होण्याचा गुण, अग्नीचे गुण ते सांगतात, शक्ती, ज्वलनशिलता, उष्णता, रोगटपणा, दुःखदायक, वेग, भडका, वर जाण्याची प्रवृत्ती, वायूचे गुण ते सांगतात, स्पर्श, थंडावा, ध्वनी, स्वैरता, उर्जा, अदृष्यता, उलटण्याची क्षमता, प्राण, चिंत्, जन्म मृत्यू देण्याची क्षमता, आकाशाचे गुण ते सांगतात, ध्वनी, व्यापण्याची क्षमता, अव्यक्तता, स्वरुप बदलण्याची क्षमता, विरोध करण्याची क्षमता नसणे, प्राण्यांच्या शरीरात पोकळ्या असणे, ध्वनीला मदत करणे, अशा एकंदर मिळून पन्नास गुणांची यादी ते सांगतात.

मनाचे गुण ते सांगतात ते असे, धिरोदात्तता, विचार करणे, वाद करणे अथवा मतभेद करणे, स्मरण, विसरभोळेपणा, कल्पना करणे, चिकाटी, चांगले-वाईट समजणे, अस्वस्थता.

बुद्धीचे गुण ते सांगतात, चांगले-वाईट विचार तपासणे, सुशुप्ती, चिकाटी, सुक्ष्म विचार करण्याची क्षमता, निर्णय घेण्याची क्षमता, पुरावे तपासणे, योग्य अयोग्य ठरवणे, पुरावे देणे व तपासणे. युधिष्ठीर विचारतो, "बुद्धीला पांच गुण कसे समजले जातात? पांच इंद्रियांना गुण कसे समजले जाते? मला समजत नाही त्याकरता ते स्पष्ट करा. माझा गोंधळ झाला आहे".

भिष्म सांगतात, "तसे पाहिले तर बुद्धीचे साठ गुण आहेत असे समजले जाते. जे पांच महाभूत आहेत त्याना सुद्धा एकाप्रकारे गुणच समजले आहेत वेदांनी. त्याबद्दल मतभेद आहेत पण त्याची कोणी चर्चा करत नाही. कारण असे समजले जाते कीं, ते त्या

मनसने योजले आहे,  त्यामुळे त्यावर कोणी वाद घालत नाहीत.  तरी ब्रह्माचे ते विवेचन आहे त्यांमुळे त्यावर चर्चा नको.  त्याच्या अभ्यासाने चिरंतन शांतता मिळते ते महत्वाचे समजा.

मोक्ष धर्म पर्व भाग ब्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

# भाग त्र्याऐंशीवा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "युद्धात जे राजे धारातीर्थी झोपले आहेत, त्यांना पुनर्जन्म मिळणार नाही ते फार मोठे सामर्थ्यवान होते. त्यांच्याबद्दल मला खेद वाटतो. त्यांचा नाश तितक्याच सामर्थ्याचे माझे योद्धे करतात. ते सगळे चांगले सूज्ञ होते. ते आता मातीत पडलेले आहेत. ते सगळे मेलेले आहेत ऐवढेच मी बोलू शकतो आता. त्या सगळ्या प्रकारामुळे माझ्या मनात कांहीं शंका उत्पन्न झाल्या आहेत. ते असे कीं, चेतना म्हणजे नेमके काय व कशी रहाते व मृत्यू म्हणजे अचेतन कसे होते आपले शरीर. मरते म्हणजे कोण मरते ते सांगा. शरीर मरते कां सुक्ष्म देह मरतो ते सांगा. मृत्यू कशात व कसा असतो"? अहो पितामहा मला ते समजावून द्या, आपण सर्वज्ञ अहात.
भिष्म सांगतात, "ते समजण्यासाठी मी तुला एक प्राचीन कथा सांगतो, प्राचीन काळी कृतयुगात एक राजा रहात होता. त्याचे नांव होते अनुकंपक. त्याच्या शत्रूंनी त्याचे सगळे सैन्य ज्यात अनेक घोडे, हत्ती, रथ होते ते मारून टाकले. त्याच्यावर त्याच्या शत्रूंचा कब्जा आला. त्याचा एक मुलगा होता, त्याचे नांव होते हरी. तो नारायणासारखा महान होता. त्याचासुद्धा मृत्यू त्या लढाईत झाला होता. त्यामुळें व राज्य गेल्यामुळे अनुकंपक वैराग्य धारण करतो. त्या अवस्थेत भटकत असतांना तो नारदाला भेटतो. राजा जे घडले ते सगळे त्यांना सांगतो. त्याच्या मुलाचा वध झाला व तो स्वतः कसा कैद झाला तो वृतांत्त तो नारदाला सांगतो. नारद त्याच्या तपस्येच्या सामर्थ्याने त्याला शांत करण्यासाठी एक कथा सांगतो.
नारद सांगतात, एक हे जे मी तुला सांगत आहे. ते मला कोणी सांगितले आहे तेंच मी तुला सांगत आहे. ब्रह्मदेव सृष्टीच्या निर्मितीच्या वेळी अनेक जीव तयार करतो. ते वाढत जातात. त्यातील कोणी मरत नाही. त्यामुळें जगातील त्यांची संख्या बेसुमार झाली. सगळी तीनही जग भरून गेली. त्यांना श्वास घेणे अशक्य झाले. त्यांची संख्या कशी कमी करावयाची ह्या विचारात ब्रह्मदेव होते. त्यांचा नाश कसा करावयाचा असा त्याला प्रश्न पडला. त्या करणांने त्याला क्रोध झाला. त्यातून अग्नी उत्पन्न झाला. त्या

अग्नीने जगाला आग लागली व सगळे जळून गेले. त्या ब्रह्माच्या क्रोधामुळे सगळे चराचर मारले गेले. ते पाहून स्थानू जो सगळ्या पापशक्तिचा नाश करतो फार कष्टी होतो. तो ब्रह्माला शांत करण्यासाठी बोलतो कीं, "मी तुला आशिर्वाद देण्यासाठी आलो आहे, बोल तुला काय पाहिजे"?

मोक्ष धर्म पर्व भाग त्र्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग चौर्याऐंशीवा

स्थानू बोलतो, "तू निर्माण केलेल्या जीवांच्या साठी मी तुला मदत करण्या करता आलो आहे. तुझ्या रागातून जो अग्नी तयार झाला तो सगळे जग जाळत आहे. त्यात ते जीव जळत आहेत त्यांच्याबद्दल मला अनुकंपा आहे. त्यांच्यावर असे रागावणे उचित नाही".

ब्रह्मदेव त्याला उत्तर देतो, "मी त्यांच्यावर रागावलेला नाही. तसेंच त्यांना मारून टाकण्याची माझी मनिषासुद्धा नाही. पृथ्वी त्या प्राण्यांच्या भाराने व्यथित झाली आहे. ती मला सांगते कीं, ह्यांचे कांहींतरी करा. पृथ्वी त्या भाराने पाण्याखाली बुडत आहे. त्या वाढलेल्या जनसंख्यावर विचार करत असतांना मला अचानक राग आला व हे झाले".

स्थानू बोलतात, "असा रागवत जाऊ नकोस. त्याना अशारितीने नष्ट करू नकोस. त्यामुळें आपला उद्देश साध्य होणारा नाही. ते जर अशारितीने मेले तर परत येणार नाहीत. म्हणून तुझ्या क्रोधाची शक्ती तुझ्या दुसर्या ताकदीने नियंत्रित करण्याचा प्रयत्न कर. सगळ्या प्राणिमात्रांबद्दल अनुकंपा तुझ्यात येऊ दे. तू माझी नेमणूक केली आहेस जागृती करण्यासाठी म्हणून त्यांना जीवंत राहू दे. तसे केलेस तर ते जरी मेले तरी पुन्हा जन्म घेऊन येतील अशी व्यवस्था कर.

*त्या कृतयुगाच्या आधीच्या काळापर्यंत जीवांना एकच जन्म असे व ते मेले कीं पुनः जन्मत नसत, परंतु, ह्या कथेनुसार एका जन्माचे अनेक तुकडे झाले व ते प्राणी एका तुकड्याच्या आयुष्या नंतर मरत व पुन्हा जन्मत अशारितीने जन्म मरणाची मालिका सुरू झाली. वस्तुतः ते सगळे जन्म हे एकाच जन्माचे तुकडे असतात.*

नारद पुढे सांगतात, ते शंकराचे ऐकल्यावर ब्रह्मदेव सावध होतात व त्याच्या शक्ती आवरू लागतात. त्याच्या क्रोधाने तयार झालेला अग्नी ते विझवू लागतात त्याच्या सिद्धीने. त्याने सगळ्या चरांचराना पुन्हा जन्म ते देण्याची व्यवस्था करतात. त्यावेळी एक स्त्री काळे आणि रक्त वर्णाचे वस्त्र परिधान केलेली ब्रहाच्या अंगातून बाहेर येते. तिचे नेत्र सुद्धा काळे होते. तिच्या अंगावर स्वर्गीय दागिने होते. ती ब्रह्माच्या उजवीकडे उभी (उजवीकडे म्हणजे कन्या अथवा स्नुषा, डावीकडे म्हणजे पत्नी) रहाते. तिला ते

दोघे विधाते पहात असतात. ब्रह्मदेव तिचे स्वागत करतात. ते तिला उद्देशून बोलतात, "अहो मृत्यू देवी, त्या जीवांचा संहार कर. त्या कामासाठी तुला उत्पन्न केले आहे". त्या सगळ्यांचा मृत्यू घडवणे, त्यांच्या कर्मविपाकानुसार, तुझे काम असेल. एकालाही सोडू नकोस. त्यांच्या पाप पुण्ण्याच्या हिशोबानुसार त्याना मी पुन्हा जन्म देणार आहे. ती आज्ञा ऐकून ती मृत्यू देवता अश्रू ढाळू लागली. ते अश्रू ती खाली सांडू देत नाही. तिच्या हाताच्या ओंजळीत ते धरले होते. तिच्या अविर्भावावरून दिसत होते कीं, तिला त्या चराचरांबद्दल अनुकंपा वाटत होती. तिला मनुष्य प्राण्याचे भले करण्याची इच्छा दिसत होती.

मोक्ष धर्म पर्व भाग चौर्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग पंच्याऐंशीवा

नारद पुढे सांगतात, ती कमलनयना तिचे अश्रू आवरत सन्मानपूर्वक वाकून ब्रह्माला तिचे हात जोडून सांगते, "अहो भगवंत, माझ्या सारखी प्रेमळ स्वभावाची बाई असे काम कसे करू शकेल? ज्यामुळे सगळीकडे घबराट पसरेल. असे काम करण्यास मी तयार नाही. मला दुसरे कांहीं चांगले काम द्या. मी त्या जीवांना मारू शकणार नाही, त्यात लहान जीव आहेत, त्यांचे अवयव तोडणे मला जमणार नाही. ते मेले कीं, त्यांचे वंशज मला शाप देतील. मला तशा कामाची भित वाटते. पाप केलेले सगळे नरकात जातील. त्या ऐवजी मला असें काम सांगा जे केल्याने मला त्या चराचराचे दुवा मिळतील. त्यापेक्षा मी मोठी घोर तपस्या करण्यास जाऊ इच्छिते. त्यासाठी मला परवानगी द्यावी". ते ऐकल्यावर ब्रह्मदेव तिला सांगतात, अहो मृत्यू देवता, तुझी निर्मिती लोकांना मारण्यासाठी मी केली आहे, म्हणून तू ते करण्यास सज्ज हो. तुला दिलेले काम कसे आहे त्यावर मत देऊ नकोस, तुझे काम माझी आज्ञा पाळण्याचे आहे. ते ऐकल्यावर कांहीं न बोलता ती फक्त त्यांच्याकडे पहात रहाते. तिची ती प्रतिक्रिया पाहून ब्रह्मदेव सुद्धा शांतपणे तिच्याकडे पहात राहिले. ते तिला पुन्हा पुन्हा आज्ञा करत होते परंतु, ती स्वतः मेल्यासारखी दिसत होती. तिला तसे पाहून ते स्मित करतात. त्यानंतर ते सगळ्या विश्वावर नजर फिरवतात. आम्हाला असे समजले कीं, जसा ब्रह्माचा राग कमी झाला ती मृत्यूदेवता त्यांच्या पुढून निघून गेली. ती त्वरितपणे एका तीर्थक्षेत्री जाते ज्याचे नांव आहे धेनुका. तेथे ती पंधरा अब्ज वर्षे घोर तपस्या करते. त्यानंतर ब्रह्मा तिला पुन्हा मारण्याचे काम सांगतो तसें ती पुन्हा एका पायावर उभी राहून वीस अब्ज वर्षे ध्यान करते. त्यानंतर ती वनात हरणांबरोबर राहू लागते. तशी दहा अब्ज वर्षे जातात. त्यानंतर पुन्हा ती वीस हजार वर्षे फक्त हवेवर राहून जगते. त्यानंतर ती आठ हजार वर्षे मौन धारण करते. त्या काळात ती पाण्यात रहाते. त्यानंतर ती कुमारीका कौशिकी नदीकडे जाते. तेथे ती फक्त हवा आणि पाण्यावर राहू लागते. त्यानंतर ती गंगेकडे गेली व तेथून मेरु पर्वताकडे गेली. तेथे ती निश्चिंतपणे उभी राहीली.

ते सगळे ती करत होती मानव प्राण्याच्या भल्यासाठी. तेथून ती हिमालयाकडे गेली. तेथे एका पायावर उभी राहून ती आणखीन शंभर अब्ज वर्षे तपस्या करते. त्यावेळी ती तिच्या आंगठ्यांवर उभी होती. ते ती ब्रह्मावरील तिची भक्ती व्यक्त करण्यासाठी करत होती. ब्रह्मदेव तिला विचारतात, "हे सगळे तू कां करत आहेस? मी जे सांगितले आहे तेंच तुला करावे लागेल". ते ऐकल्यावर ती सांगते, "मी कोणाला मारू शकणार नाही. त्यापेक्षा तुम्ही मला मारून टाका. त्यासाठी मी हे तप करत आहे. ब्रह्माचा क्रोध होईल त्याला घाबरून ती त्यांना त्या कामातून मुक्त करा असे सांगते. ब्रह्मदेव तिचे ऐकत नाहीत. ते तिला बोलतात, तुझ्यावर मी रागावणार नाही. परंतु, तुझी नेमणूक मृत्यू घडवण्यासाठीच आहे हेसुद्धा तू लक्षात घे. तुझ्या तपस्येमुळे चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया तुझ्यातून व्यक्त होतील. सगळ्या देवता व मी सुद्धा तुझ्या सहाय्याला असणार आहोत. तुझ्या अश्रूतून असंख्य रोगजंतू उत्पन्न होतील ते लोकांना मारण्याचे काम करतील. कांहीं अश्रूंतून अपंगत्व, युद्धे, अपघात असें होतील त्याने ते मरतील. तुला कोणताही दोष लागणार नाही. तू पुरूषांत पुरूष म्हणून व बायकांत बाई म्हणून व नपुसकांत नपुसक म्हणून रहाशिल. त्यानंतर ब्रह्माच्या रागाला घाबरून ती त्याला अखेरीस होकार देते. त्यानंतर ती जीवांचा जसा मरणकाळ येतो तसा त्याचा श्वास आवळते व त्याच्यातून आत्मा बाहेर निघतो. त्यामुळें देह व त्याचा जीव संपतो व आत्म्याची सुटका होते. ते कां झाले ते कोणाला न समजल्यामुळें केवळ दुःख निर्माण होते. आत्मा सुशुप्तीत जातो त्याच्या दुसर्या जन्मापर्यंत असे होऊ लागले. दोन जन्माच्या मधल्या काळात तो आत्मा अव्यक्त दुनियेत जातो. त्या दुनियेत तो आत्मा त्याच्या कर्मविपाकानुसार विविध प्रकारच्या भूत योनींत रहातो. त्या सर्व काळात त्याचा लिंगदेह त्याच्या बरोबर असतो. मानवी जन्मात जे पुण्य करतात ते देवत्वाला जातात आणि जर देवांनी चुकां करण्यास सुरूवात केली तर त्यांचा अधःपात होतो व ते मानवाच्या रुपात पृथ्वीवर जन्म घेतात अशी व्यवस्था तयार झाली.

त्यानंतर मृत्यू देवतेचे अश्रू विविध प्रकारच्या मृत्यूच्या कारणात रुपांतरीत झाले. मृत्यूदेवता मात्र तिच्या तपस्येत मग्न झाली अनंत काळासाठी.

मोक्ष धर्म पर्व भाग पंच्याऐशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग श्याऐंशीवा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "ह्या जगात रहाणार्या लोकांना चांगुलपणा बद्दल बर्याच शंका आहेत. हे चांगुलपणा कोण आहे ते मला सांगा. चांगुलपणामुळें ह्या जन्मात फायदा होतो कां नंतरच्या जन्मात होतो, त्याचा फायदा दोनही वेळी होत असतो"?

भिष्म सांगतात, चांगले वागणे, स्मृतीची शिकवण आणि वेद ह्यात त्याची माहिती आहे. त्याशिवाय नारद मुनी सांगतात ते असे आहे,

नारदमुनीने विदूराला दिलेल्या आदेशानुसार पुढील जन्म सुख, समृद्धी, यश आणि सौंदर्यवान होण्यासाठी माणसाने ह्या जन्मात काय केले पाहिजे ते सांगितले, हिंदू मान्यतेनुसार ते तीन नितीशास्त्राचा पाया आहेत. ते असें,

- कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरूद्ध जे वागणे त्याला अमानुषपणा असे म्हणतात.*
- मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला वाईटपणा असे म्हणतात.*
- सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात. *जे त्या विरुद्ध वागतात ते दुष्ट समजले जातात.*

जो हे तीन नियम पाळून त्याचे जीवन जगतो तो पुण्यवंत समजला जातो. पुण्य कमावण्याचे हे तीन मार्ग सांगितले आहेत. सोयीसाठी ह्या त्रयीचा उल्लेख चांगुलपणा म्हणून केला जातो जरी त्यात हे तिनही अभिप्रेत असतात.

चांगुलपणामुळें पुण्य वाढते त्यामुळें आनंद वाढतो. त्यातून जे सुख मिळते त्याला पर्याय नसतो. त्यापेक्षा वेगळे वागण्यात पाप असते व त्यामुळे दुःख वाढते असे प्राचीन ऋषी सांगतात. चांगुलपणा अपात्र (हलकट) माणसास दाखवला तर पुण्याऐवजी पाप

लागत असते. म्हणजे चांगुलपणा आणि माणूसकी चांगल्या लोकांना दाखवावयाचे असतात. पाप पुण्य कृतीने सिद्ध होत नाहीत, ते त्या मागील उद्देशाने सिद्ध होत असतात. चांगली कृती वाईट उद्देशाने केली तर ती पाप समजले जाते कारण त्यामुळे अध्यात्मिक उर्जा कमी होत असते. सगळा हिशेब अध्यात्मिक उर्जेच्या बेरीज - वजाबाकीचा असतो. चांगुलपणा किंवा वाईटपणा हे कोणाशी झाले त्यावर ठरतात कीं, ते तसे आहेत कां नाही. वाईट माणसाला अद्दल घडवण्याने चांगले केल्याचे फळ मिळते. त्यासाठी कोण अपात्र आणि कोण सत्पात्र ते समजणे आवश्यक असते. तेवढे शहाणपण ज्याच्याकडे आहे तोंच खरा योगी होत असतो. कांहीं जाणकार म्हणतात कीं, पाप कधीच धुतले जात नाही. त्याची शिक्षा भोगावीच लागते. फक्त भोगल्यानंतर ते धुतले गेले असे समजावे, म्हणजे तीर्थयात्रा करून पापाचे क्षालन होत नाही. त्यांच्या मते तीर्थयात्रा माणसाच्या मनाला शांती मिळावी म्हणून असतात. त्याचे पाप जात नाही किंवा पुण्य मिळत नाही. पुण्य मिळवण्यासाठी जीवन त्रयी (माणूसकी, चांगुलपणा व भूतदया) मोठी मदत करतात. त्याशिवाय ब्रह्मचर्य, मनाचा संयम, इंद्रियांचे संयमन, भोगांबद्दल औदासिन्य, सत्संग, ध्यान साधना, योगाचा अभ्यास, अस्तेय, जप करणे असे कितीतरी उपक्रम उपयोगाचे असतात. त्या सगळ्यांना तपोश्चरण (तपस्या) असें समजले जाते. त्यातील प्रत्येकाला व्रत असें समजले जाते ती एकंदर नऊ आहेत. त्यात चांगुलपणाचे तीन मिळून एकंदर बारा व्रत आहेत जो ती सगळी पाळतो त्याला सदाचारी असें समजले जाते. त्यांविरुद्ध करण्याने पाप लागत असते. अशारितीने ज्यांने पाप व पुण्याचे व्यवस्थापन केले तो मोक्षाकडे सहजपणे जात असतो. खरे बोलणे जरी चांगले असले तरी त्यामुळें पुण्य लाभेलच असे नाही. कारण कधी खरे बोलण्याने चांगल्यांचे नुकसान होते तसे झाले तर ते खरे बोलणे पापकारक असते. म्हणून केवळ खरे बोलतो म्हणून योग्य असे समजणे घातक असते. त्याचप्रमाणे खोटे बोलण्याने चांगल्यांचे (निष्पाप्यांचे), चांगले होत असेल तर ते खोटे बोलणे हितकारक म्हणून पुण्यकारक ठरत असते. म्हणजे परिणाम काय होणार त्यावर पाप कां पुण्य ते ठरत असते. ते सगळे लोकपाल देवता आणि त्यांचे गण पहात असतात व त्यांच्या निर्णयानुसार पाप व पुण्ण्य ठरत असते. त्याशिवाय नाहक क्रोध, लोभ, आणि मोह

माणसाच्या पापात भर घालत असतात. जे आपले नाही त्याचा लोभ करणे पापकारक असते. जे आपले आहे ते अपात्राला दान करणे पापकारक ठरू शकते. अपात्र आणि सत्पात्र कोण हे ठरवता येणे मोठे महत्वाचे असते. त्याची सापेक्षता साधारण माणसाला गोंधळात टाकते. "समान व्यसनेषू सख्यं", असे सांगितले आहे त्याप्रमाणे मोक्षाच्या अभिलाषीने तशाच लोकांची साथ ठेवावयाची असते. दानं करतांना फार काळजी घ्यावयाची असते अपात्र (चुकीच्या) दान पापकारक असते. अरे युधिष्ठीरा, ब्रह्मदेवाने त्रयी पुण्याचा मोठा मार्ग म्हणून सांगितला आहे. त्यासाठी त्रयीचे पालन करणे सनातन धर्माच्या नितीशास्त्राचा मोठा हिस्सा आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग श्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सत्त्याऐंशीवा

युधिष्ठीर पुढे विचारतो, चांगुलपणा समजण्यासाठी काय योग्य व काय अयोग्य ते प्रथम समजले पाहिजे. माझ्या सगळ्या शंकांचे समाधान तुम्ही केले आहे. परंतु, त्रयी समजण्यासाठी माणसाला ती दृष्टी असली पाहिजे. ती कदाचित संस्काराने प्राप्त होईल जे शिक्षक स्नातकाला देईल. मला आता असा प्रश्न आहे कीं, जे प्राणी जन्मतात, जगतात आणि मरतात ते निसर्गाच्या नियमानुसार होत असते. त्यांची कर्तव्ये कोणती आहेत म्हणून ते जन्मतात व जगतात त्यावर प्रकाश टाकावा. आतापर्यंत माणसाच्या विविध वर्णाच्या लोकांचे तुम्ही सांगितले. निरनिराळ्या परिस्थितीत असलेल्या लोकांच्या कर्तव्याची माहिती शास्त्रातून मिळते. तरी चांगले वागणे कसे ठरवावयाचे ते मला समजत नाही. एकासाठी जे चांगले ते दुसर्यासाठी वाईट असू शकते अशावेळी कोणाचे चांगले अधिक योग्य ते कसे ठरवावयाचे त्यावर शास्त्रात मार्गदर्शन नाही. शास्त्र असे सांगते की, निरनिराळ्या युगात चांगुलपणाची व्याख्या वेगवेगळी असेल. तरी मी जाणतो कीं, वेदातील वचनं नेहमीच खरी होत नाहीत. हे समजण्याची प्रथा आहे कीं, वेदाचे ऐकावे पण ते नेहमीच मार्गदर्शक ठरत नाही. श्रृतींमधून स्मृती आल्या त्यात चांगले मार्गदर्शन आहे, तरी असे अनूभव आहेत कीं, वेदांचे नेहमींच खरे ठरत नाही. अशा वेळी कोणाचे मी म्हणजे राजाने मान्य करावे ते समजत नाही. माझा गोंधळ उडाला आहे. ज्याची चलती असते अशा राजकर्त्याचे खरे ठरत असते. त्यापुढे शास्त्रसुद्धा कमी समजले जाते. जेव्हां श्रृती आणि स्मृतींमध्ये विरोधाभास आढळून येतो तेव्हां कोणाला जास्त प्रमाण मानावयाचे ते समजत नाही. कृतयुगात जे यज्ञप्रमाण होते ते द्वापार युगात तेवढे प्रमाणित समजले जात नाहीत. अशा बलदणार्या मुल्यांत कोणते मुल्य सर्व काळात योग्य असेल ते सांगा. त्या बदलाला काळ कारणीभूत आहे कां? कलीयुगात धर्माच्या नांवाखाली मिथ्याचार व दंभ सर्वत्र पसरलेला असेल. असे दांभिक आणि मिथ्याचारी त्यांची चांगुलपणाची व्याख्या तयार करून सामान्य जनांचा बुद्धीभेद करू शकतात त्यांच्या सामर्थ्याच्या जोरावर अशा परिस्थितीत योग्य व अयोग्य कसे ठरवावयाचे ते सांगा. सात्त्विक लोकांच्या दृष्टीने काय

चांगले, रजोगुणींच्या दृष्टीने काय चांगले व तमोगुणींच्या दृष्टीने काय चांगले ते समजणे दुरापास्त असते. त्यातील कोणते जास्त योग्य समजावयाचे ते समजत नाही. ब्राह्मणांचे काय चांगले? क्षत्रियांसाठी काय, वैश्यांसाठी काय आणि शुद्रांसाठी काय ते समजत नाही. अशा परिस्थितीत प्राचीन ऋषी जे सांगतात तेंच स्वीकारावयाचे मग ते तुम्हाला आवडो अगर न आवडो असे धोरण योग्य मानावयाचे कां? तेंच अंतिम सत्य समजावयाचे कां? एक राजा म्हणून मला ते सगळे समजून घ्यावयाचे आहे".

मोक्ष धर्म पर्व भाग सत्त्याऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग अठ्ठ्याऐंशीवा

भिष्म सांगतात, तुला मी एक प्राचीन संवाद सांगतो त्यातून तुला अर्थबोध होईल. तो तुलाधर आणि जजाली ह्यांच्यातील आहे. एके काळी जजाली नावांचा एक ब्राह्मण एका वनात रहात होता. वनवाशी बनून तो रहात होता. घोर तप करत होता. एकदा कांहीं निमित्ताने तो समुद्र किनारी गेला होता. तेथे तो समुद्रात उभे राहून मोठे तप करू लागतो. त्याच्या जटा वाढल्या होत्या. त्याच्या अंगाला चिखल चिकटलेला होता, अशा परिस्थितीत तो अनेक वर्षे तप करत होता. त्याने पूर्ण मौनव्रत घेतले होते. त्याची योगीक शक्ती फार वाढलेली होती. त्या समुद्रात असूनही तो मनाने सगळे जग फिरत होता. विचारसागरातील अद्भूत विचार तो संपादन करत होता. सगळे जग त्याने त्याप्रकारे पाहिलेले होते तेथे पाण्यात बसून. तो विचार करू लागतो, त्याचा अहंकार त्याला सांगतो, त्याच्या इतका प्रभावी दुसरा कोणी नसेल ह्या सृष्टीमध्ये. माझ्या सारखे मनाने सर्वत्र फिरणारा कोणी असेल कां? मी जसा पाण्यात बसून तारे आणि आकाश फिरत असतो तसा कोणी असेल कां? ते तो स्वताशी बोलत होता ते राक्षस ऐकत होते, त्याच प्रमाणे पिशाच्चसुद्धा ऐकत होते. ते त्याला बोलतात कीं, अशारितीने समजणे उचित नाही. एक मनुष्य त्यांना माहित आहे ज्याचे नांव तुलाधर आहे, तो एक श्रेष्ठ आसामी आहे, तो व्यापारी आहे, तो सुद्धा तुझ्यासारखे कधी बोलला नाही. ते ऐकून जजाली त्यांना बोलतो, कीं, त्याला त्या तुलाधराला भेटावयाचे आहे. त्याचे काय व किती ज्ञान आहे ते मला समजून घ्यावयाचे आहे. ते ऐकल्यावर तो राक्षस आणि पिशाच्च त्याला समुद्रातून बाहेर काढतात त्याला बोलतात, "अहो ब्राह्मणा, त्या रस्त्याने पुढे जा". ते ऐकल्यावर जजाली त्या प्रमाणे त्या वाटेने निग्रहपूर्वक जाऊ लागतो. तो वारानशी पोहोचतो, तेथे तो तुलाधराला भेटतो. तुलाधर त्याच्या दुकानात मालाची विक्री करत असतो. परंतु, जजालाला येतांना पाहून तो मोठ्या आदराने उठतो व त्याचे स्वागत करतो. त्याला सांगतो कीं, त्याला माहीत आहे जजाली त्याला कां भेटण्यास आला आहे. तुलाधार जजालीला बोलतो, "त्या समुद्र

किनारी तू पाण्यात उभे राहून तपस्या करत होतास. त्यावेळी चातक पक्षाच्या युगुलानी तुझ्या डोक्यावर घरटे बांधले व त्या घरट्यात अंडी घातली. त्यांना तू मोठ्या आपुलकीने तेथे वाढू दिलेस, त्यानंतर त्यात अंड्यातून त्यांची पिलं झाली ती तू तुझ्या डोक्यावर वाढू दिलीस. ती मोठी झाल्यावर व पूर्णपणे निघून गेल्यावर तू तुझी समाधी सोडलीस. त्या तुझ्या चांगुलपणाचा व भूतदयेचा तुला फार गर्व झाला आहे. तेव्हां तुला आकाशवाणी ऐकू आली कीं, तुझ्यापेक्षा मोठा चांगुलपणा माझ्यात आहे. जो वारानशीमध्ये व्यापार करत आहे. ते ऐकून तुला माझ्याबद्दल आसुया झाली. म्हणून तू मला पहाण्यासाठी आला आहेस हे मी जाणून आहे. आता बोल ब्रह्मणा, मी तुझ्याकरता काय करू शकतो ते सांग"?

युधिष्ठीर भिष्माला विचारतो, "अहो पितामह, मला सांगा असे कोणते घोर व्रत जजालीने केले म्हणून त्याला ती मनाने जग फिरून पहाण्याची सिद्धी प्राप्त झाली"?

भिष्म सांगतात, जजाली ते घोर तप करत होता. तो सकाळी व संध्याकाळी अर्घ्य देत असे. त्याचा पवित्र अग्नी सांभाळत असे. वेदाचा अभ्यास करत होता, वनवासीच्या सगळ्या व्रतांचे तो कसोशीने पालन करत असे, त्याच्या व्रतस्थतेमुळे त्याचे तेज वाढलेले होते, तसांच तो वनात रहात होता. एवढे करूनही त्याला त्याचे मोठे श्रेय आहे असें वाटले नाही. पावसाळ्यात तो उघड्यावर पावसात झोपत असे, शरद ऋतूत तो पाण्यात बसत असे, उन्हाळ्यात तो भर उन्हात बसत असें, वार्याच्या जोराला तो झेलत असें, असे सगळे करूनही तो त्याचे मोठेपण समजत नव्हता. झोपतांना तो विविध प्रकारच्या त्रासदायक अंथरूणांवर निजत असे ज्यामुळे त्याच्या देहाला यातना होतील. उभ्याने तपस्या करताना त्याच्या डोक्यावर जोरांने पाऊस पडत असे तरी एकाद्या लाकडाच्या खुंटा प्रमाणे तो तसांच उभा रहात असे. त्याच्या डोक्यावरील जटांचा बुछडा झाला होता. त्यात माती भरलेली होती. कांहीं काळासाठी तो खाणे सोडून देतो व केवळ हवेवर जगत असतो. असांच खुंटासारखा उभा असतांना त्याच्या डोक्यातील गुंतलेल्या व माती भरलेल्या जटांत एक चातक पक्षाची जोडी घरटे करण्यास येते. त्यांच्या निष्पाप वृत्तीचे जजालीला कौतुक वाटते व तो तसाच उभा रहातो अनेक दिवस जसें कीं, ते दोघे त्या जटांत त्यांचे घरटे करू शकतील. दोन मोसम तसे जातात

व निसर्ग नियमांनुसार त्यांना अंडी होतात. ते सगळे जजाली ऋषी समजत असतो. त्यांचे इप्सित पूर्ण व्हावे म्हणून तो न हलता तसांच तपस्या करत रहातो. कोणालाही इजा व करण्याच्या व्रताचे पालन करण्यासाठी तो निश्चलपणे तसांच ते सहन करत असतो. त्यात टाकलेली अंडी उबतात व यथावकाश त्यातून पिलं बाहेर येतात. ते सगळे जजाली समजत असतो व त्यांना त्रास होऊ नये म्हणून तो न हलता तसांच तपस्या करत रहातो. त्याच्या चांगुलपणाची परीक्षा होत होती. कालांतराने त्या इवल्याशा पिलांना पंख फुटतात. त्यांना पिसं येऊ लागतात. त्या पिलांचे मातापिता चातक युगुल फार आनदी होतात. ते व त्यांचा आनंद जजाली अनुभवत असतो. त्याच्या भूतदयेचे त्याला स्वतःच कौतुक वाटत होते. तो त्याची ध्यान साधना तसाच उभा राहून करत असतो. ती दोन पिलं मोठी होतात आणि उडू लागतात. ते उडत त्याच्या डोक्याभोवती घिरट्या घालत असतात. ती सगळी मोठ्या मजेत त्याच्या डोक्यात रहात होती व त्यांना त्रास होऊ नये म्हणून ऋषी जजाली स्थीर उभा राहिलेला होता. ती छोटी पिलं त्याच्या भोवती उडत त्याचा आनंद त्याला होत होता. त्याचा अहंकार सावकाशपणे वाढत होता. ती पिलं लांब जात व परत येत. तसेंच एकदा ते गेले ते चार दिवसांनी परत आले. त्यानंतर तसे आणखीन दोनदा झाले मग मात्र एकदा ते सगळे जे गेले ते परत आलेच नाहीत. तेव्हां ऋषी समजतो कीं, ते कायमचे गेले आहेत. जजालीला खात्री झाली कीं ते आता परत येणार नाहीत तेव्हां तो त्या जागेवरून हलला. तो आकाशात पहात मोठ्याने व गर्वाने फुलून दंड थोपटत बोलतो कीं, त्यांने मोठा चांगुलपणा मिळवला आहे. तो त्यानंतर पाण्यात स्वताचे अंग धुतो. तेव्हां त्याला आकाशवाणी ऐकू येते त्यात त्याला सांगितले जाते कीं, "वारानशीमध्ये तुलाधर नांवाचा वैश्य आहे जो त्याच्यापेक्षा मोठा चांगुलपणा करणारा आहे. तरी तो सुद्धा अशी शेखी मिरवू शकत नाही तर तू कसा अशी मिजास करत आहेस"?

ते ऐकल्यावर जजालाला फार राग येतो. तो तुलाधराला भेटण्याचे ठरवतो. त्यासाठी तो पुन्हा मौनव्रत पाळत फिरू लागतो. फक्त रात्री तो निजत असें व दिवसा वारानशीच्या दिशेने जात असें.

मोक्ष धर्म पर्व भाग अठ्ठ्याऐंशीवा संपला.

## मोक्ष धर्म पर्व

## भाग एकोणनव्वदावा

भिष्म पुढे सांगतात, अशाप्रकारे तुलाधराने आवाहन केल्यानंतर महान ऋषी जजाली त्याला बोलतो, "आपण सगळ्या प्रकारचे रस आणि गंध विकत आहेत. तुम्ही झाडाची सालं आणि इतर जडीबुट्टी, फळं, पानं, कदमुळं सुद्धा विकत असणार. असे काम करणारा तू मनाची शांती कशी प्राप्त केलीस? केव्हां व कसे ते तुला प्राप्त झाले"? कोणतीही तपस्या तू केली असशिल असं वाटत नाही. तरी ते मला समजून घ्यावयाचे आहे".

भिष्म त्यानंतर सांगतात, अशाप्रकारे प्रश्न विचारला गेला. तुलाधर जो नितीशास्त्र चांगले जाणत होता त्या जजालीला सांगतो नितीशास्त्राचे मुलभूत सिद्धांत, ज्याने त्याचे आयुष्य तपस्या करण्यात घालवले होते.

तुलाधर सांगतो, अहो जजाली, मला नितीशास्त्राचे सगळे नियम माहित आहेत त्यातील रहस्यांसह. थोडक्यात नितीशास्त्र माणसाला वैश्विक स्नेहसंबंधाची शिकवण देत असते. त्याच्या प्रमाणे जगण्याने सगळ्या चांगल्यांचे हित होत असते. त्याप्रमाणे जे जगतात ते कोणाला त्रास देत नाहीत व नाईलाज झाला तर कमीतकमी त्रास देऊन ते त्यांचे काम करतात. अहिंसा हा नितीशास्त्राचा मुख्य गाभा आहे. हे माझे घर लाकडाचे आहे व त्याच्या बांधणीत गवत आणि लाख, कमळाची मुळी, ज्यांच्यामुळे चांगला गंध पसरतो व अनेक इतर द्रव्यांचा उपयोग झाला आहे. मद्य सोडून इतर बहुतेक पदार्थ मी इतरांकडून विकत घेतो आणि कोणालाही न फसवता विकत असतो. तू सगळ्या प्राण्यांच्या बद्दल अनुकंपा असलेला असा आहेस, तू कृत्येने, विचाराने कधीच कोणाचे वाईट करणारा नाहीस, त्याच प्रमाणे, मी कोणाची कधी मदत घेतलेली नाही, मी कोणाशी कधी वाद घातलेला नाही, मी कोणाचा द्वेष केलेला नाही, माझ्यासाठी सगळे प्राणी समान असतात. ते माझ्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. माझा तराजू चोख असतो, मी खोटे सांगून माझा माल विकत नाही, मी कोणाची वाह्यात स्तुती अथवा टीका करत नाही. ह्या समाजात व सृष्टीत किती भिन्नता आहे ते तू समजतोस, त्याच्या भिन्नतेचा

मी विचार न करता त्यांची मी दखल घेत असतो. माझ्यासाठी मातीचे ढेगूळ आणि सोन्याचा तुकडा सारखेच आहेत. आंधळ्याना दृष्टीचे सुख मिळत नाही, बहिर्याना ऐकण्याचे सुख मिळत नाही तसेंच मी त्या सुखांच्या बाबत उदास असतो. अपंगाना जसे कांहीं सुख नसते त्याप्रमाणे मीसुद्धा कोणतेही सुख भोगत नाही. ज्याला कशाची इच्छा नसते त्याला ते नाही मिळाले म्हणून दुःख होत नाही तशीच माझी मनस्थिती असते. कांहीं मिळो अगर न मिळो मी तटस्थ असतो. जो कोणाला भित नाही व कोणाला भिववत नाही कोणाचा द्वेष करत नाही, तो ब्रह्माच्या जवळ गेला असें समज. जो कोणत्याही चराचराकडे इच्छेने पहात नाही त्याला दुखवत नाही, तो ब्रह्माकडे जात आहे असे मी समजतो. जो दुसर्यांशी वाईट वागतो त्याला त्याच्या अंती सतत भितीच्या परिस्थितीत रहावे लागते. मी त्या वडीलधार्यांचे अनुकरण करतो जे वेदातील शिकवणूक आचरणात आणतात. वेदातील शिकवणूकीबाबत कांहीं चांगले लोकसुद्धा चुका करतात त्या पाहून कांहीं दुसरे ती शिकवणूक खोटी समजून तिचा त्याग करतात तसे मी करत नाही. ज्याने त्याच्या वासनांची निरर्थकता लक्षात घेतली आहे ते त्यांचा त्याग करतात स्वाभाविकपणे ते ब्रह्माकडे आपसुकपणे जात असतात. चांगुलपणा माणसाला मोक्षाकडे नेत असतो कारण त्यामुळे त्याची अध्यात्मिक उर्जा अनेकपटीने वाढत असते. जो कधी कोणाला घाबरवत नाही त्याला कोणाची भिती नसते. कारण भय प्रतिक्रीयात्मक असते, दिले की परत तुमच्याकडे येते जसे पाप प्रतिक्रियात्मक असते. ज्याच्यामुळें इतरांना सुरक्षित वाटते त्याला ब्रह्माकडून सुरक्षितता मिळत असते. ही सगळी वागण्याची धोरणं चांगुलपणाची आहेत त्यांचे पालन यथाशक्ती प्रत्येकांने करावयाचे असते. जे सामर्थ्यवान असतात त्याने हे नियम जर आचरणात आणले तर त्यांच्या भोवतीचे जग सुखी होईल. ब्रह्माच्या साधनेसाठी कोणी तपस्या करतात, कोणी दानं करतात, कोणी खरे बोलतात, कोणी ज्ञान देतात, कोणी पुजा करतात त्या सगळ्यांपेक्षा जास्त प्रभावी आहे चांगुलपणा हे तू लक्षात घे. सत्पात्र केलेला चांगुलपणा मोक्षाचे दरवाजे उघडतो. जो चांगुलपणाने वागत नाही, त्याच्या मागे सगळ्या प्रकारच्या वाईट शक्ती हात धूवून लागतात. त्याला झोपसुद्धा लागत नाही. जो इतरांना स्वताप्रमाणे समजून त्यांना मदत करतो त्याला ब्रह्म मदत करतात. अहिंसा सगळ्यात मोठे दान असते. जो ते करतो

त्याचे जीवन सुखी होते. इतर मार्गांने मिळालेले श्रेय कालांतराने संपते परंतु, अहिंसेने मिळालेले कधीच संपत नाही ते चिरंतन असते. म्हणून कोणालाही त्रास द्यावयाचा नाही. तो खरा धर्म आहे जजाली. मनुष्य जे करतो ते सगळे सुख मिळवण्यासाठी असते. त्यात येणारी कर्तव्यें अनेक असून त्यांत अनेक रहस्येसुद्धा आहेत. ती न समजल्यामुळें माणसाचा गोंधळ होत असतो. कांही शाकाहार करण्याला चांगुलपणा समजतात पण शाकाहारात सुद्धा संहार असतो ते त्यांच्या लक्षात येत नाही. कृषी करतांना असंख्य जीवांची निर्घृण हिंसा शेतकरी दिवसभर करत असतो पण ती हिंसा नजरेत न येणारी असल्याने तिच्याकडे अज्ञानी दुर्लक्ष करतात. त्यातील रहस्य त्याना समजत नाही. शेतात पशु काम करतात, गुलाम वापरले जातात, घरात परावलंबी सदस्यांचे, गरीब माणसे समाजातील, असें सगळे हवालदील लोक मदतीच्या याचना करत असतात, त्याना मदत करावयाची असते ते चांगुलपणात येते. त्याचे दुःख जो समजून त्यांच्याशी वागतो तो ब्रह्माला प्रिय असतो. न मागता मदत करणे हे चांगुलपणात येते. सगळ्या चराचरात सूर्य, चंद्र, वायूदेव, प्राण, क्रेतु, आणि यम असतात. ते सगळे त्या चांगुलपणाचे साक्षीदार असतात अथवा वाईटपणाचे साक्षीदार असतात. त्यामुळे त्या पुण्यकर्माची नोंद होत असते. प्राण्यातील श्वास समजतो परंतु, वनस्पतीतील प्राण सुक्ष्म असल्याने सामान्यांना समजत नाही व ते समजतात कीं, वनस्पतीचे कांहीं केले तरी चालेल. पण ते तितकेच पापकारक असते अरे जजाली. नजरेत येणारी हिंसा व न येणारी हिंसा सारख्याच असतात. ज्याला त्यांचे दुःख लक्षात येत नाही ते जन्मोजन्मी मरण यातना भोगत रहातात. शेतीत जे पाप शेतकरी करतो ते अक्षम्य आहे असे समजले जाते पण ते पाप मनुष्य करत रहातो. शेतकरी सकाळपासून संध्याकळ पर्यंत सतत असंख्य लहान मोठे जीव निर्घृणपणे मारत असतो, त्या पापाचे भागीदार असतात ते धान्य खाणारा कारण, खाणारा आहे म्हणून शेतकरी शेती करतो. तसेंच खाटकाच्या कर्माचे सुद्धा भागीदार असतात ते मांस खाणारे. म्हणून मांसाहार शाकाहारापेक्षा जास्त चांगला सांगितला आहे असें वेद समजतात. तुलनेने कमी पाप करण्याच्या दृष्टीने ते योग्य आहे असें तुलाधर सांगतो. मला कोणी जवळचा किंवा

लांबचा असें नाही. कारण ते सगळे माझेच आहेत असें मी समजतो. यती त्याप्रमाणे त्याचे जीवन जगत असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकोणनव्वदावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग नव्वदावा

जजाली त्याला बोलतो, "तुम्ही जे सांगता तसे केल्यास साधक स्वर्गात जाऊ शकणार नाही. हिंसा न करता जगणे केवळ अशक्य असते हे आपण जाणता अहात. कृषी हिंसा केल्याशिवाय कधींच शक्य नसते कारण केवळ एका पिकाला वाढवण्यासाठी इतर वनस्पती आणि जीव शेतकर्याला मारून टाकावे लागतात त्यामुळें हिंसा अनिवार्य आहे. ती न केल्यास शाकाहारी पदार्थ खाण्यास मिळणे केवळ अशक्य आहे. शेतात काम करण्यासाठी बैल, रेडा वापरणे आवश्यक असते व त्यांच्या कडून काम करून घेण्यासाठी त्यांच्यावर सक्ती करणेसुद्धा अनिवार्य असते. ते स्वताहून नांगर खेचतील हे केवळ अशक्य असते. अरे वैश्या, तुझ्या तत्वज्ञानात मला मिथ्याचार दिसतो. तू जसे सांगत आहेस तसे केल्यास माणसाला जगणे शक्य होणार नाही".

तुलाधर त्यावर बोलतो, मी आता सांगतो जगण्याच्या साधन सामुग्री बद्दल. मी अनिश्वरवादी नाही. मी यज्ञ करण्याच्या विरुद्ध नाही. परंतु, योग्य कारणासाठी यज्ञ करणारे विरळा आहेत. जे यज्ञ ब्रह्माच्या साधनेसाठी (निष्काम) केले जातात ते मला मंजूर आहेत. तशा यज्ञांना माझा नमस्कार आहे. परंतु, आता ब्राह्मण पुरोहित झाले आहेत व ते क्षत्रियांसाठी सकाम यज्ञ करू लागले आहेत. देवतांना प्रसन्न करण्यासाठी जे केले जातात त्यात ब्रह्म नसते. त्यामुळे पापाचरण होण्याची शक्यता असते. हल्ली ब्राह्मण पूर्वीसारखा राहिलेला नाही. ते धनासाठी विविध यज्ञादी विधी करू लागले आहेत. कित्येक विधी श्रृतीच्या आदेशाचे उलंघन करून केले जातात. त्यांना कोणी प्रश्न विचारणारा राहिलेला नाही. असे यज्ञ करणे चोरी करण्यासारखेच असते. योग्य मार्गाने देवांना आवाहन करणे मला समजू शकते. त्यात जे दान केले जाते ते चांगल्या प्रकारे पुण्यमार्गे कमावलेले असले पाहिजे. एरवी तसे दान व त्या संदर्भात केलेला यज्ञ दोनही खोटे ठरतात. तरी अज्ञानी यजमान लोभापोटी ते करत रहातात. त्यामध्ये सात्त्विकता बहुधा नसते. बहुतेक रजोगुणी अथवा तमोगुणी लोक पैशाच्या लोभाने तसे यज्ञ करत असतात व त्याला धनाच्या लोभाने कांहीं जन्माने ब्राह्मण असलेले पुजारी मदत

करत असतात. त्याला माझा विरोध आहे. यज्ञ करण्यासाठी पहिली आवश्यकता असते कीं, तो यजमान व ब्राह्मण पुरोहित दोघे सात्त्विक आहेत. ते जे पाप करतात त्याचा त्रास त्यांच्या वंशजाने होत असतो. चांगुलपणा हा प्राधान्याने सात्त्विकतेचा प्रभाव असतो त्यामुळे रजोगुणी व तमोगुणी लोकांत चांगुलपणा केवळ बाह्यात्कारी दाखवण्यासाठीचा असतो. खरा चांगुलपणा नसल्यामुळे त्यांचे फळ त्यांना मिळत नाही. पूर्वीच्या काळी सकाम यज्ञ होत नव्हते त्यावेळी त्या यज्ञात सामर्थ्य होते तसे आता राहिलेले नाही. कांहीं पुढच्या जन्मासाठी यज्ञ करतात परंतु, त्याचे फळ मिळते कां, त्याची खात्री नसते. तशा पुजांना समर्थन करणारे खोटे ब्राह्मण निर्माण झाले आणि ते त्यांचे खोटे धर्मशास्त्र लिहून त्यांच्या खोट्या कर्मकांडांचे समर्थन करत असतात. त्यात अनेक भोळे भाविक फसत असतात. त्यामुळे पाप वाढत आहे. समाजाची सुद्धा अध्यात्मिक उर्जा र्हास पावत आहे. हे सगळे युगाच्या अंताचे लक्षण आहे असे मला वाटते. ते सगळे खोटे ब्राह्मण खर्या ब्राह्मणावर भारी झाले आहेत.

ते सात्त्विक जे प्रणवावर एकचित्त करतात. त्याना यश मिळते. त्यांच्या साधनेने सगळे देव प्रसन्न होतात. अशाला यज्ञ करण्याची सुद्धा गरज नसते. त्याला योग्य व अयोग्य काय ते समजत असते. अशांना स्वर्गाची आस नसते कारण त्यांच्यासाठी येथेच स्वर्ग असतो. अशांचे यज्ञ साधारण असतात. त्याना समाजापुढे देखावा करावयाचा नसतो. त्याचे चांगले वागणे (सदाचार) हांच खरा यज्ञ असतो. तो साधारण समाजाला समजत नाही. परंतु, लोभी पुरोहित त्याला महागड्या गोष्टींचे दान करण्यास सांगतात व स्वताची पोतडी भरतात. असे भ्रष्ट ब्राह्मण खरे पापाचे कारण असतात. त्यांच्यातील पाप सामान्यांना दिसत नाही. ते त्यांच्या मागण्या पुरवत रहातात, त्यामुळे समाजात पाप वाढत आहे. खरा धर्म बुडाला आहे. त्याला कारण असतात हे लोभी ब्राह्मण. खरे ज्ञानी समाजाच्या भल्यासाठी यज्ञ करतात त्यात दानं करतात. ते स्वतासाठी नसते. हे असे सगळे मी पहात आलो आहे जजाली. त्या ब्राह्मणांच्या खोटेपणाने मी व्यथीत झालो आहे. मी त्यानंतर यज्ञ करण्याचे सोडून दिले आहे. फक्त अहिंसा हांच खरा धर्म असे मी मानत आलो आहे. यज्ञ वगैरे माझ्यामते निव्वळ थोतांड आहे. त्यांची कांहींच गरज नसते हे मी समजलो. खरा धर्म फारच सोपा आहे. त्याचा अर्थ आहे

चांगुलपणा, सदाचार. ब्रह्माला त्याहून कांहीं जास्त अपेक्षा नसते माणसांकडून. चांगले वागा सगळ्यांशी हाच खरा धर्म आहे असे मी मानतो आणि त्या प्रमाणे माझे विचार आणि वागणे आहे. माझ्या मते जर खरोखरच स्वर्ग असेल तर तो येथेच आहे व तो केवळ चांगुलपणाने आपण येथे निर्माण करू शकतो त्यासाठी कोठे दूर आकाशात जाण्याची गरज नाही. यज्ञ केल्याने स्वर्गात जातो एरवी नाही हे सांगणारे त्याचा पुरावा देऊ शकत नाहीत. म्हणजे कशावरून तो स्वर्गात जाईल ह्याचा पुरावा त्यांच्या कडे नसतो, म्हणजे त्या सगळ्या गप्पा असतात. माझ्या मते हा सगळा मिथ्याचार असतो. शहाण्याने त्यात जावयाचे नसते. यज्ञाचे जे फायदे ब्राह्मण सांगतात त्याचे पुरावे ते देऊ शकत नाहीत, समजलास कां जजाली. तरी लोकं तशा बातांवर विश्वास ठेवतात व महागडे यज्ञ करत रहातात. ज्याच्याकडे पुण्याई आहे अशा ब्राह्मणांने पशु यज्ञ करावा ज्यांची तेवढी ताकद नाही त्यानी साध्या भाज्या, फळ, कंदमुळं, फुलं अशा निर्जीव भागांचे वाहावून यज्ञ करावा. त्यातसुद्धा धान्य, पानं, लाकडाची सालं असे सजीव भाग यज्ञात देऊन पाप करू नये. पशू एक मारण्याने देवता जर प्रसन्न होणार असतील तर ते करावे. अर्थात् देवता प्रसन्न होणार कां नाही त्याची खात्री कोण देणार? हा प्रश्न असतोच. त्यासाठी असा पशु बळी द्यावा ज्याचे आयुष्य जगून झाले आहे, अर्थात् वृद्ध असावा. तरूण वधासाठी वापरू नये असे माझे मत आहे, जजाली. तुमच्या ब्राह्मणांच्या मते जो वेद बोलत नाही, जो यज्ञ करत नाही, जो दानं देत नाही ब्राह्मणांना, त्याला ब्रह्म मिळत नाही. मी ते मानत नाही.

जजाली त्याला बोलतो, "अरे वैश्य अशी अजब विचारशैली मी आधी कधी ऐकलेली नाही. हे एक वेगळे तत्त्वज्ञान आहे माझ्यासाठी. मनाने यज्ञ करण्याची कल्पना मला आवडली आहे. अशी परंपरा अजून रुढ झालली नाही. तू सांगतोस कीं, तमोगुणी लोकांनी केलेले यज्ञ फळत नाहीत मग मला सांग त्यां लोकांनी आनंद मिळवण्यासाठी कोणते काम करावे? मला ते ऐकावयाचे आहे कारण मला तुझे पटू लागले आहे".

तुलाधर सांगतो, बर्याच वेळा अपात्र यजमानाने व पुरोहिताने केलेले यज्ञ, पुजा फळत नाहीत. कारण ते फळण्यासाठी मुळात जे पुण्य पाहिजे ज्याच्या जोरावर ते यज्ञ साध्य होतात ते तेथे नसते. पुण्यहीनाने केलेले कर्मकांड नेहमीच व्यर्थ जाते हे तू सुद्धा जाणत

आहेस, अरे जजाली. इष्ट देवतांना कोणी मूर्ख समजला तरी त्या तशा नसतात हे तू जाणतोस. म्हणून यज्ञ केवळ बाह्यात्कारी, दिखाऊ करून कांहीं उपयोगाचे नसते. मग तुम्ही गाय कापा नाहीतर घोडा कापा, त्याचा काहींच उपयोग नसतो. वेद सांगतात की, यज्ञ अविवाहीतानी करावयाचे नसतात. परंतु, माझ्या मते गाईचा बळी न देता तिच्या तुप, दह्यानी पुजा केली तर ती त्याची पत्नी समजावी. अशा पुजनानी माझ्यामते तो निश्चितपणे ब्रह्माकडे जाईल. भाताचे लाडू, यज्ञात दिले गेले, तरी ब्रह्म त्याच्यावर संतुष्ट होईल असे मला वाटते. आपला आत्मा म्हणजेच ब्रह्म असते त्यालाच तीर्थ कां नाही समजावयाचे? जगभर भटकण्यापेक्षा घरात बसून ध्यान केले तर का बिघडते"? चांगुलपणा, अहिंसा, अस्तेय एवढे व्रत पुरे आहे असे मला वाटते. तेवढ्याने मनुष्य ब्रह्मपदी जाऊ शकतो.

भिष्म पुढे सांगतो, "अरे युधिष्ठीरा, तुलाधराने वैश्यांच्या दृष्टीने कोणती कर्तव्ये महत्वाची असतात ते मी तुला दाखवले. प्रत्येक वर्णाची कर्तव्ये त्यांच्या कार्याच्या अनुषंगाने सांगितली आहेत. तुलाधर जजालीपेक्षा श्रेष्ठ होता कारण त्याला अहंकार नव्हता. अहंकार माणसाचा सर्वात मोठा दोष असतो. जजाली ब्रह्माकडे जाऊ शकत नव्हता कारण त्याचा "मी", (अहंकार) जागृत होता".

मोक्ष धर्म पर्व भाग नव्वदावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एक्याण्णवावा

तुलाधर पुढे सांगतो, अरे जजाली तू पहा चांगले आणि वाईट दोघेही मी सांगितलेल्या कर्तव्यांचे पालन त्यांच्या पद्धतीने करत असतात. त्याचे निरीक्षण केलेस कीं, तुला मी जे सांगतो आहे ते पटेल.

भिष्म पुढे सांगतात, त्यानंतर जजालीने त्याच्या भोवती घिरट्या घालणार्या निरनिराळ्या पक्षाना बोलावले व त्याचे मत विचारले ते सांगतात कीं, अहिंसा हांच चांगुलपणा आहे. गिधाड सांगतात आम्ही कोणाला मारत नाही. ते मेलेल्यांना खातात. दुःख न देता कोणतेही कार्य करावे म्हणजे ते ह्या आणि नंतरच्या जीवनात मदत करणारे असते. त्याउलट दुःख देणारे कार्य ह्या आणि नंतरच्या अशा दोनही काळात त्रासदायक ठरते. असं ते पक्षी त्याला सांगतात. शेवटी उद्देश महत्वाचा असतो. देवता उद्देश तपासत असतात कृती नाही. म्हणून उद्देश शुद्ध असला पाहिजे. देवता उद्देश पहातात त्यांना फसवता येत नाही असे तुलाधर सांगतो. सात्त्विक माणसाच्या रजस माणसाच्या आणि तमोगुणी माणसाच्या अशा तीन वेगळ्या पुजा असतात. दिसायला जरी त्या सारख्या असल्या तरी त्यात गुणात्मक फरक असतो व तो फरक देवता समजतात. त्यावर ऋषी धर्मदर्शनाने सांगितले आहे ते मी सांगत आहे.

भिष्म पुढे सांगतात, असे संभाषण झाल्यावर थोड्या वेळांनी तुलाधर आणि जजाली दोघे स्वर्गात गेले. तेथे मजेत राहू लागले. अरे युधिष्ठीरा, तुलाधर त्याला जे योग्य वाटत होते ते सांगत होता. प्राण्याची हिंसा आणि वनस्पतीची हिंसा ह्यात तुलाधर गोंधळ करत होता त्याबद्दल युधिष्ठीर नाराज दिसतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एक्याण्णवावा संपला.

तुलाधर आणि धर्मदर्शन हे जैन विचारांचे मुळ पुरूष आहेत. तुलाधर वैश्य वर्णाचा होता व तो त्यांच्या कृषीप्रधान संस्कृतीचे समर्थन करत होता हे उघड दिसते. वैश्य यज्ञात शाकाहारी प्रसाद देत त्याप्रमाणे त्यांच्याकडे असलेले शुद्रसुद्धा तसाच प्रसाद देत. त्यामुळे ब्राह्मणांत व वैश्यांत वाद होत, त्याचे चित्रण ह्या ठिकाणी केलेले आहे. त्याउलट क्षत्रिय आणि ब्राह्मण व त्यांच्यासेवेत असलेले शुद्र मांसांचे प्रसाद देवतांना यज्ञात (पुजांत) देत असत हे ह्या चर्चेतून स्पष्ट होते. कोणताही प्रसाद दिला तरी हिंसा अनिवार्य आहे हे त्या तुलाधरांनी मान्य केले आहे. प्रश्न हिंसा कमी करण्या बाबत आहे. त्यामध्ये तुलाधराला वनस्पतीच्या होणार्या हिंसेचे समर्थन करता आलेले नाही. एक गाय कापल्याने होणारी हिंसा आणि एका भाताच्या पिंडात मारल्या गेलेल्या भाताच्या शेकडो दाण्यांची हिंसा ह्याची तुलना करण्याचे तो टाळतो ते स्पष्ट झाले. वेदांत सांगितले आहे त्याप्रमाणे, "जीवो जीवस्य जीवनं", हे वैश्विक सत्य तुलाधराला नाकारता आलेले नाही.

अगदी प्राचीन काळा पासून क्षत्रियांचा व ब्राह्मणांचा मांसाहार आणि वैश्यांचा शाकाहार ह्यात कोणता जास्त श्रेष्ठ ह्यावर वाद होता त्याचे हे एक उदाहरण येथे महाभारतात आलेले आहे. कालांतराने वैश्यांनी ब्राह्मणां पासून फारकत घेतली व ते जैन धर्माचे अनुयायी झाले त्यामुळें जैन लोकात वैश्य प्रवृत्ती प्रधान असल्याचे आजही आपण पहात आहोत. ब्राह्मण आणि क्षत्रिय समजतात कीं, मांसाहार देवतांना जास्त भावतो त्या उलट वैश्य सांगत की, शाकाहार देवतांना जास्त भावतो. हा न संपणारा वाद आहे. येथे मी त्याचा परिचय करून दिला आहे. आधुनिक विज्ञानाने मात्र सिद्ध केले आहे कीं, मांसाहार किमान हिंसक असतो शाकाहार फार जास्त संहारक म्हणून महा हिंसक ठरतो. फक्त फरक एवढांच कीं, शाकाहारातील संहारक हिंसा लक्षात येत नाही ती अप्रत्यक्ष असते आणि मांसाहारातील हिंसा जरी तुलनेने कमी असली तरी नजरेत भरणारी असते. त्यामुळे अल्पमति असलेले, असे समजतात कीं, मांसाहार जास्त हिंसक आहे. त्याकरता महान संशोधक श्री जगदीशचंद्र बोस ह्यांचे संशोधन आपण पाहू शकतो. पुढे शंकराचार्याचा पराजय मंडण मिश्राच्या पत्नीने केला व तो आणि त्याचे अनुयायी जे प्रामुख्याने पौरोहित्य करत असतं ते जैन झाले त्यानंतर शंकराचार्य त्याची नामुष्की

*लपवण्यासाठी हिमालयात उत्तरकाशीस गेला त्याच्या पट्ट शिष्यांसह आणि तेथे तो मंदाकीनी नदीत उडी मारून आत्महत्त्या करतो. त्याच्या अस्थींची समाधी तेथे होती जी गेल्या प्रलयात नष्ट झाली. त्याचे इतर अनुयायी त्यांचा हिंदूंच्या पौरोहित्याचा धंदा आजतागायतपणे करत आहे. ते स्वताला हिंदू सांगतात पण त्यांचा शाकाहार त्यांचे जैनपण उघड करतो. जे ब्राह्मण शंकराचार्याला मानत नव्हते ते आजही मांसाहार करत आहेत. शंकराचार्याचे अनुयायी जैन धर्म स्वीकारल्यानंतर गाईचे दान घेणे बंद करतात कारण, गाय त्यांना खाण्यासाठी दान केली जात होती. ब्राह्मण तीन गोष्टींचे दान घेऊ शकतात ती आहेत, अन्न, वस्त्र आणि निवारा. गाय अन्नात येते. त्यामुळे गेली हजार वर्षे गाईचे दान देण्याची प्रथा संपुष्टात आलेली आपण पहातो.*

# मोक्ष धर्म पर्व
## भाग ब्याण्णवावा

भिष्म पुढे सांगतात, ह्या संदर्भात मी आणखीन एक संवाद तुला सांगतो. तो राजा विशाखीला प्राणीमात्रांबद्दल वाटलेल्या अनुकंपेचा आहे. यज्ञात जे बैल मारले जात त्यावेळी त्यांचे ओरडणे व वेदनांनी विव्हळणे पाहून त्या राजाला फार दुःख झाले त्यानंतर तो राजा यज्ञात बळी देण्याविरुद्ध ब्राह्मणांना आदेश देतो ते दिले आहे. तो त्यांना बोलतो, "जगातील सगळ्या गुरांचे कल्याण झाले पाहिजे". तो पुढे तक्रार दर्शक बोलतो, "जे भ्रष्ट झाले आहेत धनाच्या लोभांनी, ज्यांची अक्कल शेण खात आहे, जे पाखंडी आहेत, भूतदया विसरले आहेत असेंच अशा वधांचे समर्थन करत असतात". त्याच्या मते नितीशास्त्रातील महत्वाचा सिद्धांत चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्याच्यात असें क्रूरपणे प्राण्यांना मारणे बसत नाही. तशा कर्मकांडातून जे प्राप्त होत असेल ते पापाने भरलेले आहे. म्हणून सर्वथा निशिद्ध ठरवले गेले पाहिजे. तो पुढे सांगतो, मनुने प्राण्यांच्या अशा हत्त्येचे खंडन केले आहे. त्यातून कांहीं फळ मिळत असेल तर ते शुद्ध म्हणता येणार नाही कारण त्यात त्या प्राण्यांच्या वेदना असतात. त्यानंतर अहिंसक हत्त्या करण्याच्या विविध तर्हा शोधण्यात आल्या. त्याप्रमाणे अहिंसक हत्त्या करणे यज्ञात बंधनकारक झाले. त्यामुळे झटका पद्धत रुढ झाली.

*त्यात एका अतिशय धारदार तलवारीने एका झटक्यात मान कापली जाते म्हणून त्या पद्धतीला झटका पद्धत म्हणतात. पुढे पाश्चात्यानी आणखीन एक झटका पद्धत रुढ केली त्यात प्राण्याला विजेच्या जोरदार झटक्याने प्रथम बेहोष केले जाते व त्यानंतर तो बेहोष प्राणी मारला जातो. ह्या दोनही पद्धती अहिंसक हत्त्या ह्या प्रकारात येतात.*

जर बळीच्या जनावराला वेदना झाल्या तर तो यज्ञ व्यर्थ गेला असे समजू लागले. त्यामुळे अहिंसक हत्त्या बंधनकारक झाली. त्याच्या ऐवजी मद्य, मासळी, मध, मांस, दारू आणि त्याबरोबर भाताचे व तीळाचे पिंड, असे यज्ञात देण्याचे सांगू लागले. परंतु, त्यांना वेदाचा आधार नव्हता. त्यानंतर असे सांगू लागले कीं, वेदाचीच मान्यता हवी असेल तर वेदांत ज्या झाडांचा उल्लेख आहे त्यांची पानं फुल यज्ञात वहावी असे

सुचवण्यात आले. त्यानंतर चांगल्या माणसाच्या चांगुलपणा एवढे यज्ञात पुरेसे कां नसावे असे प्रश्न विचारले जाऊ लागले. देवतेला मांसाचाच प्रसाद कां द्यावयाचा फळं, पानं काय वाईट आहे, असें निरर्थक मुद्दे पुढे केले जात होते.
युधिष्ठीर विचारतो, "युद्धाच्या संकटात सगळे मारले जात असतात, तशात ह्या प्राण्यांच्या वेदनांची एवढी पर्वा करण्याचे क्षत्रियांना व त्यांच्या बरोबर असणार्या ब्राह्मणांना गरज वाटणे शक्य नाही. वैश्यांना युद्धाची झळ लागत नसे, त्यामुळें ते असे बाष्कळ मुद्दे मांडत असावेत".
भिष्म बोलतात, मनुष्याने असे जगावे कीं, त्याला असले यज्ञ करण्याची आवश्यकता रहाणार नाही. जो ऐहिक सुखाच्या नादी लागतो तोंच असले यज्ञ करत असतो. खर्या ब्रह्मवर्त्याला अशा हिंसक यज्ञांची गरज नसते.
मोक्ष धर्म पर्व भाग ब्याण्णवावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग त्र्याण्णवावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो पितामह, आपण सगळ्या मुष्किल प्रश्नांची उत्तरं जाणता. त्यामध्ये दुष्टपणा कसा टाळावयाचा ते सांगा. माझा दुसरा प्रश्न असा कीं, कोणते कार्य माणसाला बंधन कारक आहे व कोणते कार्य तो करण्याचे नाकरू शकतो"?

भिष्म सांगतात, ह्यासंदर्भात मी तुला एक कथा सांगतो ज्यात अंगिरसाच्या वंशात जन्मलेल्या चिरकर्णाची. जो मनुष्य कांहीं करण्याआधी खूप विचार करतो असा तो होता. तो चिरकर्ण गौतमाचा मुलगा होता. तो खूप विचार पूर्वकपणे त्याची कामं करत असें. म्हणून त्याचे नांव चिरकर्ण ठेवले होते त्याच्या आईने. तो बराच काळ झोपलेला असे त्याच प्रमाणे तो बराच काळ जागा रहात असे, त्यामुळें तो फार आळशी आहे असा समज पसरलेला होता. अल्पमती लोकांना तो मूर्ख वाटत होता त्या त्याच्या वागण्यामुळें. एकदा गौतम ऋषी त्याच्या इतर मुलांना सोडून चिरकर्णाला आदेश देतो कीं, तो त्याच्या मातेचा वध करील. असा शाप देऊन तो वनात तपस्या करण्यासाठी निघतो. जाताना तो तथास्तू असें बोलतो पण ते कशासाठी ते समजत नाही चिरकर्णाला. चिरकर्ण त्याच्या खूप विचार करण्याच्या सवयीमुळें ती आज्ञा ताबडतोब अमलात आणत नाही. तो त्या आदेशाच्या वैधते बद्दल साशंक असतो. तो विचार करतो कीं, त्याला बापाची आज्ञा पाळावयाची असली तरी त्याला त्याच्या आईचा वध करावयाचा नसतो. तो ते दोनही कसे साध्य करावयाचे ते ठरवत असतो. तो विचार करतो की, अशा परस्पर विरोधी आज्ञांचे पालन कसे करावयाचे? पित्याच्या आज्ञेचे पालन करावयाचे आहे पण मातेचा वधसुद्धा करावयाचा नाही. असे दोनही कसे साध्य करावयाचे त्याचा विचार तो करत असतो. पित्याच्या आज्ञेचे पालन करणे बंधनकारक होते त्याच वेळी मातेचे संरक्षण करणे सुद्धा त्याहूनही जास्त महत्वाचे होते. तो विचार करत असतो हे दोनही कसे साध्य करावयाचे. तो विचार करतो कीं, जेव्हां पुत्र जन्मतो त्यावेळी पित्याचा अंश मातेच्या उदरात प्रवेश करतो. त्यामुळें त्याचा वंश पुढे चालत असतो. तो विचार करत असतो कीं, तो त्याच्या मातेचा आणि पित्याचा अंश आहे.

त्याच्या जन्माच्या वेळी आणि गुरूगृही जातांना पित्याने जे विधी केले त्यामुळे मी त्या दोघांचा समान अंश आहे हे निश्चित. त्याकारणाने पिता मुलाचा सर्वाधिक हक्कदार असतो. त्याच्या आज्ञेचे पालन करणे हा मुलाचा धर्म आहे. असें वेदात दिले आहे. त्यासाठी त्याच्या आज्ञेचे पालन करणे शिरोधार्य ठरते. त्यामुळें पित्याचे समाधान म्हणजे सगळ्या देवतांचे समाधान असें समजले जाते. अशाप्रकारे त्याचे त्याच्या पित्याबद्दलचे विचार होत असतात. एवढा विचार पित्याबद्दलचा झाल्यावर तो आता आईचे त्याच्याशी कसे नाते आहे व त्याबाबत त्याचे काय कर्तव्य ठरते ते तो ठरवू लागतो. तो म्हणतो, "माझ्या जन्मात जे पांच तत्त्व एकत्र आले त्याला माझी आई कारणीभूत आहे. ती सगळ्या वेदना सहन करत मला तिच्या उदरात वाढवते माझे पालन पोषण करते, माझ्या छोट्या जीवाचे ती संरक्षण करते, मनुष्य कितीही मोठा झाला तरी मातेपुढे लहान बालक असतो. मातेचा आधार कोणी देऊ शकत नाही. "तिन्ही जगाचा स्वामी आईविना भिकारी", असं म्हणतात. मुलांसाठी मातेसारखा संरक्षक नाही. जेव्हां मी तिच्या उदरात होतो ती माझी धात्री होती. ती माझी जननी आहे. माझे शरीर तिच्या अंगातून आले आहे. माझे छोटे शरीर तिने सांभाळले म्हणून ती माझी अम्बा झाली. माझ्यात वीरश्री तिने घातली म्हणून ती माझ्यासाठी विरश्री झाली. माझे हगणे मुतणे काढले म्हणून ती माझी शुश्रू झाली. आई हेंच माझे खरे शरीर आहे. अशा माझ्या मातेला मी कसा मारू शकतो. तिच्या संस्कारामुळें मी मनुष्य झालो आहे नाहीतर मी एक पशू आहे. पतीपत्नी एकत्र येतात संततिसाठी तेव्हां त्यातील स्त्री सगळ्यात जास्त जबाबदार असते. ती जर ठरवते तर ती माता होणार नाही. तिच्या इच्छेमुळें मी जन्मलो आहे. मातेच्या खरेपणाची शंका कोणालाही नसते. पण पित्याच्या खरे पणाची खात्री कोणी देत नाही. म्हणजे ही माझी माता आहे हे निश्चित आहे पण ते जे स्वताला माझा पिता सांगतात तो मनुष्य खरोखरच माझा पिता आहे कां? त्याचे उत्तर तो देऊ शकत नाही. तरी शास्त्र सांगते कीं, संतति पित्याचीच असते, तरी मी पहातो की, लग्नाच्या आणाभाका घेतल्यानंतरसुद्धा पुरूष बदफैली होत असतो तसे बाई कधीच करत नाही. पति पत्नीला पोसतो म्हणून त्याला भातृ म्हणतात. त्याचे कार्य असते पत्नीचे संरक्षण करणे म्हणून त्याला पति म्हणतात. परंतु जर त्याने तिचे संरक्षण केले नाही अथवा

पोसणे थांबवले तर तो भातृ आणि पति रहात नाही. व्यभिचारात पुरूष जबाबदार असतो, स्त्री तशा कारणात जबाबदार समजली जात नाही. ती कधीच बदफैली ठरत नाही. म्हणून ती कधीच अनैतिक ठरत नाही. त्याने तिचे संरक्षण थांबवल्यामुळें व तो तिला पोसत नसल्याने तो तिचा कोणीही रहात नाही. तिच्याबद्दल कोणताही निर्णय घेण्याचा त्या पुरूषाला हक्क रहात नाही. जोवर तो पति आणि भातृ असतो ती त्याला तिचा परमेश्वर समजत असते पण जसे ते त्याचे कार्य तो करणे थांबवतो तो तिच्यासाठी कोणीच रहात नाही. हे पहाता मला समजते कीं माझी आई निष्पाप आहे व जो दोष आहे तो माझ्या पित्यात आहे. ज्याअर्थी त्यांने मला तिचा वध करण्याचा आदेश दिला त्याअर्थी तो तिचा न पती राहीला न भातृ. अशा परिस्थितीत त्याला माझ्या आईचा वध करण्यास सांगण्याचा हक्कसुद्धा राहिला नाही".

नंतर चिरकर्णाला घडलेल्या घटना आठवतात. ते असे झाले कीं, इंद्र गौतमाला हरवण्यासाठी त्याचे सोंग घेऊन त्याच्या पत्नीशी संभोग घेतो तेव्हां ती त्याला तिचा पती समजत होती त्यांमुळे ती कशी दोषी ठरते असा प्रश्न चिरकर्णाला पडतो. माझी माता सगळ्या न्यायाने निर्दोष आहे ते चिरकर्णाला पटते. ती माझी माता आहे जिला मारण्याचा आदेश माझ्या पित्याने दिला आहे. मी माझ्या आईचा वध कधीच करणार नाही, त्याऐवजी मी माझ्या पित्याला दोष देणार आहे. बाप सगळ्या देवतांच्या समान समजला जातो परंतु, माता सगळ्या देवता आणि सगळी पृथ्वी ह्यांच्या इतकी समजली जाते. अशारितीने फार काळ विचार करणारा गौतमाचा मुलगा त्याला दिलेले काम करत नाही. बर्याच वर्षानंतर गौतम ऋषी परत येतात. गौतमाला त्या काळात पूर्ण विचार केल्यानंतर पश्चात्ताप झालेला असतो कीं, त्याने पत्नीचा वध करण्याचा जो आदेश दिला होता तो सरासर अयोग्य होता. त्याच्या मनात अपराध्याची भावना वाढलेली होती. तो रडत होता त्याच्या पुरूषी अहंकाराला दोष देत. तो उद्गारतो, "तो पुरंदर माझ्या घरी माझे रुप घेऊन आला व माझ्या पत्नीचा गैरफायदा घेतला. मी पत्नी वधाचा गुन्हा केला आहे त्यासाठी प्रायश्चित्त केले पाहिजे कारण माझ्या मुलाने एव्हाना तिचा वध केला असणार. तो तशा विचाराने फारच शोकाकून झाला होता. परंतु, जर तो त्याच्या नावाप्रमाणे चिरकर्णा असेल तर त्याने त्याच्या मातेचा वध केला नसेल व जर तसे असेल

तर मी मोठ्या पापापासून मुक्त होणार आहे. *हिंदू नितीशास्त्राप्रमाणे मात्र गौतम ऋषीने मनाने त्याच्या पत्नीचा वध रचला होता, त्याच्या मुलाला चिरकर्णाला तसे करण्याचे सांगून म्हणून, त्याला पत्नीवधाचे पाप लागले आहे.* तशा विचाराने त्याला थोडा धीर आला. अशारितीने विचार करत गौतम बसला होता त्याच्या तंद्रीत जेव्हां तो त्यातून बाहेर येतो तो पहातो कीं, त्याचा मुलगा चिरकर्ण त्याच्या बाजूला बसला आहे. चिरकर्ण त्याच्या पित्याचे सांत्वन करू लागतो. आपला मुलगा आपल्या पुढे साष्टांग प्रणिपात करत आहे ते पाहून गौतमाला शरम वाटू लागली. त्यानंतर तो त्याची पत्नी अहिल्या तेथे आलेली पहातो. ते पाहून त्याला अत्यानंद झाला.
तो चिरकर्णाला बोलतो कीं, त्याच्या नेहमी प्रमाणे दीर्घ विचार करण्याच्या सवयीमुळें एक मोठा अनर्थ टळला आहे. त्यानंतर तो त्याला दीर्घायुष्याचा आशिर्वाद देतो. त्यानंतर गौतम तीन प्रकारच्या लोकांबद्दल सांगतो. ते चिरकर्ण, लघूकर्ण आणि बद्धकर्ण असे आहेत. चिरकर्ण फार विचार करून मगच निर्णय घेणारे असतात. ते बहुधा सात्त्विक प्रवृत्तीचे असता, लघूकर्ण फार विचार न करता लगोलग कारवाई करणारे असतात. ते तमोगुणी असतात. तिसरे आहेत बद्धकर्ण ते मिळालेल्या माहितीवर कोणतीही कारवाई करत नाहीत ते रजोगुणी असतात. चिरकर्ण त्यांच्या कडे आलेल्या माहितीचा पूर्ण अभ्यास करणारे म्हणून ब्राह्मण असतात, लघूकर्ण क्षत्रिय अथवा वैश्य असतात आणि बद्धकर्ण बहुधा शूद्र असतात. उत्तम कारभारासाठी चिरकर्ण चांगले असतात. त्यामुळें चुका कमी होतात. चिरकर्ण योग्य अयोग्यचा सखोल विचार करणारे म्हणून श्रेष्ठ असतात. त्याच्या निर्णयांत क्रोध, मद अथवा मत्सर हे दोष नसतात. न्याय देण्याच्या कामात चिरकर्ण उत्तम असतात. त्यांच्याकडून कोणावर अन्याय होत नाही. इतर दोघांच्यामुळें अन्याय होऊ शकतो. पूर्ण विचार करणारे कधी क्रोधासारख्या पापाकडे नेणार्या गोष्टीत रमत नाहीत. जो त्याच्या पुढ्यात आलेल्या प्रश्नावर सखोल अभ्यास न करता निर्णय घेतो व त्याची अंमलबजावणी करतो तो अनेक पापं करत असतो. म्हणून अरे पंडूपुत्रा तू चिरकर्णी हो, असे भिष्म बोलतात.
मोक्ष धर्म पर्व भाग त्र्यांण्णवावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग चौर्याण्णवावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "कोणालाही इजा न करता राजा त्याच्या प्रजेचे संरक्षण कसे करू शकतो"?

भिष्म त्याला उत्तर देतो, "ते समजण्यासाठी मी तुला राजा द्युमत्सेन आणि सत्यवत ह्यांच्यात झालेले संभाषण सांगतो, एकदा राजा द्युमत्सेनाच्या राज्यात कांहीं आरोपी बळी देण्यासाठी आणले होते तेव्हां राजपुत्र सत्यवत आक्षेप घेतो जसा कधी कोणी आधी घेतला नव्हता. तो म्हणतो कीं, कधी चांगुलपणातून वाईटपणा व्यक्त होत असतो विशेष करून जेव्हां चांगुलपणा अपात्रासाठी केला जातो. त्याच प्रमाणे कांहींवेळा वाईटपणा सत्पात्रासाठी केला जातो तेव्हां तो चांगुलपणा ठरतो. जसे जर चोराला क्षमा केले तर तो पुन्हा दुसरी चोरी करण्यासाठी तयार होतो म्हणजे चांगुलपणातून वाईटपणाला उत्तेजन मिळाले. कारण चोर अपात्र होता त्या चांगुलपणासाठी. कलीयुगात तसे नेहमी होत जाईल म्हणूनच त्या युगाला कलीयुग समजले जाईल. त्यासाठी तसे होऊ द्यावयाचे नसते. सत्यवत पुढे बोलतो, न्याय देतांना चांगुलपणा ऐवजी शिक्षा करण्याची प्रथा पूर्वीच्या काळात रुढ झाली. तसे नाही केले तर सगळी चांगुलपणाची व्यवस्था निरुपयोगी होईल. वाईटांना आवरण्यासाठी शिक्षा नाही तर इतर कोणता तरी अटकाव उपयोगात आणला पाहिजे. त्यावर सत्यवत बोलतो, तीन वर्ण क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्यांच्यावर ब्राह्मणांचे नियंत्रण असले पाहिजे. असे नियंत्रण कीं ते चांगुलपणाचे नियम आचरतील. साधारणपणे चांगुलपणाचे नियम मोडण्याची इच्छा होते ती स्वार्थाच्या प्रेरणेने. जर स्वार्थ साधण्यासाठी ते नियम मोडत असतील तर त्याला आवरणे सोपे नसते. ज्या शिक्षा सांगावयाच्या त्या अशा असतील कीं, त्याने त्याचा नाश होणार नाही पण त्याला सुधारण्यास संधी मिळेल. स्वार्थ अशी चीज असते कीं, तिचे नियंत्रण सोपे नसते. जर मृत्यूदंड देण्याची शिक्षा असेल तर त्यामुळे भिती इतरांत उत्पन्न होईल अशी साधारण अपेक्षा असते परंतु, ते नेहमीच होत नाही. एका गुन्ह्यासाठी त्याला ठार मारले तर त्याच्या बरोबर त्याचे आप्तसुद्धा जीतेजी मारण्यासारखे असते. त्यातून सुडाची

भावना त्या आप्तांत उत्पन्न होऊन आणखीन मोठे गुन्हे भविष्यात होण्याची शक्यता असते. त्यात कांहीं अजाणता (चांगुलपणाच्या नियमांचे ज्ञान नसण्यामुळे) स्वार्थ साधण्यासाठी ते नियम मोडत असतात. त्यात न्याय देणारा ब्राह्मण स्वार्थाने प्रेरीत होऊन त्याच्या अधिकाराचा गैरफायदा घेण्याची शक्यता असतेच. स्वताच्या उच्चतेचा खोटा अभिमान ब्राह्मणांत निर्माण होणार नाही असें कसे म्हणता येईल? चांगुलपणाच्या व्यवहारात परस्पर स्वार्थांची खेचाखेची मोठा व्यत्यय असतो. दोन स्वार्थांचे द्वंद्व अशा परिस्थितीत पहावयाला मिळते. त्यासाठी दोषीला त्याच्या स्वार्थ साधण्याच्या कामात सुधारणा करण्यासाठी संधी दिली पाहिजे असे सत्यवताला वाटत होते. कोणाचा स्वार्थ अधिक महत्वाचा त्याचे नैतिक नियम कसे ठरवावयाचे हा सुद्धा एक बिकट प्रश्न असतो. चूक करणारा एकदम वाईट आहे असे ठरवून त्याला शिक्षा करणे अयोग्य आहे, असें सत्यवत सांगतो. त्याला सुधारण्यासाठी संधी द्यावयाची आणि जर तो सुधारत नाही असें दिसले तरच त्याला जबरी शासन करावे असे तो सुचवतो. न्याय देणार्यांची सुद्धा परोपरीने तपासणी होत असली म्हणजे त्यांच्यात दुषित स्वार्थ उत्पन्न होणार नाही. समाजातील श्रेष्ठी चुका करत असतील तर त्याना त्यांच्या योग्यते प्रमाणे कष्टदायक भारी सजा केल्या पाहिजेत. त्यांना क्षमा करण्यात येऊ नये किंवा सूट दिली जाऊ नये. तसे केल्याने इतर जनांत राजाबद्दल विश्वास उत्पन्न होण्यात मदत होईल. चांगुलपणाची लढाई स्वार्थांच्या प्रेरणेशी असते. त्यासाठी माणसाचे स्वार्थ त्याने कसे साध्य करावेत त्याचे संस्कार समाजातील लोकांच्या शिक्षणाने केले गेले पाहिजेत. द्युमत्सेन बोलतो कीं, त्यासाठी मृत्यूदंड हांच उपाय आहे. त्याच्या दहशतीने मनुष्य त्याच्या स्वार्थापायी चांगुलपणा सोडणार नाही. तसे नाही केले तर कायद्याची भिती जी माणसाला शिस्तीत ठेवते ती रहाणार नाही. अशा ठिकाणी प्रेमळपणा ह्या चांगुलपणाचा विपरीत परिणाम होईल. फार प्राचीन काळी म्हणजे कृत युगात माणसे त्यांच्या स्वार्थाच्या मर्यादा स्वताहून पाळत असत परंतु, पुढे त्रेतायुगात तसे राहिले नाही व राजाला त्यासाठी कायदे करावे लागू लागले. लोकांत प्रामाणिकपणा जो चांगुलपणाचा एक हिस्सा आहे स्वाभाविकपणे होता तो कमी होत गेला. पुढे परिस्थिती अशी आली कीं, केवळ दटावून माणसांना मर्यादीत करणे शक्य होते तो द्वापार युगाचा काळ होता. त्यानंतर

माणसाला त्याच्या मर्यादा समजावण्यासाठी दंड करणे जरुरीचे झाले. त्याकाळातील चोर देव धर्म मानत नव्हते. अशा गोष्टीची त्यांना भिती राहिली नव्हती. देव वगैरे कांहीं नसते त्या केवळ माणसाच्या कल्पना असतात, ते समजून गेले होते त्यामुळे त्याना ते दाद देत नव्हते. अशा काळात चोरांना आवरण्यासाठी जबरी शिक्षा करणे क्रमप्राप्त होईल तो काल कलियुगाचा असणार.

सत्यवत विचारतो, "अशां निगरगट्ट चोरांना एकाद्या यज्ञात आहुती देऊन समाजात शिस्त येईल कां"? चोर आणि लुटारू वाढतात जेव्हां राज्यात रितसर उपजिवीकेची साधन रहात नाहीत. म्हणून ती उपलब्ध कशी होतील त्याची व्यवस्था शासनाने करावयाची असते. केवळ शिक्षा करून कांहीं साध्य होत नाही. असा राजा जो जनतेसाठी सर्वप्रकारची उपजिवीकेची साधन सदोदीत उपलब्ध ठेवतो त्याच्या राज्यात चांगुलपणा वाढत जाईल. ज्या राज्यात चोर्या डकाई जास्त होते त्या राज्याच्या राजाला राज्य करता येत नाही असे समजावे. जेव्हां प्रस्थापित राज्य व्यवस्थेवरील श्रद्धा संपते तेव्हांच तसा मनुष्य कायदेकानू मानण्याचे नाकारतो. साधारणपणे मनुष्य त्याच्या दृष्टीने श्रेष्ठ असलेल्यांचे अनुकरण करतो. राजा त्यासाठी त्याच्या कार्यात श्रेष्ठ ठरला पाहिजे. त्यासाठी तो उत्तमगुणी असला पाहिजे. केवळ कठोर शिक्षा देऊन समाजात शिस्त येत नाही. राजाला नितीमत्तेची शिस्त असली तरच त्याच्या प्रजेला शिस्त येईल. ज्या प्रजेला (स्वार्थ नियंत्रणाची) शिस्त आहे त्या राज्यात सगळे सुखाने राहू शकतात. अरे सत्यवता, प्रथम राजाने स्वताचा स्वार्थ नियंत्रित केला पाहिजे. म्हणजे त्याचे पाहून इतर त्यांच्या निजी स्वार्थाला मर्यादा घालतील. म्हणतात ना, "यथा राजा तथा प्रजा", ते सत्यात उतरेल. जेव्हां कोणताच उपाय काम करत नाही तेव्हां तो राजा चोरांना जबरी शिक्षा करू शकतो.

मोक्ष धर्म पर्व भाग चौर्याण्णवावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पंच्याण्णवावा

युधिष्ठीर बोलतो, "तुम्ही मला आधीच सांगितले आहे योग कसे साध्य करावयाचे ज्यामुळे ते सहा विशेष गुण माणसात येतील. त्यामध्ये कोणालाही दुःख होणार नाही असे कोणते आहेत त्याबद्दल मला पुन्हा एकदा सांगा. त्याशिवाय गृहस्थी जीवन आणि योगिक जीवन त्यातील कोणते मोक्षाच्या दृष्टीने जास्त श्रेयस्कर आहे ते सांगा.

भिष्म बोलतो, गृहस्थ जीवन आणि योगी जीवन दोनही त्यांच्यापरीने श्रेष्ठ असतात. त्यांचे पालन करणे सोपे नसते. परंतु, जर त्यांचे यथायोग्यतेने पालन केले गेले तर त्यांची फळं उत्तम असतात. त्यांच्या श्रेष्ठते बद्दल मी तुला कांही सागणार आहे. म्हणजे तुझ्या शंकांचे निरसन होईल. जे सांगतो ते नीट ऐक युधिष्ठीरा, असे सांगतात कीं, फार प्राचीन काळी जेव्हां त्वश्त्री देवता राजा नहुषाला भेटावयास गेली, राजा त्याचे कर्तव्य करण्यासाठी त्या देवतेसाठी एक गाय कापणार असतो. कारण तसे वेदांत सांगितले आहे कीं, गाय हे उत्तम खाद्य आहे. त्यासाठी ती गाय बांधून ठेवलेली होती. ते ऋषी कपिल पहातात. त्याच्या चांगुलपणाच्या स्वाभावामुळें ते बोलतात, "अरे देवा"! त्याच वेळी दुसरे ऋषी स्युमरष्मी गायीचे रुप घेऊन तेथे येतात. त्याला (कपिलाला) बोलतात, "अरे जर अशाप्रकारे गाई मारावयाचे वेदांत आदेश आहेत मग त्या वेदांतील चांगुलपणाचे काय झाले"? "जे लोक तपस्या करत आहेत, जे बुद्धिमान आहेत, जे श्रृती समजतात, ज्यांची दृष्टी चांगुलपणा समजते, ते त्या वेदांना देवांची वाणी समजतात, त्यात गाय कापण्याचे दिले आहे. ते कोणत्या लाभासाठी"?

कपिल ऋषी बोलतात, कृपया वेदाला दोष देऊ नका, मी त्यातील वचनांच्या विरुद्ध कांहीं बोलणार नाही, असें सांगतात कीं, "निरनिराळ्या आश्रमांच्या लोकांसाठी जी कर्तव्ये सांगितली आहेत ती अखेरीस एकाच उद्देशाने दिली आहेत. सन्यासी काय, बैरागी काय, ब्रह्मचारी काय आणि गृहस्थी काय सगळ्यांचा उद्देश एकच असतो, मोक्ष प्राप्ती. म्हणून त्यांना देवयान मार्ग असें म्हणतात. फक्त फरक असतो तो त्यांच्या विविध कार्यक्षमतेत. कोणाचा मार्ग जास्त प्रभावी असतो दुसर्यापेक्षा इतकेच. हे लक्षात

ठेवून कोणी त्याचा मार्ग अनुसरेल तर ते योग्य असते. अशा गोष्टींपासून दूर रहाणे जर योग्य असेल तर त्या करणे कसे योग्य ठरते? अशा परिस्थितीत वेदांचा अर्थ समजणे फार मुष्कील होते. जर तुझ्याकडे असा कांहीं मार्ग असेल ज्यात कोणालाही त्रास न होता तू तुझे कार्य करू शकतोस तर तो मार्ग मला दाखव".

स्युमरष्मी बोलतो, स्वर्गाच्या इच्छेने कोणी यज्ञ करतो. असें मी सतत ऐकत आहे. प्रथम त्याचे फळं काय ते पहावे लागेल. त्या फळांसाठी यज्ञ केला जातो. त्यासाठी गाय, बोकड, घोडा, कांहीं पक्षी तसेंच वनस्पती, जडीबुट्टी असें याज्ञात वहावयाचे असतात. असें मी ऐकत आहे. त्याच वेळी श्रृती सांगते कीं, प्राणी व वनस्पती यज्ञाचे भाग आहेत. विधात्याने ते एकाच वेळी यज्ञासाठी उत्पन्न केले आहेत. त्या विधात्याने देवांना प्रथम यज्ञ करावयाला सांगितले होते. त्यासाठी कांहीं सात पाळीव (गाय, बोकड, नर, घोडा, मेंढा, खेचर, आणि गाढव) व कांहीं सात जंगली प्राणी (सिंह, वाघ, डुक्कर, रेडा, हत्ती, अस्वल आणि माकड) वधासाठी योग्य म्हणून सांगितले आहे. त्यामध्ये सगळे प्राणी व सगळ्या वनस्पती योग्य म्हणून सांगितलेले नाही. त्यातसुद्धा कांही बळीसाठी जास्त चांगले असे दिले आहे (गाय व घोडा). पुढे वेद सांगतात कीं, सगळे जग व त्यातील सगळे प्राणी आणि वनस्पती हे एका महायज्ञातील बळी आहेत व तो महायज्ञ सतत होत आहे म्हणून ते चराचर मरत आहेत. म्हणजे माणसांने नाहीं केले तरी ते चराचर मरणारच म्हणून, त्यांच्या मृत्यूचे फार कांहीं समजण्याची आवश्यकता नाही. त्या महायज्ञाचे यजमान साक्षात ब्रह्मदेव आहेत आणि ऋद्विज आहेत यम आणि हर. तो यज्ञ साक्षात देव करत असतात. माणसाच्या यज्ञाचा जास्त बाऊ करण्याचे कारण नसते. पुढे तो ऋषी सांगतो मनुष्यसुद्धा त्यात बळी जात आहे यथाक्रमे. प्रश्न मरण्याचा नसतो, प्रश्न आहे दुःखाचा. दुःख न देता बळी द्यावेत म्हणजे तो विधात्याच्या वैश्विक यज्ञाचा भाग ठरतो व त्याला कांहीं दोष लागत नाही. श्रृती सांगते कीं, यज्ञाशिवाय हे जग चालत नाही. माणसाने केलेले यज्ञ त्या वैश्विक यज्ञाचा भाग असणे जरूरीचे असते, जर तसे नसेल तर तो माणसाने केलेला यज्ञ व्यर्थ समजावा. जे यज्ञ स्वार्थातून केले जातात त्यात दिलेले बळी पापकारक ठरतात. यज्ञात दिली जाणारी पशु हत्त्या अहिंसक असावी लागते तरच ती ब्रह्माला मान्य असते.

ज्या यज्ञात पशू मरतांना तडफडतात तो यज्ञ पापकारक ठरतो, त्यामुळे ते करणारे यजमान आणि ऋद्विज दोघेही बरबाद होतात. पुढे तो बोलतो, कीं, त्याने ऋषींनी लिहीलेले वेद जे स्मृतीत आहेत, जे ब्राह्मणांनी मान्य केले आहेत त्याचा दाखला देत आहे. ओम ह्या शब्दात यज्ञ अभिप्रेत असतो. म्हणून सगळ्या विधींची सुरूवात ओम (ॐ) ने होत असते. जे ओंकाराच्या उद्गाराने त्यांचे यज्ञ सुरू करतात ते त्यांचे हे आणि पुढील जीवन संपन्न होते. तुम्ही जाणता अग्निहोत्र सोमाच्या यज्ञात किती महत्वाचे असते. त्यासाठी प्राण्याचे बळिदान यज्ञात झाले म्हणून तक्रार करण्याचे कारण नसते. जे यज्ञ करत नाहीत त्यांचे जीवन ह्या आणि नंतरच्या काळातील, संभ्रमावस्थेत जाते. त्याचप्रमाणे वासनांचा यज्ञ करणे तितकेच उच्च दर्जाचे मानले जाते हे सुद्धा महत्वाचे आहे. जो वासनांचा यज्ञ करतो (वासनांचे बलिदान करतो, वासनांचा त्याग करतो) तो प्राण्यांच्या बलिदानापेक्षा जास्त श्रेष्ठ ठरतो.

मोक्ष धर्म पर्व भाग पंच्याण्णवावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व

## भाग शहाण्णवावा

ते ऐकून कपिल मुनी बोलतात, आपल्या कोणत्याही कर्माची फळं तात्पुरती असतात हे जो समजतो तो त्यात फार काळ रमू शकत नाही. यती मात्र संयमाने आणि मनोनिग्रहाने ब्रह्मापर्यंत ज्ञान मार्गाने जातात. असे कांहीं नाही जे त्याना अडवू शकतील. त्यांच्या अथक प्रयत्नाने ते सगळ्या अडचणींवर मात करून त्यात यश मिळवतात. ते कोणाही प्राण्यापुढे नमत नाहीत. त्यांच्या सूज्ञ बुद्धीने ते सगळे मिळवत असतात. त्यांचे निष्पाप जीवन त्यांची अध्यात्मिक शक्ती वाढवत असते. तसे ते चिरानंदात असतात. त्यांच्या वैराग्याबद्दलच्या कल्पना निश्चित झाल्या होत्या. ब्रह्माला वाहिलेले ते ब्रह्मात विलीन झालेले होते. दुःख, रजोगुण ह्यांपासून ते मुक्त असतात. जे इतक्या उच्च अवस्थेत गेलेले असतात त्यांना गृहस्थी कर्तव्यांचे बंधन उरत नाही. स्युमरष्मी विचारतो, "जर ते अंतिम ध्येय असेल तर गृहस्थी जीवनाचे महत्व जास्त असले पाहिजे. कारण ते असे आहे ज्याच्या शिवाय इतर कोणतेही आचरणे शक्य नसते. सगळे प्राणी त्यांच्या मातांवर अवलंबून असतात. जे गृहस्थी जीवनाचे अंग असते. इतर तीन जीवन पद्धती सुद्धा समाजातील गृहस्थांच्या मदतीवरच अवलंबून असतात. सुखासाठी जे कांहीं केले जाते ते सगळे गृहस्थी जीवनाशी निगडीत असते. संतति हे गृहस्थीचे अंतिम ध्येय असते. त्याशिवाय जग व जीवन अधूरे असते. संतति होण्यासाठी दुसरा कोणताही जीवन प्रकार उपयोगाचा नसतो. सगळ्या वनस्पति, सगळ्या प्रकारचे चराचर त्यांच्या पद्धतीच्या गृहस्थी जीवनात प्रजनन करत असतात. केवळ मनुष्य गृहस्थ असतो असें समजू नका. त्याशिवाय हे जग त्याचे व्यवहार करू शकणार नाही. त्यामुळे मोक्षाच्या आधी गृहस्थी जीवनातून जाणे अपरिहार्य आहे. जे गृहस्थी जीवनाबद्दल आकस बाळगतात त्यांच्या अज्ञानामुळे, ज्याना तपस्येच्या मर्यादा समजलेल्या नाहीत तेंच बैरागी जीवनाचे समर्थन करत असतात. परंतु, ज्यानी त्यांच्या गृहस्थी जीवनाची कर्तव्ये पूर्ण केली व नंतर बैरागी झाले ते वेगळे धरावेत. कित्येक ज्ञानी जन्मताच पुज्य ठरलेले आहेत. गर्भाधान विधी, वेदीक मंत्र, ब्रह्मणाच्या जन्मापासून आवश्यक समजले गेले आहेत. तेथ पासून

मरणा पर्यंत वेदिक मंत्र उच्चारणे आवश्यक समजले गेले आहे. तरच त्याला योग्य दुसरा जन्म मिळतो. तीन प्रकारचे पितर जसे, अर्चीश्मत, वर्हीशद, क्रव्यद ह्यांच्या समाधानासाठी वेदीक मंत्र उच्चारणे जरूरीचे असते. त्याशिवाय त्याला मोक्ष प्राप्ती होणार नसते. त्यामुळें त्याचे जे ऋण असते पूर्वजांसाठी, देवांसाठी आणि ऋषींसाठी ती फेडली जात नाहीत. म्हणून वेद आणि त्यातील रितीरीवाज ह्यांना कोणी आव्हान देऊ नये. अशा गैर गोष्टी ते करतात ज्यांची मति भ्रष्ट झाली आहे सगळे शिकूनसुद्धा. यज्ञात जे प्राणी मारले जातात त्यांनासुद्धा उत्तम गति मिळत असते म्हणजे त्यांचेसुद्धा कल्याण होत असते. असेंच इतर कारणाने ते मेले तर त्यांना तशी उत्तम गति मिळणार नसते म्हणजे यज्ञात मरणारे प्राणी मोठे भाग्यवान समजले गेले आहेत. परंतु, त्या प्राण्याला वेदना झाल्या तर जरी मरणारा प्राणी उत्तम गतिने गेला तरी तो यज्ञ करणारा व त्याचे ऋद्विज मात्र त्या यज्ञाच्या फळांना मुकतात. म्हणून वध विधी अहिंसक हत्त्या ह्या पद्धतिनेच झाला पाहिजे. वेदांचा अपमान करणारे कधीच मोक्षाकडे जाऊ शकत नाहीत. कपिल विचारतात, "त्याशिवाय पौर्णमासा, अग्निहोत्र, चातुर्मास असे विधी उत्तमगति साठी सांगितले आहेत ज्यात हत्त्या करावी लागत नाही, मग असे हत्त्या करावयाला लावणारे विधी करण्याची आवश्यकता का वाटते? जे संन्यासी झाले आहेत ते असे यज्ञ विधी ज्यांत हत्त्या करावी लागते ते न करतासुद्धा ब्रह्मापर्यंत जात असतात हे आपण जाणता, मग गृहस्थांना ते करावयास कां वेद सांगतात"? त्याचप्रमाणे ते ऋषी, पितर तशा हत्त्याकारी यज्ञांची कां अपेक्षा करत असतात"? देवांनासुद्धा समजत नाही ब्रह्माकडे कसे जावयाचे जो सगळ्या चराचरांना समान दृष्टीने पहात असतो. त्याच्याशी जुगार खेळण्याचा प्रयत्न करावयाचा नसतो. मनुष्य त्याचे चार दरवाजे पोट, दोन हात आणि लिंग, असे ते आहेत सुनियंत्रित ठेवतो तोंच ब्रह्माकडे सहज जात असतो. ज्याचे तसे नियंत्रित जीवन नाही त्याचा मोक्षाचा मार्ग अवघड असतो. ज्याने त्याच्या इंद्रियांचे संयमन केले आहे जो जमिनीवर झोपतो. जो उघडा रहातो, जो त्याच्या हाताची उशी करतो व शांतपणे निजतो त्याला देव ब्राह्मण समजतात. यज्ञाचा विचार करता, त्याची इतर अंग समजून घेतली पाहिजेत. त्याशिवाय यज्ञ करून कांहीं उपयोग नसतो. स्युमरष्मी पुढे बोलतो, "वेदात काय करावे आणि काय करू नये ते सांगितले आहे.

बर्याच वेळा त्यात दिलेल्या गोष्टी परस्पर विरोधी असतात, उदाहरणार्थ गृहस्थ जीवनाचे समर्थन करतां वेद बैराग्याचेसुद्धा कौतुक करत असतात. त्यामुळे नवशिक्यांचा गोंधळ होत असतो. त्याबद्दल मला तुम्ही जास्त काय सांगाल ते मला ऐकावयाचे आहे.

कपिल सांगतात, "चांगुलपणाचा मार्ग तू निवडलास कां तुला त्याचे चांगले परिणाम जाणवू लागतात. परंतु, त्याचे इतर काय परिणाम असतात ते तू सांग".

स्युमरष्मी बोलतो, "अहो ब्राह्मणा, माझे नांव आहे स्युमरष्मी, मी ज्ञान मिळवण्यासाठी आलो आहे. माझे भले करण्याचा त्यात उद्देश आहे. मी वाद करण्यासाठी किंवा तुम्हाला आव्हान देण्यासाठी अथवा शिकवण्यासाठी बोलत नाही. माझ्या मनात कांहीं शंका आहेत. त्यांचे समाधान आपण करावे असे मला वाटते. चांगुलपणाचा मार्ग ज्याने ब्रह्माकडे जाता येते त्याची लक्षणं कोणती जी आपण स्वतः अनुभवली आहेत. मी आगमशास्त्रं अभ्यासली आहेत. त्यात वेदातील रहस्यांचा उलगडा केला आहे महादेवाने, कांहीं आगमात विष्णू वेदातील रहस्य सांगत आहेत. त्यामध्ये तर्कशास्त्र वापरलेले आहे ज्यामुळे वेदातील योग विद्या चांगली समजते. चार जीवनपद्धती मध्ये रहात असतांना त्याचवेळी आगमशास्त्राचेसुद्धा आकलन करणे आवश्यक असते. त्यामध्ये दिलेले आचरण्याने जे यश प्राप्त होते त्याला तोड नाही. त्यातच आगम शास्त्राचे गमक आहे. जशी एकादी होडी जर दुसर्या होडीला बांधलेली असेल तर ती त्या दुसर्या होडीच्याच दिशेने जात रहाते व ती कधीच तिच्या गंतव्य स्थानी जात नाही त्याप्रमाणे ऐहिक जीवनात रमलेला योगात कधीच यशस्वी होत नाही. त्याबद्दल मला तुमचे विचार सांगा. जसा शिक्षक शिकवतो तसे तुम्ही मला शिकवा. असा कोणीही नाही ह्या जगात जो खर्या अर्थाने पूर्णपणे सुखी झाला आहे अथवा त्यागात सुद्धा पूर्ण आहे. कोणी असा नाही जो खरोखरच दुःखापासून पूर्णपणे मुक्त आहे. कांहींतरी दुःख प्रत्येकाला त्रास देत असते. पूर्णपणे रोग व्याधी मुक्त आहे असा कोणी मला अजून भेटला नाही. पूर्णपणे समाधानी असा कोणी मला दिसत नाही. म्हणून मला सांगा सुख कशाला समजावयाचे? चार वर्णाचे आणि चार आश्रमाचे असणारे सारख्याच त्रासात असतील तर हे विभाजन कशासाठी करावयाचे"?

कपिल सांगतात, "ज्याचा जो वर्ण अथवा आश्रम, तो ते राजीखुषीने आचरत असतो. त्यात दिलेले नियम पाळत असतो, असे असेल तर ते व्यर्थ जात नाही. ते करत असतांना त्याला त्या मार्गाचे ज्ञान मदत करत असते. तू जे आजवर शिकलास त्याने तुला समजले कां कीं, ह्या जगाचे एकच सत्य आहे"? शास्त्रांचा योग्यप्रकारे अभ्यास न केलेले त्यांच्या अहंकारापायी खोट्या वादात त्यांचा समय व्यर्थ घालवत असतात. असे त्यांच्या अज्ञानावर आधारीत खोटी शास्त्रं लिहीत असतात. ते स्वतः मार्गभ्रष्ट झालेले इतरांनासुद्धा तसेच करण्याचे सांगत असतात. तसे लोक तमोगुणी असतात. त्याच्या त्या अज्ञानी अवस्थेमुळे त्यांच्यात वासनांचा उद्रेक होत असतो. त्यात क्रोध, गर्व, द्वेष, मिथ्याचार, फुशारकी असें दोष उत्पन्न होतात. शिक्षकाच्या मदतीने जे अभ्यास करतात त्यांना ते सगळे दोष समजतात. त्यांपासून ते दूर रहाण्याचा प्रयत्न करत असतात. यति योगाचा आधार घेतात ते त्या चांगल्या आणि वाईटांतून मुक्त रहातात.

स्युमरष्मी विचारतो, अहो ब्राह्मणा, मी जे विचारत आहे संन्यासाश्रमाबद्दल ते शास्त्राच्या संदर्भात आहे. परंतु, त्यात दिलेले जोवर व्यवस्थितपणे समजले नाही तोवर चूका होत रहाणार. जर ते व्यवस्थित समजले तर त्याचे पालन करता येते. जे तर्कात बसते ते श्रृतीमध्ये सुद्धा बसते. कांहींजण त्यांच्या अकलेला पटते तेंच श्रृतीमध्ये दिले आहे असे समजून त्यांची कामं करत असतात जरी ते तसे नसले तरी. कांहीं ज्या श्रृतीने अयोग्य सांगितल्या त्यासुद्धा ते करत असतात कारण त्या त्यांच्या मते योग्य आहेत. तुमचे आत्म्याचे ज्ञान असल्याने ते नसलेले आणि तुम्ही ह्यांच्या विचारात किती फरक जाणवतो ते पहा. आपला सूज्ञपणा अप्रतिम आहे. त्यामुळे जे तुम्ही मला सांगितले त्याने माझा भ्रमनिरास झाला आहे. माझ्या मनाला शांती मिळाली आहे. साधारणपणे आपल्याला आत्म्याचे योग्य ज्ञान न झाल्याने एक योगी त्या अंधारात चरफडत असतो. तरी जे आपण आचरण्यासाठी सांगितले आहे ते सोपे नाही. ज्याने नितीशास्त्राचा अभ्यास केला आहे, जो त्याची आश्रमाची कर्तव्ये पार पाडत आहे, जो त्याच्या वर्णाची कामं योग्य प्रकारे पार पाडतो तो वेदाचे ज्ञान समजू शकतो. जे लोक प्रपंचात त्यांच्या आप्तांत त्यांच्या मोह व लोभात अडकलेले असतात त्यांना हे सगळे मुष्कील आहे. त्याने कितीही दानं केली, यज्ञ केले, वेदाचा अभ्यास केला तरी ते व्यर्थ आहे जोवर तो

संन्यास मार्गाकडे जात नाही. ते न मिळाल्यामुळें तो नास्तिक होऊ शकतो. मला आणखीन समजून घ्यावयाचे आहे वेदांत आत्म्याबद्दल काय दिले आहे? मला तुमच्याकडून सत्य समजून घ्यावयाचे आहे. अहो ब्राह्मणा, मी तुमच्या पायाशी बसून ते आत्मसात करण्यासाठी उत्सूक आहे. मी आपला शिष्य होऊ इच्छितो. मला ते ज्ञान शिकवा. आत्मा आणि मोक्ष ह्या बद्दल जे तुम्हाला ठाऊक आहे ते सगळे मला शिकवा".

मोक्ष धर्म पर्व भाग शहाण्णवावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सत्त्याण्णवावा

कपिल पुढे सांगतात, वेद अंतिम ज्ञान आहे असे सगळे मानतात. कोणीही वेदांचा निषेद करत नाहीत. ब्रह्माच्या दोन बाजू आहेत, एक व्यक्त जे ध्वनिने (प्रयोगांनी) जाणवते व दुसरे अव्यक्त जे फक्त अनुभवानेच जाणू शकतो. ज्याला व्यक्त ब्रह्माचे ज्ञान झाले तो परमेश्वरापर्यंत गेला असे समजावे. गर्भादान विधी करून नुकत्याच जन्मलेल्या अर्भकाचे शरीर शुद्ध केले जाते. त्यात विविध मंत्राने त्या बालकाच्या शरीराचे अवयव शुद्ध केले जातात. त्यासाठी वेदातील मंत्र वापरले जातात. तशारितीने शुद्ध झालेला तो बालक ब्राह्मण समजण्यास योग्य ठरतो. असा बालक वेदाचा अभ्यास करण्यासाठी उचित ठरतो. अशा विधींमुळे आत्म्याचे शुद्धिकरण होत असते तसा आत्मा मोक्षप्राप्तीसाठी लायक समजला जातो. अशा विधींमुळें चित्तशुद्धी खरोखरच होते कां? त्याबद्दल सांगतो. ते समजण्यासाठी त्याला स्वताला प्रयत्न करावे लागतात. केवळ वेदाच्या अभ्यासाने अथवा यज्ञ करून ते समजणार नाही. जर तो पूर्णतया निरीच्छ असेल, सर्वप्रकारच्या वासनांबद्दल औदासिन्य त्याच्यात असेल, कोणत्याही ऐहीक गोष्टीबद्दल कौतुक अथवा कुतूहल त्यास नसेल तरीही त्या सगळ्या बाबींबद्दल तिरस्कार सुद्धा नसेल, यज्ञ तो केवळ एक कर्तव्य म्हणून करतो, सत्पात्र दानं करतो, कोणत्याही पापकृत्याबद्दल अनास्था आहे, त्याचा क्रोध, भूक, भिती, शरीराच्या गरजेपुरत्या मर्यादीत आहेत, ज्याची आस्था योगशास्त्राकडे आहे, जो त्याची स्वताची इतरांशी तुलना करत नाही, तर तो मोक्षप्राप्तीसाठी तयार आहे असे समजावयाचे. असे कितीतरी गृहस्थ आणि गृहीणी आहेत जे त्याप्रकारचे जीवन जगत असतांना योगसाधनासुद्धा करत असतात. त्यात अनेक राजे आहेत. जनक राजा त्यातलाच एक आहे. त्याप्रमाणे कित्येक गृहस्थी ब्राह्मण आहेत जसे याज्ञवल्क्य ज्यानी शुक्ल यजूर्वेद दिला. त्यांची श्रद्धा दोनही प्रकारच्या ब्रह्मावर असते. त्यांचे जीवन व्रतस्थ असते. चांगुलपणाच्या सगळ्या प्रकारात ते तरबेज असतात. आपत्काळीसुद्धा ते दिलेले वचन मोडणारे नव्हते. त्यातच ते सुख मानत होते. कारण सुख व दुःख ह्या कल्पना असतात ज्यांच्या मानण्याने माणसाचे जीवन सुखी अथवा दुःखी होत असते. त्यांची

ब्रह्मावरील श्रद्धा पूर्ण असते. वेदाच्या मार्गदर्शनाप्रमाणे ते चांगुलपणाचे वर्तन ठेवतात त्यामुळें त्याना कधी पश्चात्ताप करावा लागत नाही. असे अनेक ब्राह्मण होऊन गेले आहेत फार प्राचीन काळी. त्याकारणांने ते ब्रह्माच्या फार जवळ गेलेले होते. श्रृतीच्या सांगण्याप्रमाणे ते तपस्या करत होते, त्यामुळें त्यांनी त्यांच्या उर्वरीत (जरूरीपेक्षा जास्त, शरीराच्या संवर्धनासाठी कांहीं वासना आवश्यक असतात) वासनांवर ताबा मिळवला होता. जे त्यांच्या गृहस्थाश्रमीच्या काळात सदाचाराने जगत होते तें पुढे संन्यासाश्रमात प्रवेश करतात. जे वानप्रस्थाश्रमात जातात त्यांना सुद्धा उत्तम गति प्राप्त होते. अशाप्रकारे सगळ्या चारही आश्रमात त्याला चांगली गति मिळते असे ते ब्राह्मण ठरतात. त्यांना मिळणारा दुसरा जन्म शुद्ध वंशात होतो. तेथून त्याची अध्यात्म साधना पुढे चालू रहाते. अशाप्रकारे केवळ वर्तणूकीने ब्राह्मण ठरत असतो. जो ऐहीक सुखाच्या मागे लागत नाही कारण त्याला अध्यात्मिक विकासाची ओढ लागली आहे, तो कोणत्या वर्णाचा आहे अथवा कोणत्या आश्रमात आहे हे महत्वाचे नसते. तो ब्राह्मणच समजला जातो, जरी त्याला वेदाचा अभ्यास करणे शक्य नसले. मोक्ष साधना करण्यासाठी वेदाचा अभ्यास उपयोगाचा असला तरी अनिवार्य नसतो. मात्र मोक्षाची प्रामाणिक इच्छा अनिवार्य असते. ऐहीक जीवनातील समाधान कांहीं प्रमाणात उपयोगाचे असले तरी केव्हां ते समाधान संपुष्टात येईल व त्याच्या इच्छा उद्दिपित होतील ते सांगता येणार नाही. ते समाधान कायम असेल व मोक्षाची इच्छा तीव्र असेल तर ते त्याला आत्म्याचे ज्ञान मिळवून देण्यात उपयोगाचे ठरते. त्यासाठी योग्य मार्गदर्शन शिक्षकाकडून घ्यावयाचे असते. ज्याची निरीच्छितता कायम असते तो मोक्षाच्या दिशेने जाऊ शकतो. साम, दाम, उपराम, तितिक्षा, श्रद्धा, आणि समाधी ह्या अवस्थांतून तो जात असतो. त्यानंतर तो तुरिया अवस्थेत जातो ज्यावेळी त्याला सुशुप्ती प्राप्त होते.

स्युमरष्मी  बोलतो, "जे धनाच्या लोभापासून मुक्त झाले आहेत, जे दानं करत आहेत, जे यज्ञ करत आहेत, जे वेदाच्या अध्ययनात रमले आहेत आणि वैराग्यपूर्ण जीवन स्वीकारले आहे ते स्वर्गात जातात असे सांगतात, मला सांगा ते खरे आहे कां"?

कपिल बोलतात, गृहस्थी जीवन जगणारे तितकेच उच्च असतात जितके संन्यासी आणि बैरागी असतात. परंतु, त्यागपूर्ण जीवन ते जगू शकत नाहीत त्यांना ऐहिक कर्तव्यांचे बंधन

असते. त्यासाठी ते धन मिळवण्यात त्यांचा समय देत असतात. बैराग्याचे बिनधास्त जबाबदारी नसलेले जीवन त्याला मिळत नाही. तो सतत त्याच्या कर्तव्याच्या बंधनात बंदिस्त असतो.

स्युमरष्मी बोलतो, "आपण ज्ञानमार्गी अहात. तुमचे ज्ञान तुम्हाला मोक्षाकडे नेते. जे गृहस्थाश्रमी असतात ते कर्ममार्गाने जात असतात. असे असले तरी सांगतात कीं, सगळे आश्रम अखेरीस मोक्षाकडे जातात, ते मी कसे मानू"?

कपिल बोलतात, कर्म माणसाचे अंतर्यामी शुद्धीकरण करत असते. त्या शुद्धीकरणानंतर तो सुद्धा ज्ञान प्राप्त करत असतो. ते त्याला स्वाभाविकपणे प्राप्त होत असते त्याच्या उपजत बुद्धीमुळें. ते समजते जसा तो क्षमाशिल, शांत, दयाळू, सत्यवादी, अहिंसक, खरेपणा, औदासिन्य, निगर्वीपणा, त्याग वृत्ती त्याच्या वागण्यातून व्यक्त करतो. कारण ह्या लक्षणात ब्रह्माचे अस्तीत्व लपलेले असते. ते व्यक्त होण्याचा अर्थ तो ब्रह्माकडे पोहोचत आहे. ब्रह्म त्यापेक्षा वेगळे नाही. त्यालाच ब्रह्म त्याच्या आचरणात आले असें समजले जाते. तो वेदाचा अभ्यास न करतासुद्धा वेदाचा ज्ञानी समजला जातो एरवी मनुष्य म्हणजे एक हवेचा भाता (श्वासोंश्वास करणारा) असतो. सगळ्या शास्त्रांत ते दिले आहे. हे जग आहे आणि नाहीसुद्धा असे वेद सांगतो. ज्ञानी माणसासाठी ते सत् आणि असत् ह्या संज्ञाने सांगितले जाते. त्यालाच ब्रह्म म्हणतात. ते कधी व्यक्त असते तर कधी अव्यक्त असते. ते पहाणार्याच्या योग्यतेवर अवलंबून असते. ब्रह्माच्या प्रभावाखाली गेलेला त्याच्या शरीराच्या नैमित्तिक (हगणं, मुतणं, झोपणं इत्यादि) व प्रासंगिक (अभ्यास करणे, अभ्यास शिकवणे, नोकरी धंदा करणे, मनोरंजन इत्यादि) कर्मात रमत नाही जरी त्या जीवात्मा पूर्ण करत असतो. त्या दोन गोष्टी एकाच वेळी होत असतात. म्हणजे तो खात असतांना खात नसतो, पित असतांना पित नसतो, मुतत असतांना मुतत नसतो, हगत असतांना हगत नसतो, एवढेच नाही तर तो झोपला असतांना झोपलेला नसतो. तसेंच नोकरी करत असतांना ती करत नसतो, तिला तुरीया अवस्था समजतात. त्याला इच्छा नसते आणि असतेसुद्धा. अशा विलक्षण अवस्थेत तो असतो. म्हणजे जीवात्मा करत असतांना आत्मा तेंच करत नसतो अशी परिस्थिती असते. तरीसुद्धा आत्म्याच्या अध्यात्मिक उर्जेचा उपयोग त्या कृत्यांसाठी होत असतो म्हणून आत्मा त्यात नसून सुद्धा असतो. अशा ब्रह्माला माझा नमस्कार असो.

त्याच प्रमाणे यज्ञांच्या बाबत सुद्धा असे असते कीं, सगळे यज्ञ ब्रह्माच्या प्राप्तीसाठी नसतात. कांहीं ऐहिक सुखासाठी, कांहीं लोकपाल देवतांना प्रसन्न करण्यासाठी, यक्षांना प्रसन्न करण्यासाठी असतात. तशा यज्ञात मांसाचा प्रसाद देण्यासाठी प्राण्याची आहूती देणे आवश्यक असते. अशा यज्ञांना तामसी यज्ञ समजले जाते. तेथे फळं, फुलं, पान असें वाहून कांहीं उपयोग नसतो. म्हणून यज्ञाचा प्रमुख उद्देश काय ते ठरवते कशाची आहुति द्यावयाची, मांसाची कां वनस्पतिची.

मोक्ष धर्म पर्व भाग सत्याण्णवावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग अठ्ठ्याण्णवावा

युधिष्ठीर विचारतो, "वेदामध्ये जे धर्म, हित आणि सुखाबद्दल विवेचन दिले आहे ते मला समजावून द्या. त्या तीनातील कोणते जास्त महत्वाचे असते व कशामुळे ते सांगा".

भिष्म सांगतात, त्याबद्दल मी तुला एक प्राचीन कथा सांगतो त्यात कुंद्धधर त्याच्या भक्तावर कृपा करतो. एकदा एक ब्राह्मण फार गरीब होता, पुण्य करण्याचा विचार करतो. त्याला वाटते कीं त्यामुळें त्याला धन मिळेल. त्यासाठी तो एक कठोर तपस्या करण्याचे ठरवतो. त्यासाठी तो देवतांची पुजा करू लागतो. तरी त्याला धनाचा लाभ होत नाही. तो स्वताशी बोलतो, हि अशी काय देवता आतापर्यंत कोणी तिची पुजा केलेली नाही, ती माझ्यावर कां प्रसन्न होत नाही"? ते बोलत असतांना त्याला त्या देवतेचा यक्ष पुढे दिसतो. तो यक्ष काळ्या ढगाच्या रुपात असतो. त्याचे नांव कुंद्धधर होते. त्या समर्थ यक्षाला पाहून तो ब्राह्मण मोठ्या श्रद्धेने मनातच बोलतो, "हा मला खात्रीने धन देणार". त्याची आजवर कोणी पुजा केली नसेल जशी मी केली आहे. म्हणून तो मला खूप संपत्ती देईल. तसे समजून तो ब्राह्मण त्या ढगाची पुजा करू लागतो. त्यासाठी तो धूप चंदन अगरबत्ती जाळतो फुलं वाहतो, आणि इतर प्रसादाचे त्याला देतो. त्या पुजेने तो ढग प्रसन्न होतो. तो त्या ब्राह्मणाला उद्देशून बोलतो, ज्ञानी लोक ब्राह्मण हत्त्या करणार्याला किंवा मद्य पिण्याला, चोरी करण्याला आणि उपकार विसरतो त्याला, व्रत तोडणार्याला माफी करत नसतात. तो ब्राह्मण कुसाच्या हतरंजीवर पडून सुशुप्तीमध्ये असतांना कुंद्धधराच्या कृपेने पहात असतो त्याला विविध प्राणी त्याच्या स्वप्नात दिसत असतात. त्याच्या तपस्येचे फळ त्याला मिळत असते. तो मणिभद्राला पहातो सगळ्या देवतांमध्ये. तेथे त्या देवता धन दौलत लोकांना वाटत असतात असे पहातो. त्याचप्रमाणे जे त्यांचे चांगले गुण विसरतात तेव्हां त्यांची सगळी संपत्ती ते काढून घेत असलेले सुद्धा तो पहातो. त्यानंतर तो पहातो कीं कुंद्धधर सगळ्या यक्षांच्या समोर देवापुढे वाकून पसरत जातो. मणिभद्र त्याला विचारतो, तुला काय

पाहिजे तेव्हां कुंद्धधर सांगतो कीं एक ब्राह्मण माझी फार पुजा करत असतो त्याला कांहीं संपत्ती द्यावी ज्यामुळे तो सुखी होईल. ते ऐकल्यावर मणिभद्र त्याला बोलतो कीं, तू उठ, तुझी प्रार्थना मंजूर झाली आहे. त्यावर कुंद्धधर मणिभद्राला सांगतो कीं, त्या ब्राह्मणाला धनापेक्षा पुण्याचे दान द्यावे ज्यामुळे तो सदैव सुखात राहिल. ते ऐकल्यावर मणिभद्र तेसुद्धा मान्य करतो. एवढे बोलून पुढे भिष्म सांगतात युधिष्ठीराला, कुंद्धधर पुन्हा पुन्हा ब्राह्मणांसाठी पुण्याचे वारदान मागत होता. त्यावर देव फार संतुष्ट होते, मणिभद्र त्याला बोलतो देव तुझ्यावर आणि ब्राह्मणांवर संतुष्ट आहेत, ह्यापुढे तो पुण्याचा धनी होईल. ते ऐकून कुंद्धधर फार संतुष्ट होतो . अशारितीने त्याला असा वर मिळाला होता जो कधी कोणाला मिळाला नव्हता. त्यानंतर त्या ब्राह्मणाला त्याच्या भोवती मुल्यवान चीजा विखूरलेल्या दिसतात. परंतु, त्याला त्यांमध्ये रस वाटत नाही. तो ब्राह्मण बोलतो, ह्या गोष्टींपेक्षा मी वनात जाऊन चांगुलपणाचे जीवन जगणे रास्त समजतो. भिष्म पुढे बोलतो, सगळ्या ऐहिक गोष्टींबद्दल औदासिन्य स्वीकारून तो वनात जातो. तेथे तप करू लागतो. देवतेची पुजा केल्यावर ती फळ व कंदमुळं तो खाऊन राहू लागतो. फक्त पुण्याचा मार्ग तो स्विकारतो. यथावकाश तो फळं आणि कंदमुळं सुद्धा सोडून देतो. पान खाऊन राहू लागतो. त्यानंतर पानंसुद्धा खाणे सोडून देतो. फक्त पाण्यावर राहू लागतो. त्यानंतर तो केवळ हवेवर जगत असतो. तरी त्याची प्रकृती उत्तम असते. पुण्याचा मार्ग आणि कठोर तपस्या असेंच त्याचे जीवन होते. त्यानंतर त्याला दिव्य दृष्टी प्राप्त होते. तो स्वताशी बोलतो, कोणावर मी प्रसन्न झालो असेन, तर मी माझी संपत्ती देईन हे माझे वचन आहे. तसे बोलल्यावर तो पुन्हा घोर तपस्या करू लागतो. पुन्हा तो त्यात यशस्वी होतो. तो विचार करतो कीं, मी जर कोणाला दुवा दिला तर तो ताबडतोब राजा होईल. कारण माझे वचन कधी खोटे होणार नाही. अशारितीने तो विचार करत असतांना कुंद्धधर त्या ब्राह्मणावरील प्रेमामुळें ज्याने घोर तपस्या केली होती, पुन्हा प्रकट झाला. त्याला पाहून तो ब्राह्मण त्याची पुजा करतो. त्यावेळी ब्राह्मणाला आश्चर्य वाटते कारण कुंद्धधर बोलतो , तुला दिव्य दृष्टी प्राप्त झाली आहे, त्या दृष्टीने तू राजांचे मृत्यू पाहू शकतोस. सगळे जग पाहून ये. त्यावर ब्राह्मण बोलतो, मी पाहिले आहे कीं, हजारो राजे त्यांच्या मृत्यूनंतर नरकात गेले

आहेत. कुंद्धधर बोलतो, "माझा भक्तीने तू पुजा केल्यानंतर तुला दुःख भोगावे लागले आहे, मी तुझ्यासाठी काय केले"? ते पहा ऐहीक सुखासाठी वाट्टेल ते करणारे कशा नरकात जातात. त्यांना स्वर्गाचे दरवाजे बंद होतात.

भिष्म पुढे बोलतात, तो ब्राह्मण अनेक लोक पहातो जे ऐहिक सुखासाठी धडपडत आहेत ते नरकात जात आहेत. त्यात वैश्य आणि ब्राह्मण खूप होते. कारण ते मिळवताना ते जी पाप करतात ती त्यांना नरकात सोडतात. कुंद्धधर पुढे सांगतो, अशा दुश्कृत्यांमुळें ते वासनांच्या साखळदंडात अडकत असतात. त्यांना देव घाबरतात. देव त्यांचा नाश करतात. देवांच्या मर्जीशिवाय कोणी पुण्यवंत होऊ शकत नाही. तू तुझ्या तपस्येने त्यावर विजय मिळवला आहेस. भिष्मपुढे सांगतात, ते ऐकल्यावर तो नम्र तपस्वी ब्राह्मण कुंद्धधरापुढे नमन करतो. त्यांने मोठी कृपा केली असे तो त्याला बोलतो. तू जर मला वेळीच सावध केले नसतेस तर मी धनाच्या लोभाने भरकटत गेलो असतो. माझ्यात अनेक दुर्गुण उत्पन्न झाले असते ज्यांना मी अज्ञानाने चतुराई म्हणून त्याचे कौतुक केले असते. ती चतुराई पापाकडे माणसाला नेत असते त्यापासून तू मला वाचवले आहेस. कुंद्धधर बोलतो, "मी तुला माफ केले आहे". त्यानंतर तो त्याला मिठी मारतो व अदृष्य होतो. त्यानंतर तो तपस्वी ब्राह्मण सगळे जग हिंडतो. तो पूर्ण विरक्त झालेला असतो. कुंद्धधराच्या कृपेमुळें तो ऋषीतुल्य झाला होता. त्याला सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. तो आकाशातून उडू शकत होता. सगळे जग पाहू शकत होता. जे पुण्यवंत असतात त्यांचा आदर हे जग चालवणारे सगळे देव, यक्ष, ब्राह्मण, ऋषी आणि चरण करत असतात. ऐहिक वैभवाच्या मागे असलेल्यांना ते महत्व देत नाहीत. ते ऐहिक वैभवाच्या मागे असलेले, वैश्रावणाच्या पायाखाली असतात. जो एक राक्षस आहे. ऐहिक धनात तात्पुरता आनंद असतो परंतु, अध्यात्मिक पुण्ण्यात चिरंतन सुख असते. अध्यात्मिक पुण्य हेंच खरे धन असते.

मोक्ष धर्म पर्व भाग अठ्ठ्याण्वावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग नव्याण्णवावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "ज्या सगळ्या यज्ञांमध्ये लोक गुंततात ते बहुतेक स्वताच्या शुद्धीसाठी, जास्त संपत्तीसाठी आणि देवाच्या स्तुतीसाठी असतात परंतु, मला सांगा अहो पितामहा, असा कोणता विधी आहे, जो केवळ पुण्यप्राप्ती साठी आहे"?

भिष्म सांगतात, ह्यासंदर्भात एक प्राचीन किस्सा आहे तो मी तुला ऐकवतो. तो नारद आणि एक ब्राह्मण ह्यांच्यातील आहे. तो ब्राह्मण उच्छ पद्धतीने (शेतात पडलेले दाणे वेचून ते खाऊन) गुजराण करत असें. नारद त्याला बोलतात, ब्रह्माच्या राज्यात जे त्याच्या पुण्य प्रभावी अध्यात्मिक उर्जेसाठी ख्यातनाम आहेत, एक ब्राह्मण रहात होता. तो उच्छ पद्धतीने गुजराण करत असें. त्याचे प्रधान पुज्य दैवत होते भगवान विष्णू. तो स्यामकाचे दाणे उच्छ पद्धतीने गोळा करून खात असे, त्याशिवाय सूर्यपर्णी, सुवर्शला आणि अशा काहीं भाज्या खात असे. ते सगळे चवेने कडू होते. परंतु, त्याच्या तपस्येमुळे त्या सगळ्या भाज्या त्याला गोड लागत होत्या. तो अहिंसा तत्त्वाचे पालन करत असे. वनवाश्याचे जीवन जगत असे, तो त्या मार्गाने बैराग्याचे उच्च स्थान प्राप्त करतो, रानात मिळणारी फळं आणि कंदमुळं तो विष्णूला प्रसाद म्हणून अर्पण करत असें. त्यामागे त्याचा उद्देश होता कीं, त्याला स्वर्ग प्राप्त व्हावा. त्या ब्रह्मणाचे नांव होते सत्य. त्याच्या पत्नीचे नांव होते पुष्करधारीणी. ती अतिशय सुद्ध मनाची होती. ती अनेक कठोर तपं करत होती. तिची वर्तणूक फार चांगली होती परंतु, तिच्या पतीचे व्रत ज्यात यज्ञ तो करत असें ते फार क्रूर होते कारण त्यात हिंसक हत्त्या तो करत असे. तिला तिच्या पतीची ती व्रतं आवडत नव्हती. तरी रिवाजा नुसार तिला तशा यज्ञात त्याच्या बाजूला बसावे लागत असें. तिला तो नाहीतर शाप देईल ह्याची भिती वाटत असें. तिचे वस्त्र मोराने टाकलेल्या पिसांचे असतं. ती इच्छा नसूनही त्याच्यासाठी ते सगळे विधी करत असे. तो तशा यज्ञात होत्री असें. त्या वनात त्या ब्राह्मणांच्या जवळ एक पर्नाद वशांचा हरण रहात असें. तो शुक्र जातीचा होता. तो एकदा त्याच्या यज्ञाच्या कुंडाजवळ जाऊन त्या ब्राह्मणाला कडक शब्दात बोलतो, "तू फार चुकीच्या पद्धतीने वागत आहेस. जर तुझा यज्ञ यशस्वी झाला,

जरी त्यात बोलले जाणारे मंत्र अशुद्ध आहेत, तर माझा बळी त्यात देईन व तू आणि मी असे दोघे स्वर्गात जाऊ". ते ऐकल्यावर त्या यज्ञाची देवता सावित्री तेथे येते व त्या ब्राह्मणाला सांगते कीं, तो शुक्र जातीचा जे सांगत आहे तसे कर. ते ऐकून तो ब्राह्मण तिला बोलतो, "मी माझ्या शेजार्याला जो हरण आहे कधींच मारणार नाही. ते ऐकल्यावर देवी सावित्री त्या यज्ञकुंडात प्रवेश करते पलिकडील जगात जाण्यासाठी . तिला त्या यज्ञातील इतर दोष पहावयाचे नसतात. ते शुक्र वंशाचे हरण पुन्हा त्याला हात जोडून विनंती करते कीं, त्याचे तुकडे करून ते त्या यज्ञात द्यावेत. परंतु, सत्य त्याच्या शेजार्याला प्रेमाने आलिंगन देतो व तसे करण्याचे साफ नाकारतो. तो त्याला बोलतो, जा येथून, ते ऐकल्यावर ते हरण तेथून निघते. ते आठ पावले मागे जाते व नंतर पुन्हा थांबते, बोलते, "खरोखर तू माझा बळी चढव ह्या यज्ञामध्ये. माझा बळी दिलास तर माझे कल्याण होणार आहे. त्या बदल्यात मी तुला दिव्यदृष्टी देईन. त्यानी तू त्या सुंदर अप्सरा व ते गंधर्वांचे रथ पाहू शकशिल. स्वर्गात जाण्यासाठी आम्हा प्राण्यांना माणसाच्या यज्ञात बळी जाणे हांच एक मार्ग असतो. ते ब्राह्मण अखेरीस मान्य करतो. तो हरण साक्षात यम होता. तो पहातो कीं, ब्राह्मण तयार झाला आहे, तेव्हां तो बोलतो, यज्ञा व्यतिरीक्त एरवी पशु मारणे शास्त्राला मंजूर नसते. ते ऐकून त्या ब्राह्मणाचे मत परीवर्तन होते व तो त्याला मारण्याचा विचार सोडून देतो. पशूना मारणे हा कोणत्याही यज्ञाचा भाग असू शकत नाही असे त्याला वाटू लागते. त्यानंतर तो हरण जो यमाचे रुप होते, तेथे त्याच्या खर्या रुपात प्रकट होतो व त्या ब्राह्मणाला त्याचा यज्ञ पूर्ण करण्यात मदत करतो. तो ब्राह्मण त्याच्या पत्नीप्रमाणे पशूवधाच्या विरुद्ध मताचा होतो. अहिंसक हत्त्या हा सनातन धर्माचा गाभा आहे. "जीवोजीवस्य जीवनं", ह्या नियमानुसार हत्त्या मंजूर आहे परंतु, त्यात दुःख निर्मिती होणार नाही ह्याची दक्षता बाळगावी असें यम त्या ब्राह्मणाला सांगतो.

यज्ञातसुद्धा बळी झटका पद्धतीने द्यावयाचे असतात आणि जर तसे करता येत नसेल तर पशू वध न करता वनस्पतीचे दान करावे ज्यात फळं, कंदमुळं असावीत कारण त्यात चैतन्य नसते. असे भिष्म युधिष्ठीराला सांगतो.

मोक्ष धर्म पर्व भाग नव्याण्णवावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग शंभरावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "कोणत्या कर्मामुळें मनुष्य पापी होतो"? काय केल्याने त्याला पुण्य प्राप्त होते"? कशाचा त्याग सार्थकी असतो व त्याने खरोखरच त्याला मोक्षप्राप्ती होते कां"?

भिष्म सांगतात, तुला सगळी कर्तव्ये माहीत आहेत. तू विचारत आहेस ते फक्त खात्री करण्यासाठी हे मी जाणतो. मोक्ष, त्याग, पाप, पुण्य हे अध्यात्मिक उर्जेच्या कमी जास्त होण्यांने होत असतात. पंचेंद्रियांने कांहीं अनुभवले कां त्याबद्दल प्रथम कुतूहल निर्माण होते. त्यातून इच्छा सुरू होते ते सगळ्या कर्तव्याच्या मुळाशी असते. जर इच्छा नाही झाली तर कसलेच कर्तव्य उरत नाही. त्याच प्रमाणे कुतूहलातून इच्छे ऐवजी निरीच्छा अथवा औदासिन्य निर्माण होते. त्या औदासिन्यातून वैराग्य व त्यातून मोक्ष असें होत जाते. मिळवण्याची इच्छा माणसाला सगळ्या प्रकारच्या वासनांमध्ये अडकवण्यास कारणीभूत होतात. इच्छा पूर्ण झाली कीं, नवीन इच्छा त्यातून उत्पन्न होत असते. त्या प्रक्रियेत पुण्य प्राप्ती साध्य होत नाही. त्यातून मिथ्याचार सुरू होतो. मिथ्याचाराच्या प्रयत्नातून तो पुण्य जमवण्याचा प्रयास करतो. त्यातून धन मिळवण्याचा प्रायास करतो. तो स्वर्गाच्या विचारात नसतो कारण तसे कांही असते ते तो मानत नसतो. एक इच्छा पूर्ण झाली कीं त्याला दुसरी इच्छा होते व तो त्यात अडकत जातो. तसा अडकला कीं तो पापाचरणात मग्न होतो त्याचे समर्थन करू लागतो, त्याच्या हितचिंतकांचे तो ऐकत नाही. त्या व्यसनात अडकलेला तो तीन प्रकारची पापं करत असतो. ती तीन अशी, तो पापामय विचारांने बद्ध असतो, तो खोटे बोलतो आणि तिसरे त्याचे कर्म पापासाठी असते. त्या तिहेरी पापमयतेमुळे त्याचा अध्यात्मिक उर्जा क्षीण होत असते ज्यामुळे त्या आत्म्याचे ज्ञान सुद्धा कमी होत असते. तो अज्ञानाकडे फेकला जात असतो. त्यामुळें त्याचे दुर्गुण वाढत असतात. त्याचे मित्र त्याच्या सारखे असतात. "समान व्यसनेषू सख्यम", असे सांगतात त्याचा अनुभव येतो. आता चांगुलपणा असलेल्याचे सांगतो, तो सगळ्यांचे चांगले गुण ओळखतो त्याचे त्यामुळे भले होत असते. त्याच्या शहाणपणाचा उपयोग करून तो

योग्य निर्णय घेऊन यशस्वी होत असतो. तो स्वताबरोबर त्याच्या मित्रांचेसुद्धा भले करत असतो. त्यामुळें त्याची प्रगति होत असते. तो दुसर्यांचे चांगले करण्यात असतो त्यामुळे त्याला सगळ्यांची मदत मिळत रहाते. जेव्हां तो धन मिळवण्याचे ठरवतो तो जे पुण्य मार्गाने मिळणारे आहे तेंच घेतो. त्याचे सगळे मित्र त्याच्या सारखे सदाचारी असतात. त्याच्या सदाचारी वर्तणूकीमुळे तो ह्या आणि नंतरच्या जगात सुखात रहातो. खरा सदाचारी लवकरच त्या ऐहिक सुखांतील तात्पुरतेपणा समजतो आणि त्यांचा त्याग करण्याचे ठरवतो. तो त्यागाच्या दिशेने जाऊ लागतो. त्यातील जे तमोगुणी असतात ते त्याच्या शरीराला पिडा देण्यात धन्यता मानतात परंतु, जे सात्विक असतात ते शरीराला त्याच्या जीवात्म्याच्या कडे सुपूर्द करून ध्यान साधनेकडे जातात. ज्ञानचक्षू प्राप्त झालेला त्यानंतर त्याच्या सगळ्याच सुखांच्या बाबत उदासिन होतो. तरी त्याचा सदाचारी स्वभाव तसांच असतो. एकेक वासना सुखांना (दृष्टी, गंध, ध्वनि, स्वाद, स्पर्श) तो सोडून देत असतो. त्या प्रत्येकाच्या क्षणभंगूरपणाची प्रचिती त्याला त्यांच्या अनुभवाने आल्यानंतर ते स्वाभाविकपणे होत असते. अशारितीने तो सावकाशपणे मोक्षाच्या जवळ जातो. मी तुला ते सांगितले जे तू विचारत आहेस. त्यात पाप, पुण्य, त्याग, चांगुलपणा आणि मोक्ष हे विषय येतात. म्हणून तू नित्य चांगुलपणात रहा म्हणजे तुझा मोक्षमार्ग सुकर होईल.

मोक्ष धर्म पर्व भाग शंभरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे एकावा

युधिष्ठीर विचारतो, "तुम्ही सांगतो अहो पितामहो, मोक्ष प्राप्ती साठी साधनं असतात त्याशिवाय ते शक्य नसते. ती साधनं कोणती ते सांगा".

भिष्म सांगतात, तू हे जे विचारत आहेस त्यात मोठे रहस्य लपलेले आहे. ते मी तुला आता सांगतो. आपण जे कांहीं मिळवतो ते सगळे कोणत्या ना कोणत्या साधनानी मिळवत असतो. ते त्या मनात असते. उदाहरणार्थ मातीचे मडके बनवतांना तो कुंभार एका मनस्थितीत असतो परंतु, ते मडके एकदा बनले कीं, त्याच्या मनातून तो विचार निघून जातो. त्यात मातीप्रमाणे ती मनाची स्थिती (मडके बनवण्याची) हे एक साधन असते. साधन म्हणजे कांही वस्तूं असली पाहिजे असे समजू नकोस. पूर्व सागराकडे जाणार्या मार्गाने तू पश्चिम सागराकडे जाऊ शकत नाहीस. एकच मार्ग आहे मोक्षाकरता. तो मार्ग ऐहिक सुखाच्या कोणत्याही मार्गासारखा नसतो. त्याबद्दल मी तुला अधिक कांही सागणार आहे ते ऐक. क्षमाशिलता आणि निरिच्छता, मनाची शांती हे मोक्षाचे मार्ग आणि साधनं आहेत. ते सात्त्विकतेत येतात. आत्मविश्वास निर्भयता आणि पूर्ण विवेकी म्हणजे चिरकर्णी असणे ही मोक्षाच्या मार्गाची साधनं आहेत. त्याशिवाय धैर्य, सहनशिलता, वासनांबद्दल औदासिन्य, परमेश्वरावर नितांत श्रद्धा, ही साधन समजली जातात. नको त्या गोष्टींची चौकशी करणे, अविचारीपणा असे दोष मोक्षाच्या मार्गातील बाधा असतात. भावनाविवशता मोक्ष मार्गातील मोठी अडचण असते. प्रेम, स्वार्थ, हिशोबीपणा, आळस, उताविळपणा, मत्सर हे प्रेमाचे दोष असतात ते सगळे मोक्षमार्गातील अडथळे असतात. अल्पसंतुष्टता, समाधानीवृत्ती, ब्रह्माबद्दल अंधश्रद्धा ही मोक्ष मार्गातील साधनं असतात. क्रोध, लोभ, मोह ज्यांच्यामुळें जीव वास्तविक जगात अडकतो त्यांच्यावर पूर्ण संयम असावा लागतो तरच मोक्षाच्या मार्गाने जाता येते. ज्या ज्या गोष्टीने अध्यात्मिक उर्जा वाढू शकते ते सगळे मोक्ष मार्गात मदत करणारे असतात. कारण अध्यात्मिक उर्जा वाढवत वाढवत गेल्यानेच अखेरीस मोक्षपदी मनुष्य पोहोचत असतो. मोक्षाचा विचार करणार्याला त्याचा अध्यात्मिक उर्जा कशी वृद्धींगत

होईल त्याच्यावर लक्ष द्यावयाचे असते. आधीच्या जन्माच्या कर्मविपाकाचा विचार त्यासाठी करावा लागतो. ज्यामुळें आपण अडकलेले असतो ह्या जन्म मरणाच्या फेर्यात. ते शक्य झाले तर मोक्षाचा मार्ग फारच सुलभ असतो. आधीच्या जीवनातील पाप कर्म पुढे येतात लिंगदेहाच्या आडमुठेपणामुळें. त्याशिवाय कर्मभोग आपल्याच गत कर्माचे, हे मोक्षामध्ये येणारे प्रश्न असतात. तो जुना हिशोब जोवर पूर्ण झाला नाही तोवर मोक्ष साध्य होत नाही. बरीच माणसे निवृत्तीला मोक्ष समजतात. ते योग्य नसते. कारण मोक्षपदी जाण्यासाठी लिंगदेह पूर्णपणे संपला गेला पाहिजे. कांहीं त्यांच्या पूर्ण निरीच्छ वृत्तीने त्याच्या सगळ्या वासनांपासून मुक्त झालेले असतात पण त्यांचे गतजन्माचे कर्मविपाक तसेंच उरलेले असतात. अशी माणसे मोक्षार्थी वाटतात पण ते मोक्षार्थी नसतात. ते ज्या अवस्थेत असतात त्याला निवृत्ती म्हणतात. ते सुद्धा पुन्हा जन्म घेत नाहीत परंतु, ते मुक्त नसतात. त्यांचे आत्मे अनंतात जन्म न घेता असेच अडकलेल्या अवस्थेत रहातात. त्यांना जर त्या निवृत्ती अवस्थेत कांहीं इच्छा झाली तर ते पुन्हा जन्म घेतात त्यांच्या त्या इच्छा पूर्तीसाठी. निवृत्ती अवस्था मोक्षाप्रमाणेच मोठी अल्हाददायक असते कारण ते पूर्णपणे निरिच्छ असतात. तरी त्यांचा निःशेष भोग त्यांच्या लिंगदेहाच्या रुपाने त्यांना चिकटलेला असतोच.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे दोन

भिष्म पुढे सांगतात, ह्या संदर्भात एक किस्सा मी तुला सांगणार आहे जो नारद आणि असित देवलांच्या मध्ये झाला होता. असेंच एकदा, नारद वयोवृद्ध असित देवलांना पहातात जे त्यांच्या आसनावर आरामात बसले होते. त्याना विचारतात कीं, सृष्टीतील प्राणी ह्यांच्या जन्म मृत्यूच्या मागे कोणती कारणं असतात.

नारद पुढे विचारतात, "मला सांगा अहो असित तुमच्या कल्पनेप्रमाणे ह्या सृष्टीत चराचरांची निर्मिती कधी व कां झाली असे वाटते"? दुसरा प्रश्न असा आहे कीं, त्यांचा अंत कसा व कशात होतो. म्हणजे ते पुन्हा व्यक्त होतील"?

असित देवल सांगतात, महत ज्याला स्वयंभू असे सुद्धा बोलतात ह्या विचार सागराच्या मूळ स्वरुपात असतांना त्याच्यात उत्पन्न झालेले दोष काढून टाकण्याचे ठरवतो तेव्हां सगळे ब्रह्मांडाचे व्यवहार सुरू होतात. त्यातून हे सगळे चराचर ह्यांच्या निर्मितीचे कार्य आवश्यक होते. कारण ते दोष काढून टाकण्यासाठी चित् त्या विविध रुपात अवतीर्ण होण्याची गरज स्वयंभूला जाणवते. ती पहिली इच्छा आहे जी ह्या सृष्टीच्या चक्राचे मूळ कारण आहे. पंचमहाभूत आधीपासून अस्तित्वात होतेच. असें समजले जाते कीं, त्या पांच तत्त्वां व्यतिरीक्त आणखीन काय आवश्यक होते तर तो काळ ज्याच्या मुळें पंचमहाभूतात बदल करणे शक्य झाले म्हणून महतने काळ हे परिमाण निर्माण केले. तेवढ्याने होणार नाही हे समजल्यावर मन आणि बुद्धी त्या प्रेरणेतून तयार झाली. त्या सगळ्या विचारांच्या कल्पनेतून आलेल्या असल्यामुळें त्या असत् म्हणजे भ्रम किंवा अविद्या अथवा माया अशा होत्या. त्या स्वयंभूच्या कल्पनेतून आल्या होत्या म्हणून त्यात (त्या मायेत) तो असतो पण त्या मात्र स्वयंभूत नसतात. त्या सगळ्यांना चालवण्यासाठी अध्यात्मिक उर्जा लागत होती ती सुद्धा महत मधून त्यांना मिळत होती. अशारितीने प्राथमिक व्यवस्था तयार झाली. असें श्रृतीमध्ये सुद्धा सांगितले आहे. सगळे जग ह्या आठ मूलभूत गोष्टींच्या एकमेकात होणार्या प्रक्रीयांतून निर्माण झाले आहे. ते सगळे माया ह्या एका गोष्टीत सामावलेले असतात. म्हणून ते असत् समजले जातात.

परंतु, स्वयंभू सत् म्हणजे सत्य असते. त्या सगळ्या उपक्रमाचा उद्देश जे दोष काढून टाकण्यासाठी होता त्या दोषांमुळें चराचरांचे जन्म मृत्यू होत असतात. आणि जोवर ते दोष आहेत तोवर ह्या सृष्टीचे रहाटगाडगे सुद्धा असेंच अव्याहतपणे चालू रहाणार आहे. त्यामध्ये जे जीव जन्म घेतात त्यात स्वयंभूचा अंश असल्याशिवाय ते दोष काढून टाकण्याचे कार्य होणार नाही म्हणून तो आत्मा त्या प्रत्येक सजीवांत असतो. त्या आत्म्याच्या प्रेरणेने अध्यात्मिक उर्जा त्या शरीराला मिळत असते व त्याचे जीवित कार्य संपन्न होत असते. जेव्हां तो सजीव मरतो म्हणजे त्यातील आत्मा त्या देहाला सोडून जातो ते अचेतन शरीर पुन्हा पंचमहाभूतांत कशातरी पद्धतीने विलीन होण्याची प्रक्रिया सुरू होते. असे सतत होत असते. शरीरात असतांना त्याच्या पंचेंद्रियांच्या माध्यमातून (स्वाद, गंध, दृष्य, स्पर्श, श्रवण) सृष्टीचे आकलन त्याला म्हणजे जीवाला होते जो त्या शरीराचा कार्यकारी असतो. त्याला जीवात्मा अथवा जीव असें सांगतात. जीवात्म्याचे कार्य शरीराला सांभाळावयाचे असते. त्याला अध्यात्मिक उर्जा आत्म्याकडून मिळत असते. मन आणि बुद्धी हे जीवाचे भाग असतात. ते सगळे अवास्तविक असतात, विचाराच्या परिमाणात ते काम करतात. त्याशिवाय गत जन्माच्या कर्मविपाकाचे अवशेष लिंगदेहाच्या (ते पुन्हा विचार परिमाणात) रुपाने त्या जीवाला मदत किंवा विरोध करत असतात. त्या सगळ्यांच्या संदर्भात आत्म्याला क्षेत्रज्ञ व शरीराला क्षेत्र असें बोलले जाते. क्षेत्रज्ञ पांच ज्ञानेंइंद्रिय, मन, बुद्धी, लिंगदेह ह्यांच्या मदतीने त्याचे जीवीत कार्य संपन्न करत असतो. त्याच्या अभ्यासाला अध्यात्म विद्या असें समजतात. जी सहा कर्मकारी इंद्रिय आहेत (दोन हात, दोन पाय, लिंग, मुख) त्याशिवाय इतर अवयव जे शरीराची व्यवस्था पहातात जसे आतडी, गुदद्वार, मुत्र विरेचनासाठी लिंग वगैरे ह्यांचे व्यवस्थापन जीव करत असतो. त्या सगळ्या कामासाठी जी जड उर्जा आवश्यक असते ती पचन संस्थेच्या मार्फत शरीराला मिळत असते. अशारितीने जड आणि चैतन्यमय अध्यात्मिक उर्जा ते शरीर चालवत असतात. जड उर्जा असत् आहे व अध्यात्मिक उर्जा सत् आहे. जेव्हां शरीर त्यातील जड उर्जेच्या व्यवस्थेप्रमाणे थकते तेव्हां त्याला ती उर्जा पुन्हा कार्यरत होण्यासाठी विश्रांती आवश्यक असते त्यासाठी तो जीव झोपतो. जरी शरीर झोपलेले असते त्याच्या जीवाचे मन आणि

बुद्धि झोपलेले नसतात. त्यांचे कार्य चालूच असते. त्यामुळे त्याला स्वप्न पडू शकतात. जागृतावस्थेत असलेला त्याचे मन विविध वासनांत गुंतलेले असते. निद्रीस्त अवस्थेत असतांना सुद्धा मन विविध वासनांच्या आणि इतर कल्पनांच्या विचारात गुंतलेले असते. जागृतावस्थेत जे घडत असते त्याचा लेखाजोखा स्वप्नाच्या काळात पुन्हा व्यक्त होत असतो एकाद्या चित्रपटा सारखा. परंतु, जे वासनांत गुंतत नाहीत अशा योगी लोकांच्या स्वप्नात तसे होत नाही. ते त्यांच्या निद्रीस्त अवस्थेत विचार सागरातील विचार खेचून घेत असतात. त्यामुळे त्यांना ज्ञानाची अनुभूती होत असते. तशा अवस्थेला सुशुप्ती असें म्हणतात. ती एका प्रकारची समाधी अवस्था असते. जीवाची अध्यात्मिक अवस्था त्याला तीन गुणात नेऊन ठेवते. उच्च अध्यात्मिक अवस्था असलेला सात्त्विक गुणात असतो मध्यम अवस्थेतील रजोगुणी आणि नीच अवस्थेतील तमोगुणी असतो. जशी अध्यात्मिक अवस्था बदलत असते त्याप्रमाणे त्या जीवाच्या गुणाची अवस्थासुद्धा बदलत असते. ते तीन गुण आत्म्याच्या अहंकाराशी निगडीत असतात. अहंकार त्याला स्वार्थ प्राप्त करून देतो. पुण्य आणि पाप ह्यांचा संबंध असतो अध्यात्मिक उर्जेशी. ज्या प्रकारच्या विचारामुळे आणि कर्मामुळे त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होते ते पाप कारक असतात. ज्यामुळे वाढते ते पुण्यकारक असतात. मोक्षाला जाण्यासाठी अतिउच्च अवस्थेतील अध्यात्मिक उर्जा असावी लागते. अध्यात्मिक उर्जेच्या अवस्थेनुसार त्या आत्म्याला योनी मिळत असते. प्रत्येक योनीची कमाल व किमान अध्यात्मिक अवस्था ठरलेली असते त्याप्रमाणे त्या आत्म्याला त्याचा पुढचा जन्म मिळत असतो. माणसाच्या योनीची अध्यात्मिक अवस्था सगळ्या जीवांत जास्त असते. त्याहूनही जास्त असते देवांची. विशिष्ट पातळीच्या खालच्या अध्यात्मिक अवस्थेला ज्या योनी असतात त्या पाप योनीच्या समजल्या जातात. जीव एकटा येतो व एकटा जातो. त्याला खरेतर कोणी जवळचा अथवा दूरचा असा कोणी नसतो. तरी मनुष्य तशी नातीगोती त्याच्या कल्पनेने घडवत असतो. त्याच्या काल्पनिक आनंदात अथवा दुःखात रमत असतो. जो अशा काल्पनिक सुख दुःखातून बाहेर येतो तो मोक्षाच्या दिशेने जाऊ लागतो. त्यानंतर यथावकाश तो ब्रह्मात विलीन होतो. असें सांख्य विचारात दिले आहे. मोक्ष धर्म पर्व भाग एकशे दोन संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे तीन

युधिष्ठीर विचारतो, "आम्ही किती क्रूर झालो होतो त्या सुमारास जेव्हां आम्ही आमचे बंधू, वडीलधारे, नातू, पणतू, नातेवाईक, मित्र त्यांची मुलं मारत होतो. अहो पितामहा, ह्या संपत्तीच्या मोहातून आमची सुटका होणार आहे कां? त्या मोहामुळे आम्ही अनेक पापकृत्य केली आहेत".

भिष्म सांगतात, त्यासाठी मी तुला सांगतो जे विदेहच्या राजाने मांडव्याला सांगितले होते. तो विदहचा राजा बोलतो, मला ह्या जगात कांहीं स्वारस्य नाही तरी मी येथे सुखात राज्य करत आहे. जरी माझी सगळी मिथीला नगरी जळून खाक झाली तरी त्याबद्दल मला दुःख वाटणार नाही. ह्या जगातील संपत्ती ज्यांना अडकवू शकते ते खर्या संपत्तीचा (अध्यात्मिक) कधीच अनुभव घेत नाहीत. जे येथे आहे ते येथेच असणार आणि जे स्वर्गात आहे ते तेथे असणार. गाईचे शिंग तिच्या बरोबर वाढत असते. त्याप्रमाणे जास्त संपत्ती मिळाली कां त्याहून जास्त संपत्तीची हाव लागते. जे त्यांच्या संपत्तीचा उपयोग इतर चांगल्या कामासाठी करतात त्याना तिची बाधा होत नाही. त्यासाठी केवळ संपत्तीची हाव नसावी. शहाणा मनुष्य सगळ्या जीवांना सारखाच आदर देत असतो. ज्याला ते जमले तो चिरशांती प्राप्त करत असतो. त्याला कशाचीही चिंता रहात नाही. तो सुख आणि दुःख ह्या कल्पनांच्या बंधनातून मुक्त होतो. चिंता हा एक असाध्य व्याधी सारखा आहे त्याला इलाज नसतो. ज्याने चिंता सोडली तो मुक्त झाला. ते राजाचे ऐकून मांडव्य ऋषीस आनंद होतो. त्यानंतर मांडव्य मोक्षाच्या मार्गाने जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशेतीन संपला.

# मोक्ष धर्म पर्व

# भाग एकशे चार

युधिष्ठीर विचारतो, "काळ जो सगळ्यांना भयभीत करत असतो त्याच्या गतीने, तो त्याचे काम करत असतो. असे काय करावे ज्यामुळे सगळ्यांचे चांगले होईल"?

भिष्म सांगतात, ते समजण्यासाठी मी तुला एक संभाषण सांगतो जे एका पित्याने त्याच्या मुलाबरोबर केले होते ते ऐक. एकदा पृथाचा मुलगा ज्याचे नांव मेधावान होते. अतिशय बुद्धीमान असा व वेदांचा अभ्यास करणारा, त्याच्या पित्यास विचारतो, "मला सांगा, तात, जर माणसाला ठाऊक आहे कीं, त्याचा मृत्यू समीप येत आहे तर त्यानं काय करावे"? मला योग्य माहिती सांगा म्हणजे मी त्या प्रमाणे माझे पुण्य कार्य करीन".

त्याचे तात पृथा त्याला बोलतात, "तू वेदाचा अभ्यास केला आहेस आणि ब्रह्मचर्य पाळत आहेस, म्हणून तुला तुझी संतति असावी लागेल. जो तुझा पवित्र अग्नी तुझ्यानंतर सांभाळेल, तुझ्या परंपरेतील यज्ञ करेल, त्यानंतर तू पुढच्या अध्यात्मिक प्रवासासाठी वानप्रस्थाश्रमी जाशिल. त्यानंतर तू मौनव्रत धारण करून ध्यान साधनेत मग्न होशिल".

मुलगा विचारतो, "सगळे जग भयंकर आघाताने व्यस्त झाले आहे अशा स्थितीत आपण असें सगळे कसे शांतपणे सांगू शकता"?

वडील बोलतात, "तू काय बोलत आहेस कोणते जग आघाताने व्यस्त झाले आहे"? "उगाचच मला भिववण्याचा प्रयत्न करू नकोस माझ्या मुला".

मुलगा बोलतो, "माझ्या मते हे जग मृत्यूने ग्रासलेले आहे, त्यात अपंगत्वाचा शाप मला स्पष्टपणे दिसला आहे, दिवस आणि रात्रीच्या रुपात आघात होत आहेत, अशावेळी मृत्यू अचानकपणे येऊन माणसाचे जीवन काढून घेत असतो, अशा परिस्थितीत मी त्यासाठी कसा त्याची वाट पहात बसू? माझ्या अज्ञानाच्या आवरणात मी माझे दैनंदीन जीवन कसे जगू? प्रत्येक रात्र मला माझ्या येणार्या मृत्यूची आठवण करून देत असते कारण रात्रीचा अंधार मला मृत्यू सारखा वाटतो. ब्राह्मणं सकाळी फुलं काढत असतांना जसे इतर बाबींबाबत बेसावध असतात तसा मी माझ्या नित्य कार्यात मग्न असतांना माझा

मृत्यू मला मी बेसावध असतांना खेचून नेईल असें वाटते. म्हणून आज जे करता येणार असेल ते आजच करावे ते उद्यावर टाकू नये असे मी समजतो. कारण उद्याचा कांहीं भरवसा नाही. मृत्यू तुझ्या कामाच्या पूर्ण होण्यासाठी थांबेल असें समजू नकोस. म्हणून आपण तरूण आहोत व आपल्यामध्ये मोठी कुवत आहे तोवर पुण्याची कामं करत गेले पाहिजे. प्रत्येक पुण्यकर्म आपली अध्यात्मिक उर्जा वाढवत असते. अध्यात्मिक उर्जा वाढवणे हांच उद्देश प्रत्येक जन्माचा असावा त्यासाठी इतर निरर्थक गोष्टीत न रमता मनुष्य पुण्यकर्मात राहिल तर त्याच्या जन्माचे सार्थक होईल. कदाचित मृत्यू तुझे इप्सित कार्य पूर्ण करण्या आधीच तुला उचलून नेईल किंवा कदाचित तो तसे करणारसुद्धा नाही. नेमके काय घडेल त्याचा पत्ता नसतो. कारण जीवनाचा कांहीं भरवसा नाही. म्हणून वृद्ध झाल्यावर अध्यात्मिक उर्जेसाठी तपस्या अथवा जप वगैरे करण्याचे बेत करणे अविचारीपणाचे आहे असे मला वाटते. तरुणपणीच कां नाही त्याची सुरूवात करावी"? पुण्य प्राप्तीने सगळ्या अवस्थांत (जीवनाच्या सगळ्या अवस्था, चार आश्रम) शांती आणि समाधान मिळत असते. आपल्या प्रियजनांच्या सौख्यासाठी कोणी पाप करत असतो ज्यामुळे ते कदाचित (तात्पुरते) सुखी होत असतील पण तू मात्र त्या पापकर्मांमुळे अनिश्चिततेच्या खड्ड्यात पडत असतोस. असे होत असतांना मृत्यू सुधारणा करण्यास सवड न देता झपाट्याने तुला खेचून नेतो. मनुष्य ऐहिक सुखाच्या सौद्यात अडकलेला असतो जो कधीच पूरा होत नसतो त्याचा मृत्यू त्याला मध्येच उचलून नेतो व तो त्याच्या वासना अपुर्या राहिल्या म्हणून पुन्हा पुन्हा जन्म मरणाच्या खाईत पडत असतो. एका जन्मातून दुसर्या जन्मात असा तो त्याचा न संपणारा प्रवास करत असतो. त्याला कोणी अपवाद नसतो, कोणी कितीही शक्तीमान असो अथवा कमजोर असो त्याच्या मृत्यूला त्याची पर्वा नसते. मृत्यू रोग, आजार, अपघात अशा कोणत्याही रुपाने त्याच्यावर झडप घालणार म्हणजे घालणारच. यमदूतांना कोणी थांबवू शकत नाही. परंतु, सत्याच्या शोधात असलेला अशा मृत्यूला घाबरत नसतो. त्याना मृत्यूची भिती वाटत नाही. श्रृती सांगते कीं, मोहाच्या दोरखंडाने बांधलेले त्यात रमलेले असतांना मृत्यू त्याना खेचून नेत असतो. परंतु, चांगुलपणाने वागणारे तसे अडकत नाहीत. ते कोणाला कशाही प्रकारे दुःख देत नसतात. त्यांना हात लावतांना यमाचे दूत

कचरत असतात. त्यासाठी चांगुलपणा हा स्वभाव असला पाहिजे. कांहीं साध्या करण्याच्या धंदेवाईक दृष्टीने जो चांगुलपणा केला जातो त्याला रजोगुण किंवा तमोगुण समजले जाते व त्यापासून पुण्यप्राप्ती होत नाही. मी ते समजून त्याप्रमाणे प्रामाणिकपणे कोणताही उद्देश साध्या करण्याच्या इच्छेने चांगुलपणा करणार नाही. असें केल्याने मृत्यू पासून मला घाबरावयाचे कारण नसेल, मी स्वतःहून त्याच्या स्वाधीन होईन जसा माझा काळ समीप येईल. असे केल्याने मी अमर झालेलो असेन. कारण जे त्यांच्या इच्छेने यमदूतांच्या आधीन होतात ते मेले असे समजले जात नाही ते अमर समजले जातात. ज्यांना यमदूत त्यांच्या इच्छे विरुद्ध बळजबरीने खेचून नेतात ते मेले असे समजले जाते. अमर रहाण्यासाठी कांहीं यज्ञ सांगितले आहेत ते असे, जप यज्ञ (आराध्य देवतेचा एकचित्ताने जप करणे), इंद्रिय संयमन यज्ञ (ब्रह्मचर्य), वाचा यज्ञ (मितभाषी, मौन), ब्रह्म यज्ञ (ध्यान साधना, विपश्यना इत्यादी करणे), अशा यज्ञात त्या त्या वासनांचा बळी दिला जातो म्हणून ते (आत्मिक) यज्ञ अध्यात्मिक दृष्ट्या उच्च दर्जाचे मानले जातात. अशा यज्ञांत हिंसा नसते. त्या आत्मिक यज्ञात माझे शरीर हेच होमकुंड असेल. प्राण्याना मारून केलेल्या ऐहिक सुखाच्या प्राप्तीच्या यज्ञांपेक्षा हे जास्त चांगले यज्ञ आहेत. मी सूज्ञ आहे मी कशाला कोण्या प्राण्याचा वध करू? ऐहिक सुखाकरता, निरनिराळ्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी क्षत्रिय जे यज्ञ करतात ते मी करणार नाही कारण मला ऐहिक वासनांमध्ये स्वारस्य अजिबात नाही. अहो तात, मला वाचवण्यासाठी संतति नको कारण मी असे कांहीं करणार नाही ज्यासाठी मला त्यांच्या पुण्याची गरज लागेल. मी स्वतः ते उच्च दर्जाचे आत्मिक यज्ञ करणार आहे. जो आत्मसंयमन करतो त्याला संततिची आवश्यकता नसते. तो स्वतः स्वयंभू झालेला असतो. तपस्या, त्याग आणि ब्रह्मचर्य हे त्याला मोक्षाकडे नेण्याचा मार्ग दाखवतात. ज्याला ज्ञानचक्षू प्राप्त झाले त्याला कोण्या संततिची आवश्यकता नसेल. तुम्ही हे जाणता. मोहासारखे दुःखदायक कांहीं नसते. सर्वत्याग जे सुख देते त्याची बरोबरी कशाशीही होत नसते. खर्या ब्राह्मणासाठी एकांतवास व चिरध्यान हे संपत्ती असतात. जी कधीच कमी होत नाही. त्या संपत्तीची कधी चोरी सुद्धा होत नाही. त्याला न्यायाच्या सोट्याची भिती नसते. अशाला कांहींच नको असते त्याला ऐहिक धनाची

काय आवश्यकता? धन लागते कांहीं विकत घेण्यासाठी पण ज्याला कांहीं विकत घ्यावयाचे नसते त्याला ती ऐहिक संपत्ती काय कामाची? अशा ब्राह्मणाला नातेवाईक व पत्नी काय कामाचे? अशाने एकांत गुहेत रहाणेच रास्त ठरते. आपण अहो तात, ब्राह्मण अहात. तुम्हाला मृत्यू धरणार आहे. तुमचे पितर कोठे आहेत ते पहा".

भिष्म पुढे बोलतो, त्याच्या मुलाचे मेधावानचे ते ऐकून तो पिता मुलाकडून शिकतो व त्याप्रमाणे वानप्रस्थाश्रमाकडे निघतो. त्याचा मुलगा त्याच्या पुढे आधीच गेलेला असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चार संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पांच

युधिष्ठीर बोलतो, "माणसाने कसे वागावे? त्याचे काम काय असावे? त्याचे शिक्षण कसे व किती असावे आणि त्याची ब्रह्माबद्दलची भक्ती कशी असावी"?

भिष्म सांगतात, ब्रह्माच्या शोधात निघालेला दूरदृष्टीचा असला पाहिजे. त्याचे त्याच्या वासनांवर पूर्ण सयंमन असले पाहिजे. तो मायेच्या कचाट्यातून निसटणारा असेल त्यासाठी त्याचे निश्चय पूर्ण असले पाहिजेत. तो बहुधा गृहस्थाश्रमातून बाहेर आलेला असला पाहिजे. त्याला हित आणि सुखाबद्दल औदासिन्य असले पाहिजे. त्याने पूर्ण वैराग्य स्वीकारलेले असले पाहिजे. वैराग्य त्याचा स्वभाव असला पाहिजे. त्याचे जीवन अहिंसक असले पाहिजे म्हणजे तो कोणाला तिनही प्रकारची दुःख (काया, मन, अर्थ) न देणारा असला पाहिजे. त्याचा अहंकार सुनियंत्रित असला पाहिजे. तो कोणाचा मित्र अथवा अमित्र नसेल. तो सदैव स्वतामध्ये (आत्मकेंद्रित) असेल. तो कोणाला भेटण्यास जात नसेल अथवा कोणाला त्याच्याकडे बोलवत नसेल. कोणी अपमान केला तरी तो रागवत नसेल. तो सगळ्यांशी दयाबुद्धीने वागेल. तो स्वताची स्तुती अथवा निंदा करत नसेल. ज्या घरातील अग्नी विझला आहे त्या घराकडून भिक्षा मगत असेल. तो भिक्षेवर जगत असेल. तो भिकेत जगण्यापुरते खाद्या घेईल. जर ते नाही मिळाले तर तो तसांच निजेल. यशाने तो खूष होणार नाही व अपयशाने खच्ची होणार नाही. त्याला कोणी जेवणासाठी बोलावले तर तो जाईल पण न बोलावता जाणार नाही. जे अन्न दिले त्याला नांवं ठेवणार नाही किंवा त्याचे कौतुक सुद्धा करणार नाही. ज्या देवळात अथवा घरात कोणी जात नाही अशा निर्जन जागी तो त्याचा डेरा टाकेल. त्या दिवशी घडलेल्या चांगल्या वाईट प्रसंगांवर तो विचार करणार नाही. तो ते सगळे विसरून जाईल व ध्यानात बसेल. कारण त्याचा त्या घडलेल्या प्रसंगाशी कांहीं संबंध नसतो अशी त्याची धारणा असेल. तो कशाही परिस्थितीत समाधानी असेल कारण त्याचा कशाशीही संबंध नसेल. तो मितभाषी असेल. त्याचे एक ध्यान त्याच्या आराध्य देवतेकडे सदैव असेल व दुसरे ध्यान शरीराच्या व्यवहारात (नैमित्तिक आणि प्रासंगिक

कर्म) असेल. त्याला कशातच स्वारस्य नसेल. त्याचे ध्यान ब्रह्मात असेल. जे मिळेल ते खाईल. त्याच्या मनात कांही इच्छा झाली तर त्याचा तो अभ्यास करत असेल व ती कां झाली त्याचा विचार करत असेल. तो कधीही त्याच्या संन्यास मार्गापासून हटणार नाही. तो त्याच्या श्वासोंश्वासावर लक्ष केंद्रीत करून ध्यान करत असेल निवांत काळी. सामान्यांना असे जीवन मृत्यू समान वाटेल.

ऋषी हरीत सांगतात कीं, मोक्षाच्या मार्गावरील संन्याशी परत फिरून मागे पहात नाही. त्या मार्गात, त्याला अनेक अध्यात्मिक सुख देणारे अनुभव येत असतात जे तो कधी कोणाला सांगत नाही. त्याला अनेक दैवतं भेटून जातात पण त्याला ते समजत नाही. त्याच्यावर ब्रह्माचे सुक्ष्म लक्ष असते फक्त त्याला ते माहित नसते. लोकपाल देवता व त्यांचे गण अशा विरक्ताची निगा राखतात. त्याचे जीवन पापमय शक्तींपासून ते संरक्षित करतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशेपांच संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे सहा

युधिष्ठीर पुढे विचारतो, सगळ्यांना असे वाटते की, आम्ही फार मोठे नशिबवान आहोत. परंतु, खरे तर आम्ही अतिशय हालाखीच्या अवस्थेत आहोत. सगळ्या जगाने आम्हाला मान दिली आहे, आम्ही देवतांचे मुलगे आहोत, पण, आम्ही जे दुःख अनुभवले आहे त्याची कोणाला कल्पना नाही. मला वाटते कीं, जन्म मिळणे ह्यातच दुःखाचे मूळ असते. त्यासाठी आम्ही बैराग्य आमच्या पुढील जीवनासाठी स्विकारावे असे मला सारखे वाटते. म्हणजे आमच्या दुःखाचा अंत होईल. महान ऋषी जे सतरा बंधनातून (पांच श्वास, मन, बुद्धी, दहा इंद्रिये) आणि पांच दोषातून (इच्छा, क्रोध, मोह, भिती, निद्रा) जे आत्म्याला जन्म मरणाच्या बंधनात अडकवून ठेवतात. आम्हाला ते केव्हां व कसे साध्य होईल त्याची चिंता पडली आहे.

भिष्म त्याला बोलतात, सगळे संपते कांहींही अनंत नाही ह्या मायेच्या सृष्टीत. प्रत्येकाचे ठरलेले काम असते ते त्यांना करावे अशी ब्रह्माची अपेक्षा असते. तू समजतोस कीं, तुझे वैभव तुझा दोष आहे पण ते समजणे अयोग्य आहे. तू सत्य काय आहे ते जाणतोस, म्हणून तू तुझ्या मोक्षाकडे सर्व दुःखांचा अंत होऊन जाणार आहेस. शरीर धारण करणारा आत्मा त्याचा तो धनी नसतो. त्याच्याबरोबर त्याची गतजन्माची कर्मविपाकाची ओझी असतात. त्यानुसार तो त्या जन्मात सुख आणि दुःख अनुभवत असतो. परंतु, जर तो त्या जन्मात कांहीं गोष्टींमध्ये गुंतला तर त्याच्या दुःखात वाढ होत असते. अशारितीने त्याचा जन्मोजन्मीचा प्रवास होत असतो. अनुभवाच्या द्वारा व श्रद्धेने जे समजते त्याच्या जोरावर तो त्याच्या सुख दुःखाच्या भोवर्यातून बाहेर येत असतो. ब्रह्म समजण्यासाठी त्याला प्रथम (अंध) श्रद्धेने ते मान्य करावे लागते त्यानंतर खरा गुरू मिळाला तर त्याचा तो प्रवास सुकर होत जातो. त्या प्रवासात त्याला ब्रह्म अनेक रित्या (विविध देवतांच्या मदतीने)मदत करत असते व त्याच्या वासना त्याला मागे खेचत असतात. हि खेचाखेच फार क्लेष देणारी असते. ते अव्यक्त ब्रह्म कोणत्याही कृत्याने साध्य होत नाही. ते फक्त विचारांच्या मदतीने समजता येते कारण

ब्रह्म एक विचार आहे. त्यानंतर त्याला ब्रह्माचे ज्ञान होते. जे तो दुसर्या कोणाला सांगू शकत नाही. ह्याबाबतीत एक संवाद मला आठवतो तो मी तुला सांगतो, दैत्य राजा वृत्र त्याची सत्ता घालवल्यानंतर केवळ त्याच्या बुद्धिच्या जोरावर शोध घेऊ लागतो. तो दुःख करण्यात त्याचा समय व्यर्थ घालवत नाही. तो त्याचा गुरू उशनास कडे जातो. उशनास त्याला विचारतो कीं, त्याच्या हरण्यामुळे तो दुःखी झाला आहे कां? वृत्र त्याला उत्तर देतो, "मी केलेल्या तपस्येमुळे व सत्याचा अभ्यास असल्यामुळे मी ह्या अवस्थेत सुद्धा कष्टी झालेलो नाही. काळाच्या प्रभावाने प्राणी नरकात पडतात. तरी ते तेथे समाधानात रहातात. ते कोठे फेकले गेले त्याची त्याना फिकीर नसते. त्यांच्या सुख दुःखाच्या अनुभवामुळें त्यांचे पाप आणि पुण्य संपत असते. त्यानंतर ते पुन्हा नव्या संधीमुळें प्राण्यात जन्म घेतात. त्यातून नवीन कर्म विपाका सुरू होतात. इच्छांच्या भोवर्यात अडकलेला तो परत परत जन्म घेत रहातो. ते सगळे काळाच्या बंधनात होत असते हे मला ठाऊक आहे". ते ऐकल्यावर उशनास त्याला सांगतो, "अरे विद्वान असुरा, तू असे अज्ञानी सारखे कां बोलत आहेस"? वृत्र त्यावर बोलतो, "धनाच्या लोभासाठी मी किती तीव्र तपस्या केली ते आपल्याला ठाऊक आहे, मी सगळे भोग घेत सगळ्या तिनही जगात कसा फिरत असे ते आपण व इतर ऋषी चांगलेच जाणत अहात. मी कोणालाही भित नव्हतो. ती सगळी माझी कमाई होती. मी पूर्वीच्या काळी इंद्राशी लढत असें. त्यावेळी मी हरीला पाहिले आहे. नारायण ज्याला अनेक नांवाने ओळखतात जसे, वैकुंठ, पुरूष, अनंत, शुक्ल, विष्णू, सनातन, मुंजकेषी, हरीष्मशृ आणि ब्रह्मा. ते झाले तरी अजून मला कांहीं अनुभव घ्यायचे राहिले आहेत. मला अजून हंसाचे (ब्रह्म) दर्शन झालेले नाही. त्यासाठी मी तुम्हाला विनंति करत आहे, "मला सांगा, ब्रह्मा कोणत्या कर्माला समृद्धी देत असतो. तसेंच तिचा र्हास कसा होतो? कशातून हे सगळे जीव उत्पन्न होतात"? त्यांचे कार्य कसे होत असते. असे काय केले म्हणजे तो ब्रह्मात एकरुप होतो. ते कसे साध्य करावयाचे. मला ते शिकवा". त्याला जे उशनास सांगतो ते मी तुला सांगणार आहे. ते तुम्ही सगळे पंडूपुत्र नीट ऐका.

वृत्राच्या विनंतिप्रमाणे उशनास सांगू लागतो. मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सहावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे सातवा

उशनस बोलतो, "मी त्या दिव्य शक्तीला प्रणाम करतो जी ही सृष्टी सांभाळत आहे. मी तुला आता सांगतो त्या दिव्य देवताची महती ज्याचा माथा म्हणजेच मोक्ष आहे".
अशारितीने ते दानव व त्यांचा गुरू संवाद करत होते. त्यावेळी तेथे महर्षी सनतकुमार आले, त्यांना बोलावले होते दानवांना शिकवण्यासाठी. त्यांचे यथोचित स्वागत झाल्यानंतर ते त्यांना दिलेल्या आसनावर बसतात. उसनस त्यांना बोलतात, "अहो महामुनी ह्या असुरांना आपण विष्णूचे महात्म्य समजावून द्या. ते ऐकल्यावर सनतकुमार बोलतात, "ऐका, अहो दैत्य राजांनो, मी विष्णूचे महात्म्य कोणते ते सांगतो. सगळी पृथ्वी त्याच्या हातावर असते. त्याच्या कृपेने सगळे चराचर उत्पन्न होतात. आणि तसेंच नष्टसुद्धा होतात. त्याला समजण्यासाठी केवळ त्याची स्तुती करून भागत नाही. केवळ तपस्या करूनही तो प्राप्त होत नसतो. यज्ञसुद्धा कांहीं उपयोगाचे नसतात. त्याला प्रसन्न करण्याचा एकच मार्ग असतो व तो आहे आत्मसंयमन, चांगुलपणा आणि इंद्रीय संयमन, ब्रह्मचर्य. ते चार यज्ञ उपयोगाचे असतात. शरीराच्या भोगांत आत्म्याला स्वारस्य अजिबात नसणे हेंच मुख्य साधन आहे विष्णूला समजण्याचे. शरीराच्या भोगांत न गुंतता रहाण्याची साधना साध्य होण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतात. खर्या औदासिन्यात जे गेले ते मात्र एकाच जन्मात त्याला भेटतात. त्याचे सगळे दोष त्याच्या एकाच जन्मात साफ होतात. इच्छांबद्दल कुतूहल असणे मोक्ष मार्गात अडथळा असतो. त्याचवेळी शरीराकडे दुर्लक्ष करणेसुद्धा अयोग्य समजले जाते. आपल्या प्रत्येक विचारांवर, त्यानुसार केलेल्या कृत्यांवर आपल्या बरोबर असलेले सहा लोकपाल लक्ष देऊन असतात त्याची ज्याला जाणीव असते तोंच खर्या निरिच्छ अवस्थेत जाऊ शकतो. थोडी सफाई केली कीं सगळे झाले असे समजणारे कधींच विष्णूपर्यंत जात नाहीत. पोट बिघडले असेल तर तोंडाला दुर्गंधी येते ती लपवण्यासाठी कितीही सुगंधी पदार्थ खाल्ले तरी ती दुर्गंधी लपत नसते. केवळ पोट साफ करण्यानेच आपला

श्वास शुद्ध होत असतो तसें हे असते. सत्त्व अवस्था खर्या अर्थाने ज्यांने प्राप्त केली व ज्यांने त्याद्वारा त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवली तोंच विष्णूला ओळखू शकतो. आता सांगतो ते कोणते वागणे असते ज्यामुळे त्याला सात्त्विक अवस्था प्राप्त होते. जीव कां गुंततात व गुंतत नाहीत. त्याची कारणे कोणती असतात"? विष्णू अनेक गुणांनी सज्ज असतो. तो वैश्विक वायू असतो. तो संती, दंती, उपरती, तितिक्षा आणि समाधी अशा अवस्थांतून जावे लागते तेव्हां समजतो. असें सांगतात कीं, त्याचे पाय जमिनीचे आहेत. त्याचा माथा स्वर्गात आहे. त्याचे हात दहा दिशा असतात, त्या मधील प्रदेश त्याचे कान असतात, सूर्य त्याचे डोळे आणि चंद्र त्याचे मन असें सांगतात. त्याची जिव्हां पाणी असते. त्याचे तीन गुण विशेष आहेत त्यांना सत्त्व, रज आणि तम म्हणून सांगतात. सगळ्या मोक्षार्थींचे तो गंतव्य असतो. सगळ्या गोष्टींचा त्याग करणार्याला तो मिळत असतो. प्रणव त्याचा ध्वनि असतो. त्याला असंख्य मुख असतात. तो खरेतर चांगुलपणाचा पुतळा असतो. तो सत् आणि असत् सुद्धा आहे. तोंच ब्रह्मदेव आहे. त्यालाच विष्णू म्हणतात. त्यालाच अश्विनी कुमार म्हणतात. तोंच इंद्र आहे. तोंच यम, कुबेर, वरुण आहे, जे लोकपाल असतात. तरी यज्ञ करणारे त्यांची वेगवेगळी पुजा करतात. वेद त्याचा श्वास असतात. अहो दैत्यांच्या राजा, त्यास असें वाटत असते कीं, सगळ्या चराचरांनी सलोख्याने एकत्र रहावे. जे तसे रहातात त्यांना ब्रह्मलोकी स्थान मिळते. त्या प्रजातीच्या उत्पन्न होण्याच्या काळापासून ती प्रजाती कालवश होण्यापर्यंतच्या काळाला कल्प म्हणतात. अशी अनेक कल्प ते रहात असतात. चरांप्रमाणे अचरांचे सुद्धा तसेंच असते. त्यांचे मोजमाप कसे असते ते सांगतो, ऐका दैत्यानो, समजा एक तलाव पांचशे योजने लांब आणि शंभर योजने रुंद आहे व एक क्रोसा खोल आहे. असे असंख्य तलाव आहेत. कल्पना करा अशा तलावांतून त्यातील पाणी काढावयाचे आहे व तेसुद्धा केसाच्या मदतीने तर सांगा किती काळ लागेल ते सगळे तलाव रिकामे करण्यासाठी"? तो किती काळ असेल त्याला कल्प समजले जाते. सृष्टीतील प्राण्यांचे रंग सहा प्रकारचे असतात. काळा, भुरा, लाल, पिवळा, नीळा आणि शुभ्र असे आहेत. ते तीन गुणांच्या (सत्त्व, रज आणि तम) मिश्रणातून होत असतात. जेथे तम प्रबळ असतो सत्त्व नीचांकी असतो, मधल्या जागी

रजस असतो. अशात काळा रंग प्रमुख असतो. जेव्हा रज प्रबळ असतो त्यापेक्षा सत्त्व कमी असतो व तम मध्यम असतो भुरा रंग दिसतो. तम कमी असेल तर नीळा रंग दिसतो, सत्त्व मध्यम व तम कमी असेल तर लाल असेल. सत्त्व प्रबळ व रज कमी व तम मध्यम असेल तर रंग पांढरा असेल. सत्त्व प्रबळ रज मध्यम व तम कमी असेल तर पिवळा असेल. पांढरा रंग सर्वात चांगला समजला जातो. तो निष्पापतेचा रंग समजला जातो. प्रवृत्तीच्या जीवनात दुःख नसते. पांढरा यशाचा रंग आहे. आत्मा अनेक जन्मातून गेल्यानंतर मोक्ष प्राप्त करत असतो. आत्म्याने किती प्रगती केली आहे ते त्याच्या प्रभावळीच्या रंगाने समजते. कारण आत्मा शरीरात नसतो तो त्या शरीराच्या भोवती असतो. जस जसे त्याचे अध्यात्मिक बळ वाढत जाते त्याचा रंग बदलत असतो. उच्च दर्जाच्या आत्म्याच्या प्रभावळीचा रंग त्याचा गुण दाखवतात. त्या जीवाचा अंतसुद्धा त्या रंगात होणार्या बदलामुळें समजत असतो. आत्मा पुढच्या जन्मी कोण असेल तेसुद्धा त्या गुणांवर अवलंबून असते. जीव ज्या अवस्थांतून जातो त्या अवस्था ठरलेल्या असतात. तरी त्या कांहीं हजार असतात. काळ्या रंगाची प्रभावळ असलेला आत्मा अतिदुषित असल्याने त्याचे भवितव्य निराशाजनक असते. तो बहुधा नरकाच्या योग्येचा असतो. त्याच्या नकारात्मक अध्यात्मिक उर्जेमुळे त्यास त्या सारख्या नकारात्मक शक्ती मदत करत असतात जे तुम्हा दैत्य दानवांच्या अनुभवात आहे. त्याचे जन्म हलक्या योनीत होत असतात. तशा योनींत तो आत्मा असतांना त्याच्यात सुधारणा होऊ शकते. तशा अवस्थेत तो अनेक युग असतो. त्यात सुधारणा होणार कीं नाही ते कोणालाच माहित नसते. त्याची सगळी पापं खर्च होतात त्या विविध योनीमधून जातांना. पापं संपल्यामुळें तो आत्मा कांहीं निष्पाप योनींमधून जन्म घेत असतो. त्यात वन श्वापदं असतात. सांबर, हरण अशा त्या अनेक निष्पाप योनी असतात. त्याची सात्त्विकता वाढू लागते. अशात त्या जीवांना उच्च दर्जाच्या मनुष्य योनीतील माणसांशी संबंध येऊ लागतो. ते सगळे सावकाशपणे होत असते. प्रत्येक जन्मात थोडा असा त्याचा उद्धार होत असतो. त्या सुमारास त्या जीवांना लाल रंगाचे स्वरुप प्राप्त होते. परंतु, त्या जन्मात त्या आत्म्याने त्याची सात्त्विकता वाढवली नाही तर तो पुन्हा खालच्या योनीत जात असतो. पापमय आत्मे रोगजंतुच्या योनीत प्रवेश करतात. त्यात

त्याची सुधारणा झाली तर त्याची प्रभावळ पिवळी होते. त्यात अनेक जन्म गेल्यानंतर त्याला मनुष्य योनी प्राप्त होते. त्या योनीत तो आत्मा अनेक कल्पे असतो. त्यानंतर त्याच्या कर्मविपाकानुसार त्याला देवत्व अथवा पिशाच्च योनी प्राप्त होत असते. ते आत्मे तशा जन्मांत अनेक चांगली व वाईट कामं करत असतात त्याप्रमाणे त्यांना विविध चांगले व वाईट भोग मिळत असतात. त्या मानव जन्मात तो आत्मा पुण्य करत असतो जर तशी त्याची बुद्धी असेल. तशांत कितीतरी जन्म होत असतात. तशांत तो आत्मा त्याच्या पुण्यप्रभावामुळे जास्त उच्च दर्जाच्या योनीत जात असतो. त्यावेळी त्याच्यावर कोण्या ऋषीची कृपा होण्याची शक्यता असते. तसे झाले तर त्याचा अध्यात्मिक विकास जोमांने होत असतो. त्यात किती जन्म जातात त्याचा हिशोब नाही. जर त्याच्यावर कलीची नजर पडली तर त्याचा र्हास होऊ लागतो. अशाप्रकारे त्याचा प्रवास जन्मोजन्मीचा होत असतांना त्याला मोक्षाची आवड कशी उत्पन्न होते ते मी तुला सांगणार आहे. मोक्षाची इच्छा करणार्या जीवांना सातशे प्रकारची कर्मं करावी लागतात ज्यांच्या मुळें त्याचा मोक्षमार्ग सुकर होत असतो. त्यात जसा तो प्रगती करतो त्याच्या प्रभावळीचा रंग लाल वरून पिवळा व नंतर पांढरा होत जातो. त्याचे तेज वाढत असते जशा तो त्यात प्रगती करत असतो. त्याकाळात त्याचा प्रवास विविध प्रकारच्या जन्मातून होत असतो. निरनिराळ्या आठ प्रकारच्या अवस्थांतून तो जात असतो. त्याला विलक्षण सुख देणारे अनुभव येत असतात. ते अनुभव वैचारीक स्वरुपाचे असतात. त्याचा संबंध शरीराशी नसतो म्हणून ते अनुभव त्याला अव्यक्त स्वरुपात मिळत असतात. निरीच्छ, वासनामुक्त असे जीवन त्याकाळात तो जगत असतो. ते बहुधा अव्यक्त स्वरुपाचे असते. त्या सुमारास तो तुरीया अवस्थेत गेलेला असतो. तीन अवस्थांच्या पलिकडे तो गेलेला असतो. जागृती, निद्रा आणि सुशुप्ती ह्यांच्यातून तो गेलेला असतो. आता तो स्वर्गात गेलेला असतो. अनेक कल्प तो तसा रहातो व अनेक सुख भोगत असतो. परंतु, त्यांत जर त्याला मोह उत्पन्न झाला तर तो खाली फेकला जातो. तरी तो उच्च अवस्थेतच असतो. तो पूर्ण सत्त्व असतो. त्याला त्यात अनेक उच्च कुलिन जन्म मिळत असतात. स्वर्गात असतांना गंधर्व, अप्सरा, यक्ष असें उच्च दैवी योनी त्याला प्राप्त होत असतात. त्या काळात तो पुन्हा पुन्हा माणसात जन्म घेतो

तेव्हा त्या अनेक जन्मात तो समाधीत जात असतो तो ते अनुभव घेत असतो. त्या अनेक जन्मात तो इतरांना योगविद्या शिकवत असतो. ऋषीच्या अवस्थेत असतो. तेव्हां त्याला परमानंद अनुभवण्यास मिळतो. कांहीं त्या अनुभवाला "महादेव लोक", म्हणतात कांहीं "नारायण लोक", म्हणतात. ते ब्राह्माच्या फार जवळ असतात. परंतु, अजून ब्रह्मामध्ये विलीन झालेले नसतात. ते होत असतांना जर कल्पाचा काळ संपला तर ते आत्मे पुढील कल्प सुरू होईस्तोवर तसेंच सुप्त अवस्थेत थांबून रहातात. त्या अवस्थेत त्याच्या लिंगदेहासह तो तसाच नवीन कल्प सुरू होण्याची शांतपणे वाट पहात असतो. जेव्हां नंतरचे कल्प सुरू होते तो अक्षय असा त्यात ब्रह्माकडे पहात असतो. जसे मार्कंडेय ऋषी ब्रह्मांडाकडे पहात असतात.

असे मी तुला सगळे सांगितले आत्म्याचा प्रवास कसा होतो एका कल्पातून दुसर्या कल्पात. मी तुला नारायण ऋषीचे महात्म्य सांगितले.

वृत्र ते ऐकून बोलतो, आपण जे सांगितले त्यामुळे माझ्या सगळ्या शंकांचे समाधान झाले आहे. विष्णूचे सृष्टीचक्र जे अव्याहतपणे फिरत असते त्याची कल्पना आपण मला दिली आहे. माझ्या मनात आता कोणतीही काळजी उरलेली नाही. त्याच्या महानतेची मला कल्पना आली आहे.

भिष्म पुढे सांगत असतो, ते ऐकल्यावर वृत्र त्याचा श्वास अडकवून समाधीच्या उच्चतम अवस्थेत जातो.

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा आपला जनार्दन हांच विष्णू आहे हे खरे कां"?

भिष्म सांगतात, सर्वश्रेष्ठ देवता जिच्या सहा गुणांची नेहमी स्तुती होत असते, तो हांच केशव आपला सखा आहे. ज्याचे चित्त ध्यान धारणा आणि समाधीने शुद्ध झाले आहे. तोंच तो आहे. तो पराविद्या आणि अपराविद्या ह्या दोनातही जाणकार आहे. जे ब्रह्माचे अंतिम ज्ञान सांगतात.

युधिष्ठीर पुढे विचारतो, "तुम्ही ते सगळे जाणता त्याप्रमाणे तुम्हाला माहित आहे कीं, वृत्राला समजले होते कीं, त्याचा अंत त्या ब्रह्मात होणार आहे. तो साध्यांच्या योग्यतेला जात होता. असा मनुष्य पुनर्जन्माच्या बंधनातून मुक्त झाला होता. आम्ही

मात्र जगाच्या सुख दुःखाच्या कचाट्यात अडकलेलो आहोत. आमच्या आत्म्याचा रंग कोणता असेल ते सांगता येणार नाही. कदाचित तो काळा किंवा लाल असेल".

भिष्म त्याला समजावणीच्या सुरात सांगतात, "तुम्ही पांडव अहात. तुमचे जन्म शुद्ध आहेत. तुमचे सगळे जीवन शुद्ध आहे. तुम्ही देवांच्या वर्णाचे अहात. पुढील कल्पात तुम्ही देवलोकात जन्म घेणार अहात. तेथे सगळ्या सोयी ज्या सिद्धाना मिळतात त्या तुम्हाला मिळणार आहेत. म्हणून तू अजिबात चिंता करू नकोस.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सातवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे आठवा

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा वृत्राची पुण्याकरता किती लालसा होती"? त्याचे ज्ञान अघात होते, त्याची विष्णूची भक्ती तीव्र होती. त्याचे अध्यात्मिक सामर्थ्य सुद्धा विलक्षण होते. अशा परिस्थितीत वृत्राचे वागणे असें कां होते"? ते तुम्ही मला सांगितले आहे. परंतु, ते मला समजले नाही, तरी ते मला पुन्हा सांगाल तर बरे होईल. एवढा ज्ञानी जो उपनिषद आणि वेद जाणणारा होता, तरी इंद्राकडून कसा हरवला गेला"? मला ते सांगा. त्या समराची माहिती मला पुन्हा ऐकावयाची आहे. भिष्म पुढे सांगतात, फार पूर्वीच्या काळी ते झाले. इंद्र त्याची देवांची सेना घेऊन त्याच्या रथाने जात होता. त्याच्या वाटेत वृत्र एकाद्या मोठ्या डोंगरासारखा उभा ठाकला. त्याची उंची पाचशे योजने इतकी होती. त्याचा घेर तीनशे योजने होता. त्या अजिंक्य असुरास तो पहातो ज्याला कोणी आव्हान देऊ शकत नव्हते. देव त्याचे रुप पाहून घाबरतात. इंद्राचीसुद्धा गाळण उडते. त्यानंतर त्यांच्यामध्ये युद्ध होते. दोनही बाजूचे जोरांनी ओरडत लढत होते. इंद्राला समोर उभा पाहून असुर राजा वृत्रीला कांहींच भिती वाटली नाही. त्याला त्याची सगळी शक्ती वापरण्याचीसुद्धा आवश्यकता वाटली नाही. त्यांच्यास लढाई सुरू झाली. विविध आयुधानी ते लढत होते. ब्रह्मा आणि अनेक ऋषी ती लढाई पहाण्यासाठी हजर झाले होते. त्यांच्या बरोबर सिद्ध सुद्धा तेथे आले ते युद्ध पहाण्यासाठी. गंधर्व आणि अप्सरा सुद्धा देवांना उत्तेजन देण्यासाठी त्यांची वाद्ये घेऊन वाजवत वाजवत आली होती. त्यांच्या वाद्यांच्या आवाजात देव आणि असुरांच्या शस्त्रांचा खणखणाट ऐकू येत होता. त्यावेळी वृत्राने सगळ्या आकाशात काळ्या धोंड्यांचा मारा करावयाला प्रारंभ केला. देव त्यांचे बाण, भाले फेकत होते. वृत्र त्याच्या मोहजालाच्या किमयेने देवांना घाबरवून टाकत होता. इंद्र त्याच्या भ्रम चलाखीपुढे हतबल झाला होता. वसिष्ठ त्याला मदत करण्यासाठी साम गाऊन त्याची शक्ती वाढवण्याचा प्रयत्न करत होते. तेथे वसिष्ठ बोलतात, "अरे इंद्रा, तू सर्वात श्रेष्ठ देव आहेस. तू सगळ्या दैत्यांचा आणि असुरांचा पाडाव करण्यासाठी नेमलेला आहेस. तू कां चिंता करत आहेस"? सगळे देवर्षी, तुला

पहात आहेत. त्यांच्यापुढे तू हरणे सगळ्या देवांना व स्वर्गाला नामुष्कीचे ठरेल. असा हतबल होऊ नकोस. तो त्रिनेत्र तुझ्याकडे मोठ्या आशेने पहात आहे. बृहस्पती आणि ब्रह्मण ऋषी तुझी स्तुती करत आहेत कारण तू जिंकावे असे त्यांना वाटत आहे.

भिष्म पुढे सांगतात, अशा उत्तेजक बोलण्याने वसिष्ठ ऋषी शक्राचे मनोबळ वाढवत होते. त्यानंतर शक्र त्याच्या योगसामर्थ्याने वृत्राची मोहमाया तोडून टाकतो. त्यानंतर अंगिरसाचा मुलगा बृहस्पति आणि इतर ऋषी महादेवाला विनंति करतात. त्याला सांगतात की, तिन्ही जगाच्या भल्यासाठी त्यांने इंद्राला मदत करावी आणि वृत्राचा पराजय घडवावा. त्यानंतर शिव एका भयंकर व्याधीचे रुप घेऊन त्या वृत्राच्या अंगात शिरतो व त्याला आजारी करतो. त्याचवेळी भगवान विष्णू इंद्राच्या वज्रात शिरतो. महेश्वर बोलतात, तो पहा वृत्र तुझ्यापुढे त्याची मायावी सेना घेऊन उभा आहे. त्याची ताकद फार जास्त आहे. तुझ्या योग शक्तीने त्याचा पराभव करून टाक. परंतु, त्याला कमी समजू नकोस. कारण त्याने गेली साठहजार वर्षे तपस्या करून ते सामर्थ्य संपादन केले आहे. त्याच्याकडे ब्रह्माने दिलेले अनेक आशिर्वाद व त्यामुळे त्याला मोठी शक्ती प्राप्त झाली आहे. त्यामुळें तो भल्यामोठ्या पहाडासारखा दिसत आहे. त्याच्यावर तुझ्या वज्राने वार कर. तो दितीचा मुलगा मारून टाक. भिष्म पुढे सांगतात, वृत्राला शिवाच्या आजाराने आतून कमजोर केले होते. ते पाहून सगळ्या देवता आनंदी होतात. कारण आता त्याला हरवणे सोपे होणार होते. ते त्यांची रणवाद्ये वाजवू लागतात. ऋषी शक्र आणि इशान देवतेची स्तुती करू लागतात. ऋषींच्या स्तुतीमुळें इंद्रात मोठे बळ आले होते तो भयंकर दिसू लागला. ते त्याला लवकर वृत्राला मारून टाकण्यासाठी सांगत असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे आठ संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे नववा

भिष्म सांगतात, "जेव्हां वृत्राच्या अंगात तो ताप शिरला त्याची लक्षणं दिसू लागली होती. असुराच्या तोंडातून गरम ज्वाळा निघू लागतात. त्याची अंगकांती फिक्कट पडली होती. तो थरथरत होता. त्याचा श्वास जोरात होत होता. त्याचे डोक्याचे केस ताठ उभे राहिले होते. त्याच्या तोंडातून कोल्ह्यासारखे चित्कार येऊ लागले. आकाशातून अशनि त्याच्यावर पडू लागले. गिधाडं, कावळे, करकोचे जोरांने ओरडत होते. ते वृत्राच्या डोक्याभोवती घिरट्या घालत होते. त्या सुमारास इंद्र देवांच्या जोरदार आवाहनाने प्रेरित होऊन वृत्राकडे तीक्ष्ण नजरेने पहात होता. वृत्र त्या बिमारीने त्रस्त असा त्याच्या रथात बसला होता. त्याच्या मुखातून विचित्र आवाज निघत होते. इंद्र त्याचे वज्र नेम धरून वृत्रावर फेकतो. युगांता झाल्यासारखे मोठे आवाज होतात. देव जिंकल्याच्या जोशात मोठमोठ्याने आक्रोश करत असतात. ते पहातात कीं तो प्रचंड आकाराचा असुर कोसळतो. तो मेला आहे हे समजल्यावर मेघावत जो दानवांचा शत्रू आहे, त्याच्या देवांच्या बरोबर स्वर्गात जातो. त्याच्या हातात तो वज्र होता ज्यात विष्णू होता. त्यानंतर ब्रह्महत्त्येचे पाप शरीर धारण करून वृत्राच्या मृत देहातून बाहेर येऊ लागते. त्याच्या गळ्यात मुंडमाळा होत्या. त्याचे भयंकर दात, कुरूप चेहरा आणि जाड केस कोणालाही घाबरवून टाकणारे होते. ते स्त्रीरुपात होते. एकाद्या राक्षसिणीसारखे होते. तिच्या अंगावर वल्कलाचे वस्त्र होते. ती इंद्राला पकडण्याचा प्रयत्न करते. परंतु, वृत्राचा व्याध आधीच स्वर्गाकडे गेला होता. तरी ती राक्षसिण त्याच्या अंगात घुसण्याचा प्रयत्न करते. त्या धक्क्याने इंद्र घाबरतो. इंद्र तिला टाळण्यासाठी कमळाच्या देठात शिरतो व तेथे लपून बसतो. तेथे तो बराच काळ लपून बसलेला रहातो जोवर ते ब्रह्महत्त्येचे पाप त्याला शोधत होते. परंतु, त्याला त्यात यश मिळत नाही. त्या लपंडावात इंद्र त्याची अध्यात्मिक उर्जा बरीच खर्च करतो व अशक्त होतो. अखेरीस तो ब्रह्माकडे विनंति करतो. ब्रह्माला समजते कीं वृत्राची ब्रह्महत्त्या करणारी पाप शक्ती इंद्राच्या मागे लागली आहे. ब्रह्महत्त्या शक्तीला ब्रह्मदेव मधूर वाणीत

विनंति करतो कीं, ती शांत होईल. तो तिला सांगतो कीं, ती इंद्राचा पिच्छा पुरवणे बंद करील. त्याकरता तिला काय पाहिजे ते तिने सांगावे. ब्रह्महत्त्या राक्षसिण बोलते, "साक्षात ब्रह्मदेव मला सांगत आहेत तेव्हां माझी मनिषा पूर्ण झाली आहे. आता मी कोठे रहावयाचे ते कृपया सांगा. त्याची आज्ञा करा. ती पुढे बोलते कीं ती इंद्राचा पिच्छा सोडेल पण त्याकरता तिला ते काय देणार"? ब्रह्मदेव तिला सांगतात कीं, ती अग्नीमध्ये जाईल व तेथे राहिल. तेव्हां अग्नीदेव तेथे उपस्थित होतात. तो बोलतो, "आपली काय आज्ञा आहे ती सांगा"? ब्रह्म बोलतात, "मी त्या ब्रह्महत्त्येचे अनेक तुकडे करणार आहे कारण त्याशिवाय इंद्राची सुटका होणार नाही. त्याचा चौथा भाग तू घेशिल.

अग्नी बोलतो "तो घेतल्यानंतर माझे कसे होईल? ते सांगा". ब्रह्मदेव बोलतात, जो मनुष्य तमोगुणाने प्रेरित असेल तो तुला अर्घ्य देणार नाही. वानस्पतिक शिधा जो ब्रह्महत्त्याराचा आहे तो तू स्वीकारशिल. त्यामुळे ती राक्षिसिण त्या तमोगुणीमध्ये शिरेल. त्यातून तुझी सुटका होईल. अशारितीने शाकाहारी लोकांत (वैश्यांत) ती शिरते.

भिष्म पुढे सांगतात, अग्नी ते मान्य करतो. त्यामुळें तो चौथा भाग त्याच्यामध्ये शिरतो. त्यानंतर ब्रह्मदेव सगळ्या वृक्षांना, झाडेझूडपे ह्यांना बोलावतो, ते सगळे घाबरून गेले होते. ते देवाला बोलतात, त्या पापापासून आमची कशी सुटका होणार"? कृपया आम्हाला त्यात गुंतवू नका. आम्ही नेहमी उन्हातच तापून निघत असतो त्यात आणखीन हे पाप नको आमच्यावर टाकू. त्याशिवाय माणसे व इतर प्राणी आमची मोडतोड करत असतात. तरी तुमची आज्ञा झाली तर आम्ही त्या पापाचा कांहीं हिस्सा घ्यावयाला तयार आहोत. परंतु, आमच्या सुटकेचे काय ते सांगा.

ब्रह्मदेव बोलतात, तुमचा हिस्सा त्या माणसाला जाईल जो पर्वाच्या दिवशी तुमची झाटणी, कापणी, निदणी, खुरपणी करेल.

भिष्म पुढे सांगतात, ते ऐकल्यावर वृक्ष देवता ते पाप घेऊन जातात. त्यानंतर ब्रह्मदेव अप्सरांना बोलावतात व गोड आवाजात बोलतात, ही ब्रह्महत्त्या इंद्राच्या देहात जाणार होती. परंतु, तुम्ही तिचा चौथा भाग घ्यावा. त्यामुळे इंद्राची सुटका त्यातून होणार आहे.

अप्सरा बोलतात, अहो पितामहा, तुमच्या आज्ञेने आम्ही कांहींही करण्यास तयार आहोत. परंतु, त्या पापाच्या बोजातून आमची सुटका कशी होणार ते सांगा.
ब्रह्मदेव बोलतात, तुमच्या हृदयातील वासनेची आग कमी होईल. त्यासाठी जो पुरूष त्याच्या स्त्रीबरोबर तिच्या पाळीची वेळ नसतांना बळजबरीने संबंध करील तेव्हां त्या पापाचा हिस्सा त्याच्याकडे जाईल.
भिष्म पुढे सांगतात, ते मान्य करून त्या विविध अप्सरा त्यांच्या ठिकाणी जातात. त्यानंतर ब्रह्मदेव पाण्याला बोलावतो. ती जलदेवता त्वरित त्याच्याकडे जाते. ती विचारते, "काय आज्ञा आहे"? ब्रह्मदेव त्यांना बोलतो, ते पाप इंद्राला बाधत आहे. कारण त्यांने वृत्राचा नाश केला. त्यातील चौथा भाग तुम्ही घ्या. जलदेवता बोलते, आपण जे सांगाल तसे करीन. परंतु, त्यातून आमची सुटका कशी होणार तेसुद्धा सांगा. ब्रह्मदेव बोलतात, "जे मूर्ख लोक तुमच्या मध्ये लघवी करतील, त्यांची थुंकी टाकतील, शौंच करतील त्यांना ते पाप बाधेल व त्याप्रमाणात त्या पापापासून तुमची सुटका होईल. भिष्म पुढे सांगतात, त्यानंतर ती ब्रह्महत्त्या राक्षसिण तिला दिलेल्या ठिकाणी निघून जाते. अशारितीने इंद्राची त्या पापापासून सुटका होते. त्यानंतर ब्रह्माच्या परवानगीने तो अश्वयज्ञ करतो. त्या यज्ञामुळे त्याचे शुद्धीकण होते. इंद्र त्याची गेलेली ताकद मिळवतो. पुढे असंख्य शत्रूंचा तो नाश करतो. त्यामुळे त्याला फार आनंद मिळतो. त्या वृत्राच्या रक्तामधून लाल रंगाचे कोंबडे जन्मतात. म्हणून ब्राह्मणांनी लाल रंगाचे कोंबडे, कोंबडी खावयाची नसते. अशी आहे वृत्राच्या वधाची कहाणी. त्या इंद्रासारखा तूसुद्धा चतुराईने सगळी पृथ्वी पादाक्रांत करशिल. जे प्रत्येक पर्वाच्या दिवशी हा भाग वाचतील अथवा ऐकतील ते त्यांच्या सगळ्या पापापासून मुक्त होतील. आता मला सांग मी आणखीन काय तुला सांगू.
मोक्ष धर्म पर्व भाग एकशेनववा संपला.

*वाचकहो, वनपर्वात वृत्राच्या इंद्राकडून झालेल्या वधाची वेगळी कथा दिली आहे. हे तुमच्या लक्षात आले असेल. ह्या दोन कथांतील एक भ्रष्ट आहे तरी मी दोनही दिल्या आहेत. महाभारतात अशा अनेक कथा विविध स्रोतांतून आलेल्या सापडतात.*

*त्यातील कोणती खरी ते समजत नाही. एक भाषांतरकार म्हणून मी दोनही दिल्या आहेत. फार जुन्या प्रतीमध्ये हा भाग आढळतो. वनपर्वातील कथा नंतरच्या प्रतींमध्ये आढळते असो,*

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे दहावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो पितामहा, आपण खूप सूज्ञ अहात. तुमचा अभ्यास सगळ्या ज्ञानशाखांचा उत्तम असतो. वृत्राच्या वधाची गोष्ट ऐकल्यावर मला तीन प्रश्न पडले आहेत. आपण सांगितले कीं, वृत्र महादेवाच्या आजाराने बद्ध झाला होता. त्यामुळें हतबल झालेला तो इंद्राकडून मारला गेला. "मला सांगा त्याला त्या आजाराची बाधा कशी झाली"? मला त्या आजाराच्या निर्मितीबद्दल अधिक समजून घ्यावयाचे आहे ते सांगा".

भिष्म सांगतात, "ऐक ते मी तुला सांगतो, ते सगळ्या जगात प्रसिद्ध आहे ते सांगतो. आजार कसे सुरू झाले महादेवाच्या इच्छेतून ते सांगतो. कारण त्या आधी कोणी आजारी पडत नव्हते. वृत्र पहिला आजारी झालेला आहे. फार प्राचीन काळी एक पर्वत होता त्याचे नांव आहे सावितृ. तो मेरू पर्वताचा एक भाग होता. त्यात असंख्य प्रकारची रत्न होती व तो प्रदेश सुंदर होता. परंतु, तेथे कोणी जाऊ शकत नव्हते. त्या पर्वताच्या शिखरावर महादेव रहात होते. त्याच्या बाजूला त्या पर्वताची मुलगी रहात असे. त्यांची सेवा करण्यासाठी सर्वशक्तीमान वसू आणि देवांचे वैद्य अश्विनीकुमार तसेंच धनाची देवता वैश्रावण व पुष्कळ गुह्यक (कार्तिकेयाचे सेवक) होते. महान ऋषी उशनस, सनतकुमार, अंगिरस, गंधर्व विश्ववसू, नारद, पर्वत आणि अनेक जातीचा अप्सरा तेथे महादेवाची सेवा करण्यासाठी होते. अनेक प्रसन्न करणारे सुगंध घेऊन वारे वहात होते. तेथे असलेले वृक्ष सदैव फळा फुलानी भरलेले होते. तेथे अनेक विद्याधर, सिद्ध आणि मोठे तपस्वी रहात होते. तेसुद्धा महादेवाची पुजा सेवा करत होते. अनेक भयंकर पिशाच्चे, राक्षस मोठ्या आनंदाने महादेवाची सेवा करण्यासाठी तेथे होते. त्यांचे मार्गदर्शन नंदी करत असतो. तेथे गंगा शरीर धारण करून तेथे उभी होती. अशाप्रकारे मोठ्या थाटात महादेव तेथे रहात होते. कांहीं काळानंतर प्रजापति दक्ष एक मोठा यज्ञ प्रारंभ करण्याचे ठरवतात. वेदांत दिलेल्या रिवाजानुसार तो यज्ञ करावयाचा होता. त्यासाठी इंद्रेचे सगळे देव तेथे हजर होतात. असे ऐकिवात आहे कीं, त्यावेळी

महादेवाचे गण त्याच्या बरोबर गंगा जेथून उगम पावते तेथे जमा झालेले होते. तेथून ते पहातात कीं, इंद्राच्या नेतृत्वात सगळे देव दक्षाच्या दिशेने जात आहेत. तेव्हां उमा त्याचे प्रयोजन काय असें विचारते तेव्हां तिला समजते कीं तिचा पिता एक मोठा अश्व यज्ञ प्रारंभ करत आहे. महादेवाची पत्नी तिच्या पतिला विनती करते कीं, तिच्या पित्यानी एक यज्ञ आरंभिला आहे तरी आपण तेथे गेले पाहिजे. त्यासाठी त्यांना आमंत्रण आहे व त्या कारणांनी ते तेथे आमंत्रित म्हणून जात आहेत. त्यांच्या त्या यज्ञात मला भाग द्यावयाचा नाही असे ठरलेले आहे जुन्या नियमांनुसार. ते ऐकल्यावर पार्वती बोलते कीं, तसे कसे करता येईल"? यज्ञात तुमचा हिस्सा सर्वात मोठा असला पाहिजे उमा तक्रार करते. तुम्ही सर्वात श्रेष्ठ अहात, तुमचा हिस्सा नेहमीच मोठा असला पाहिजे. ती सांगते कीं, तिला फार दुःख होत आहे कीं, तुमच्यावर अन्याय माझा पिता करत आहे. ती संतापाने कंप पावते. सगळी धरणी कंप पावते.

भिष्म पुढे सांगतात, त्यानंतर रागावलेली उमा स्थब्ध होते. तरी तिच्या हृदयातील वेदना जाणवत असतात. हा अन्याय तिला सहन करणे अशक्य होते. ते पाहून शंकर नंदीला आदेश देतात कीं तो त्या उभयतांना त्या यज्ञाच्या ठिकाणी घेऊन जाईल. त्याच्या बरोबर त्याची बिभत्स भूत सेना सुद्धा निघते. ते जोराजोराने भयंकरपणे किंचाळत त्या यज्ञाच्या ठिकाणी निघतात. तेथे गेल्यावर ते त्या यज्ञात रक्ताची आहुति देऊन तो अग्नी विझवतात. कांहीं भयंकर पिशाच्च त्या यज्ञाचे सामान उधळून लावतात. इतर कांहीं तेथे जमलेल्या पुरोहितांना खाण्यास सुरूवात करतात. त्या यज्ञाचा ते विध्वंश करू लागतात. तेव्हां त्या यज्ञाची देवता एका सांबराचे रुप घेऊन तेथून पळून जाऊ लागते. ते पळत आहे ते समजल्यावर महादेव त्याचा पाठलाग करू लागतो. ते पाहून सगळे ऋषी आणि देव घाबरून जातात. महादेवाच्या कपाळातून एक घामाचा थेंब जमिनीवर पडतो. त्यातून एक अग्नी बाहेर येतो. तो युगांताच्या वेळी जसा असतो तसा भयभित करणारा होता. त्यातून एक बुटका मनुष्य निघतो. तो दिसण्यास भयंकर होता. त्याचे डोळे लाल होते, त्याच्या अंगावर पिसं होती जशी घुबडावर असतात. त्याला हिरव्या रंगाची दाढी होती. त्याच्या डोक्यावरील केस ताठ उभे होते. ते रुप भिववणारे होते. त्याला पाहून सगळे देव आणि ऋषी पळून जातात. ते पाहून

ब्रह्मदेव तेथे येतात व शंकराला शांत होण्याची विनति करतात. ते जाहीर करतात कीं ह्यापुढे देवांच्या यज्ञात महादेवाचा हिस्सा असेल. आजवर त्याला हिस्सा न देण्याच्या चुकीबद्दल तो देवांना व ऋषींना महादेवाची माफी मागण्यास सांगतो व त्याप्रमाणे ते महादेवाची क्षमा मांगतात. परंतु, त्यामध्ये जो ताप तयार झाला होता जो त्या बुटक्या गणाच्या रुपात होता त्याचे काय करावयाचे असा प्रश्न निर्माण झाला. जर तो ताप विभागला गेला तरच कांहीं शक्य होईल व म्हणून ब्रह्मा तो ताप विविध प्राण्यांत वाटण्याचे ठरवतो. महादेवाला त्याचा योग्य हिस्सा मिळाल्यामुळें तो फार संतुष्ट झाला होता. महादेव त्या व्यवस्थेला "तथास्तू", बोलून मंजूरी देतात. तो ताप त्यांने कोणा कोणाला दिला ते सांगतो, हत्तीच्या गंडस्थळात कांहीं ठेवला, पहाडातील दगडात शिलाजिताच्या रुपात ठेवला, पाण्यावर तरंगणार्या शेवाळात ठेवला, सापाच्या कातेत ठेवला, गुरांच्या खुरात ठेवला, घोड्याच्या घशात ठेवला, समुद्राच्या खाडीत ठेवला, प्राण्यांच्या अधू दृष्टीत ठेवला, मोराच्या तुर्यात ठेवला, कोकीळेच्या डोळ्यात ठेवला, ते सगळे ताप म्हणून समजले जाऊ लागले. त्याशिवाय असें सांगतात कीं, शेळीच्या पोटात, वाघाच्या भटकण्यात, पोपटाच्या ओरडण्यात सुद्धा तो गेला. त्याशिवाय जन्म घेणार्या प्राण्यांच्या जन्म घेण्याच्या क्रियेत तो गेला. ते आणि अनेक इतर ताप (ज्वर) जे सगळ्यांना त्रास देतात ते शंकराच्या तापाचे अंश असतात. म्हणून अरे युधिष्ठीरा जे जे ज्वर माणसाला आजारी करतात ते सगळे महादेवाच्या रागाचे रुप असतात आणि महादेवाला तेव्हां राग येतो जेव्हां पाप कृत्य अथवा विचार माणसात प्रबळ होतात. जर तू पाप करणार नाही तर तुला कोणताही ज्वर पिडा देणार नाही. म्हणून सगळे ज्वर, व्याधी महादेवाच्या गणांच्या आदेशानुसार होत असतात. त्या ज्वराच्या मदतीने महादेवाने वृत्राची शक्ती नष्ट केली होती. त्यानंतर वृत्रावर इंद्र त्याचे वज्र फेकतो ज्यात विष्णू बसला होता तेव्हांच वृत्राचा वध करता आला नाहीतर ब्रह्माच्या आशिर्वादाने सामर्थ्यवान झालेला असुर वृत्र कधीच मारला गेला नसता. अशारितीने रोगराईची सुरूवात वृत्राच्या वधातून झाली आहे हे लक्षात घे युधिष्ठीरा. भिष्म पुढे विचारतात पांडवांना कीं, आणखीन काय त्यांना ऐकावयाचे आहे त्याच्याकडून ते त्यांनी सांगावे.

जो हे आख्यान नियमितपणे वाचेल अथवा ऐकेल त्याला कोणताही रोग (ज्वर) होणार नाही. तो सदैव आनंदात राहील. त्याच्या सगळ्या मनिषा पूर्ण होतील.
मोक्ष धर्म पर्व भाग एकशे दहा संपला.

*दक्षाच्या यज्ञाची कथा इतरत्र वेगळी दिली आहे त्यात पार्वती त्या यज्ञात प्रवेश करते असे दिले आहे परंतु, शांतीपर्वात मात्र वेगळी कथा दिलेली आहे, त्याची नोंद घ्यावी. पुढील भागात आणखीन एक कथा दक्षाच्या यज्ञाबद्दल आहे, ह्यातील कोणती खरी त्या वादांत मी जाणारा नाही. एक भाषांतरकार म्हणून माझे काम मी करत आहे. मला कोणत्याही वादात जावयाचे नाही. अशा गोष्टींवरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, महाभारताचे कर्ते अनेक आहेत.*

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे अकरावा

जनमेजय बोलतो, मला सांगा महर्षी, प्रजापति दक्ष जो प्रचेताचा मुलगा होता त्याचा अश्वयज्ञ वैवस्वात मनूच्या काळात झालेला कसा उध्वस्त झाला. असे सांगतात कीं, महादेवाची उमा फार रागावली होती कारण तिच्या पतीला त्या यज्ञाचे आमंत्रण तिच्या पित्याने दिले नव्हते. त्या वेळी यज्ञाचे भाग जे तुटलेले होते महादेवाच्या क्रोधामुळे ते पुन्हा कसे जोडले गेले ते सांगा. ते जसे घडले तसे सांगा तुमच्या सांगण्याच्या पद्धतिचे मला फार कौतुक आहे.

वैशंपायन सांगू लागतात, फार पूर्वी दक्ष प्रजापतिने एक यज्ञ करण्याचे ठरवले. हिमालयाच्या माथ्यावर तो करण्याचे त्यांने ठरवले होते. तेथे ऋषी आणि सिद्ध ह्यांची वस्ती होती गंगेच्या तटवर ती जागा ठरली. तेथे उत्कृष्ट वनराई होती. तेथे गंधर्व आणि अप्सरा सुद्धा रहात होत्या. तेथे स्वर्ग आणि पृथ्वी एकमेकांना भिडत होते. तेथे गंधर्व, अप्सरा, राक्षस, सर्प, पिशाच्च, त्यात विशेष करून दोन महत्वाचे गंधर्व ज्यांची नांव होती हह आणि हूहू, आणखीन गंधर्व तुंबरू, नारद, विश्ववसू, विश्वसेन, आदित्य, वसू, रुद्र, साध्य, मरुत, असे सगळे त्या यज्ञासाठी इंद्रासह आमंत्रित होते. सोम पिणारे, धुम्र पिणारे, ऋषी, पितर, त्यांच्या ब्राह्मणांसह आले होते. चारही प्रकारातील प्राणी सुद्धा आमंत्रित होते. गर्भज, अंडज, पंकज, वनस्पती, असे सगळे तेथे हजर होते. सगळे देव त्यांच्या अर्धांगासह आलेले होते. ते त्यांच्या स्वर्गीय रथातून आले होते. ते पाहून ऋषी दधिची फार रागावले आणि बोलले कीं, "हा यज्ञ नाही आणि काहीं धर्माचा सोहळासुद्धा नाही. कारण रुद्र तेथे उपस्थित नाही. हे सर्वजण मृत्यूच्या बंधनाला बोलावा देत आहेत. तुमचे लक्ष कोठे आहे? अशा चुका करत गेलात तर तुमचा नाश निश्चित आहे. तुम्ही अंध झाला अहात कां"? असे बोलल्यानंतर तो महर्षी त्याच्या दिव्य दृष्टीने पहातो कीं, कैलासात महादेव त्याच्या गणांबरोबर व उमा तेथे आहे. नारद तेथे उमेच्या बरोबर होते. ते पाहून योगीराज

असलेले दधीची प्रसन्न झाले. त्यांना समजले पुढे काय होणार आहे. ते पहातात कीं, त्या यज्ञाच्या आमंत्रितांत ते सगळे होते जे महादेवाबद्दल आकस बाळगून होते. दधीची त्या यज्ञाची जागा सोडण्याचे ठरवतात. ते बोलतात, "ते अशांची पुजा बांधत आहेत ज्याच्या पुजेने अनर्थ ओढवणार होता आणि ते त्याची पुजा करण्याचे टाळत होते ज्याची खरेतर पुजा झाली पाहिजे. त्यामुळे जे पाप होणार आहे ते नरबळी देण्यासारखे आहे. मी कधी खोटे बोलत नाही व मी जे बोलतो ते खरे होते". येथे जमलेल्या सगळ्या देव आणि ऋषींच्या समक्ष मी हे बोलत आहे. ते सांगतात कीं, लवकरच तो देवांचा देव येथे यज्ञाच्या जागी येणार आहे. तेव्हां समजेल काय होणार आहे. असे दधीची बोलतात. ते ऐकून राजा दक्ष त्यांना उत्तर देतो कीं, त्याच्याकडे अनेक रुद्र शस्त्रसज्ज हजर आहेत. ते एकंदर अकरा आहेत. ते मी सगळे ओळखतो पण हा नवीन कोण रुद्र आहे ज्याच्या बद्दल तुम्ही बोलत अहात. त्यावर दधीची त्याला सांगतात, महेश्वराला न बोलवण्याचे कारस्थान त्यांनी केले आहे. ते असतील अकराजण. मी कोणा रुद्राला ओळखत नाही जो ह्या महादेवापेक्षा श्रेष्ठ असेल. पुढे ते बोलतात की, "हा दक्षाचा यज्ञ पूर्णपणे उध्वस्त होणार आहे हे निश्चित. राजा दक्ष दधीचीला सांगतात, हा पहा कलश आहे ज्यात विष्णूसाठी अर्घ्य आहे ते मंत्राने अभिषिक्त केलेले आहे. कारण, तो सर्वश्रेष्ठ देव आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, त्या सुमारास उमा देवी महादेवाच्या जवळ बसली होती ती विचारते, "त्या काय गोष्टी दानात आहेत"? त्यात व्रत किती आणि तपस्या किती आहेत. मी त्यांची माहिती विचारत आहे कारण माझ्या ईश्वराला त्यात अर्धा हिस्सा मिळाला पाहिजे. ते ऐकून महादेव आनंदाने बोलतात, "तू मला ओळखत नाहीस, यज्ञाच्या देवते बद्दल कसे बोलावयाचे तुला माहीत नाही असें मला वाटते. जे पापमय आहेत ते मला ओळखत नाहीत, तुझ्या मायेमुळें इंद्रासह सगळे भ्रमीष्ठ झाले आहेत. यज्ञात मंत्र बोलणारे माझ्या नांवानी मंत्र बोलत असतात. साम माझ्या स्तुतीचे असतात. ब्राह्मण माझी प्रार्थना करत असतात. सगळे अथर्वयू मला दानं करत असतात. उमा ते ऐकून बोलते, "अगदी सामान्य माणसेसुद्धा त्यांच्या बायकांच्या पुढे स्वताची शेखी मिरवत असतात. त्यात काय मोठेसे आपण केलेत"? ते ऐकून महादेव बोलतात,

"अहो राणीसरकार, मी माझी स्तुती करत नाही. मी ज्याना उत्पन्न करतो ते माझ्यापुढे असतात. हा यज्ञ ज्यामुळें तुला राग आला आहे, तो मी नष्ट करून दाखवतो. असें बोलून तो देवादिदेव त्याच्या मुखातून एक राक्षस काढतो, त्याचे रुप असे भयंकर होते कीं, पहाणार्याचे केस ताठ उभे रहतील. त्याच्या अंगातून ज्वाळा येत होत्या. त्याला असंख्य हात होते व प्रत्येक हातात एक भयंकर शस्त्र होते. ते सगळे भयभीत करणारे दृष्य होते. तो देवाच्यापुढे आज्ञा घेण्यासाठी सज्ज असा उभा होता. महेश्वर त्याला आज्ञा देतात, "जा त्या दक्षाचा यज्ञ उध्वस्थ कर". तो भयंकर दिसणारा राक्षस त्याच्या कांहींच हातांचा उपयोग करून दक्षाच्या यज्ञावर जातो. ती उमाचा क्रोध व्यक्त करत होता. ती त्यानंतर त्या राक्षसाच्या रुपात मिसळून भद्रकलीचे रुप घेऊन त्या यज्ञाचा आणखीन नाश करू लागतात. तो राक्षस साक्षात महेश्वर झाला होता व सगळीकडे विध्वंस करू लागला. त्याच्या त्या रुपाला विरभद्र असें नांव तेथे असलेल्या ऋषींनी दिले. त्याच्यात महाकली आणि महादेव दोघेही होते असें तेथे असलेल्या दृष्ट्या ऋषींना दिसत होते. तो त्या जागी जातो जेथे त्या यज्ञाची तयारी केली जात होती. विरभद्र त्याच्या अंगाच्या छिद्रांतून अनेक पिशाच्च बाहेर काढतो ते रौम्यक जे रुद्रासारखेच होते ते दक्षाच्या यज्ञमंडपात घुसतात. त्यांची संख्या कांही हजाराने होती व ते आकाराने मोठे होत होते. ती सगळी महाकालीची माया होती. त्यांचे ओरडणे बिभत्स होते. त्यांच्या किंकाळ्यानी सगळे जग हादरत होते. दक्षाच्या यज्ञाच्या सामुग्रीची वाताहात होत होती. समुद्राला भरती आली. वादळी वारे वाहू लागले. त्यानी चेतवलेले अग्नी विझण्यास तयार नव्हते. त्यांच्या तेजापुढे सूर्य कमी ठरला. आकाशातील दिव्य ज्योती विझल्यासारख्या झाल्या होत्या. आकाश काळे पडले होते. त्यामुळे रागावलेले रुद्र सगळीकडे आगी लावत सुटले. ते उलटवार करतात विरभद्राच्या रौम्यकांवर. त्यांची लढाई जुंपते. रौम्यक यज्ञाची वाताहात करत असतात. सगळे देव आणि आमंत्रित अचंबित होऊन ते पहात रहातात. कांहीं तेथून निघून जातात. यज्ञासाठी आणलेले खाद्य पदार्थ इतस्ततः फेकलेले दिसत होते. त्यात दुधाच्या नद्या वाहत होत्या. मांसाच्या भरलेल्या हंडी ओतल्या गेल्यामुळे ते सगळीकडे सांडलेले दिसत होते. संमिधा त्या आगीत भडकून जळून गेल्या होत्या. शिजलेल्या धान्याचे डोंगर

पडलेले होते. ते सगळे खाद्यपदार्थ आता ती पिशाच्च खात होती. त्यात चोखावयाचे व चाटावयाचे असे अनेक खाद्य प्रकार होते. मांसाचे विविध खाद्यपदार्थ त्यांच्या घमघमाटाने ती जागा भरून गेली होती. कोणीही पाहुणा आता तेथे थांबला नव्हता. विरभद्राचे ते रौम्यक प्रचंड डोंगरासारखे दिसत होते. देव त्यांच्या स्वर्गीय फौजा घेऊन पळून गेले होते. रौम्यक त्यांच्या सैन्याची व त्यांच्या बायकांची उडवाउडव करत होते. जसे चेंडू फेकावेत. यज्ञदेवतेचे डोके त्यांनी उडवलेले होते व ते पहात ते जोराजोराने हसत होते. त्यावेळी ब्रह्मदेव त्याच्या शक्तींना घेऊन तेथे आला. दक्ष हात जोडून शंकरापुढे उभा होता. तो विरभद्राला विचारतो, "तू कोण आहेस"? विरभद्र बोलतो, "मी रुद्र नाही अथवा ही भद्रकाली त्याची पत्नीसुद्धा नाही. मी येथे यज्ञात भाग घेण्यासाठीसुद्धा आलेलो नाही. उमाच्या रागाची कल्पना तुला देण्यासाठी माझी योजना महारुद्राने केली आहे. मी ह्या ब्राह्मणांना जाणत नाही. ते कोणीही असोत. माझी योजना तुझा यज्ञ नष्ट करण्यासाठी आहे. ते काम मी करत आहे. ही माझी सहचारी जिचे नांव आहे भद्रकाली उमाचे रुप आहे. इतर देवतांचे यज्ञ करण्यास महारुद्राचा विरोध आहे. ते ऐकल्यावर दक्ष नम्रपणे शंकरापुढे वाकून नमस्कार करतो, त्याची कृपा व्हावी अशी याचना करतो. तो प्रार्थना करतो कीं, "मी स्वताला ईशान देवापुढे शरण जातो. जो सगळ्या देवांत श्रेष्ठ आहे जो अनादि अनंत आहे. त्याच्या बरोबरीचा कोणी देव नाही. जो ह्या विश्वाचा कर्ता आहे. दक्ष पूर्णपणे शरण आला आहे व त्याला त्याच्या उर्मटपणाची लाज वाटत आहे हे समजल्यावर तो ईशान देव करूणामय तेथे दिसू लागतो. तो दक्षाकडे एक नजर टाकतो. तो अचानकपणे त्या यज्ञकुंडातून बाहेर येतो . तो सुर्यासारखा चमकत होता.

तो ईशान देव दक्षाकडे पाहून स्मित करतो. त्याला उद्देशून बोलतो, "अरे ब्राह्मणा, मी तुझ्यासाठी काय करावे ते सांग".

दक्ष घाबरलेला असा साश्रूनयनाने बोलतो, "माझ्या पुरोहितांनी जे सांगितले त्याप्रमाणे आपल्याला आमंत्रण दिले नव्हते त्यात कोणताही दुष्ट उद्देश नव्हता. ते सांगतात की, वेदांप्रमाणे तुम्ही यज्ञाचे हिस्सेदार होऊ शकत नाही. तरी जर माझा यज्ञ मोडण्याने महादेव संतुष्ट होत असतील तर ते मला मंजूर आहे. जर माझ्यावर आपल्याला कृपा

करण्याची इच्छा झाली असेल तर एकच करा कीं हे जे तुमच्या विरभद्राने व त्याच्या रौमकांने नष्ट केले आहे ते परत मला मिळावे कारण ते अनेक वर्षाच्या मेहनतीने मी कमावलेले आहे. त्याचा असाच नाश केवळ क्रोध ह्या दोषामुळे होणे तुम्हाला शोभणार नाही. माझी चूक मला दाखवण्याची ही पद्धत आपल्या प्रसिद्धीत बसत नाही. आपण कृपाळू अहात. वेगळ्या पद्धतीने तेंच दाखवता आले असते. जर मी त्या योग्य असेन तर मला एक आशिर्वाद द्यावा. ते ऐकल्यावर तो भगाचे डोळे फोडणारा हर ते मान्य करतो. त्यानंतर दक्ष महादेवाची पुजा करतो. त्यात तो त्याची एक हजार नांव घेतो.
मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अकरावा संपला.

*दक्षाच्या यज्ञाची वाताहत करण्याची हि कथा वेगळी आहे. इतरत्र जी कथा प्रचलित आहे त्यामध्ये पार्वती स्वताला त्या यज्ञकुंडात झोकून देते. त्यानंतर महादेव विरभद्रास त्या यज्ञाचा नाश करण्यास सांगतो, असे कथानक आहे. मी ज्या प्रतीचे भाषांतर करत आहे त्यात जी कथा आहे ती येथे दिली आहे. महाभारताच्या अनेक प्रति आहेत त्याप्रमाणे विविध कथा त्यांतून आढळतात.*

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे बारावा

युधिष्ठीर विचारतो, "आपण मला ती एक हजार नांव महादेवाची जी राजा प्रजापति दक्ष घेऊन महादेवाची पुजा करतो ती सांगाल कां"?
भिष्म बोलतात, ऐक ती नांव ज्यात महादेवाच्या अनेक वैशिष्ट्यांचा उल्लेख झालेला आहे.
दक्ष बोलतो, "मी तुझ्यापुढे शरण येतो. ज्यांने असुरांच्या सेनांचा पराभव केला आहे. तरी त्याची पुजा देव आणि दानव सारख्याच भक्तीने करत असतात. आपल्याला हजार दृष्टी आहेत. तुमचे डोळे घाबरवणारे आहेत. आपण इंद्राच्या ताकदीला मर्यादा घालणारे अहात. आपण यक्षांच्या राजावर कृपादृष्टी ठेवणारे अहात. आपले हात व पाय सर्वदूर पसरलेले आहेत. आपली दृष्टी आणि शिर सगळ्या दिशांना फिरत असते. आपले कानसुद्धा सगळे ऐकू शकतात. आपण स्वतः सुद्धा सर्वव्यापी अहात. आपल्यामध्ये समुद्र सामावलेला आहे. आपले डोळे फार मोठे आहेत. आपण कुंभकर्णी अहात (हजारो वर्षे समाधीत असता). आपले कान गजकर्णी आहेत (सर्वकांहीं ऐकू शकता). अशा आपल्याला माझा नमस्कार असो. आपल्याला शंभर उदरं आहेत. आपल्याला शंभर जिव्हा आहेत. अशा आपल्याला माझे प्रणाम आहेत. गायत्रीचा जप करणारे त्यात तुमची स्तुती करत असतात. सूर्याचे भक्त त्याबरोबर आपलीसुद्धा भक्ती करत असतात. ऋषी आपल्याला ब्रह्म समजतात इंद्र समजतात आणि आकाश समजतात. सगळ्या शुभशक्ती आपल्यात सामावलेल्या आहेत. सागर आणि आकाश आपली रुप आहेत. सगळ्या पंचमहाभूतांच्या देवता आपल्यातून उत्पन्न झालेल्या आहेत. सगळे आदित्य, विष्णू, ब्रह्मा, बृहस्पति आपल्यात सामावलेले असतात. सगळ्या सत् आणि असत् मध्ये आपण असता व त्या आपल्यात असतात. सगळी कारणं, कर्ता आणि परिणाम आपल्यातून व्यक्त होत असतात. उत्पत्ती आणि विनाश आपल्यात आहेत. ज्या तुमच्या रुपांना भव, सर्व आणि रुद्र असें संबोधतात त्या आपल्याला मी शरण जातो. आपण सृष्टीचे कारण अहात. अंधक असुराला मारणार्या आपल्याला माझे

शतशः प्रणाम आहेत. आपल्या तिनही तोंडांना व त्यावरील जटांना माझा प्रणाम असो. ज्याच्या हाती त्रिशूळ आहे अशा आपल्याला मी शरण जात आहे. त्रिनेत्री अशा आपल्याला ज्यांला त्रिंबक म्हणतात त्याला माझे प्रणाम. ज्या आपण असुरांची तीन नगर संपवली त्या आपल्याला माझे प्रणाम. आपल्याला चंड आणि कुंड म्हणतात ज्याला विश्वाचे उगमस्थान समजले जाते तशा आपल्याला माझे शतशः प्रणाम आहेत. आपण संन्याशाच्या दंडात असता, म्हणून आपल्याला कोणी दंडमुंड म्हणून बोलतात त्या आपल्याला माझे प्रणाम. आपण शीव अहात, आपण शुभ अहात. आपण सगळे विश्व व्यापले आहे. आपण नीलकंठ अहात. आपण रक्तवर्णी, पिंगट रंगाचे, कृष्ण वर्णी अहात. आपली कोणाशीही तुलना करता येणार नाही असे अहात. आपण भयंकर अहात. ज्याच्या गळ्यात अनेक सूर्यांची माळा आहे, ज्यांच्या पताकेवर सूर्य चिन्ह आहे अशा आपल्याला माझे प्रणाम. आपण भूतनाथ अहात म्हणून आपल्याला माझे अनेक नमस्कार. आपण शत्रूनाशक अहात. आपण शुद्धीचे प्रतिक अहात. आपण पिनाक धारी अहात. आपले वाहन नंदी आहे, आपल्या अंगावर वल्कलाचे वस्त्रं आहे अशा आपल्याला माझे नमस्कार असोत. आपण सुवर्ण गर्भी अहात. आपल्या भोवती सुवर्ण पसरलेले आहे. अशा आपल्याला माझे नमस्कार असोत. आपण सदैव स्तुत्य अहात म्हणून माझे प्रणाम आहेत. आपण परमात्मा, परमेश्वर अहात. आपण यज्ञ अहात. आपण यज्ञातील अग्नी अहात. आपण वेदांचे मंत्र अहात. आपण विश्वाचे केंद्रबिंदू अहात. आपला झेंडा आहे शूभ्र असे आपण, कारण व परिणाम असे दोनही अहात, अशा तुम्हाला माझे प्रणाम. आपण आनंदमय अहात, आपल्या भोवती अनेक आवाज असतात त्यातून अनेक नाद ब्रह्म उत्पन्न होतात अशा महादेवाला माझा नमस्कार. आपण नृत्यदेव अहात. आपल्या नांदांतून व नृत्यातून अनेक कला विद्या उत्पन्न झाल्या अशा विश्वकर्त्याला माझे प्रणाम. जो तोंडाचा चंबू करून बंम बंम असे आवाज करतो त्या शंकराला माझे प्रणाम. ज्याचे मुख्य वाद्य आहे डमरू त्याला माझे प्रणाम. ज्याने वलाचा नाश केला, जो नद्यांचा व त्यांतील कमळांचा शौकीन आहे, जो काळाचा कर्ता आहे ज्यातून ब्रह्म उत्पन्न झाले अशा देवाला माझे प्रणाम. तो कल्प प्रारंभ करतो, जो विनाश करतो व पुन्हा उत्पत्ती करतो अशा विलक्षण देवाला माझे प्रणाम.

स्मशानाच्या देवा तुला माझे प्रणाम. जो कधी भयंकर तर कधी मनमोहक अशा अनेक रुपात दिसतो त्याला माझे प्रणाम. ज्याचे शस्त्र आहे हाडांचे जो मृत्यूचा प्रारंभ आणि अंत आहे अशा महादेवाला माझे नमस्कार असोत. जो प्रसादात कच्चे आणि शिजलेले असें मांस स्वीकारतो त्या प्रभूला माझे प्रणाम. ज्याच्या आवडत्या वाद्यात वीणा मुख्य आहे अशा हरास माझे नमस्कार. पंचमहाभूतांना राबवणारा, पाऊस पाडणारा, विजा चमकवणारा, वादळं घडवणारा अशा महादेवास माझे प्रणाम. चांगुलपणाचा देव म्हणून ज्याची सगळे पुजा करतात त्या हरास माझे प्रणाम. प्रथमेश असलेल्या महादेवाला माझे मनःपूर्वक प्रणाम. आशिर्वाद देणारा देव जो भोलानाथ म्हणून ओळखला जातो त्याला माझे नमस्कार. सात्त्विकांचे कल्याण करणारा शंकर मला सदैव प्रिय असेल. जो महायोगी आहे व जो सगळ्या योगविद्येचा प्रणेता आहे त्या महादेवाला माझे प्रणाम. जो परमशांतिचा देव आहे जो मृत्यूदेव आहे त्या शीवास माझे प्रणाम. जो भोलानाथ आहे व लवकर प्रसन्न होतो त्या हरास माझे नमस्कार असोत. परा, पश्वंती, मध्यमा आणि वैखरी चारही वाणी त्याने उत्पन्न केल्या त्या योगेश्वराला माझे प्रणाम. ध्वनिमध्ये जो प्रणव आहे त्या शीवाला माझे प्रणाम. तू तुझ्या भक्तांची सगळी पाप खातोस व त्यांना मोक्षाचा मार्ग सुलभ करतोस अशा देवाला माझे प्रणाम. तू तमस, रजस आणि सत्त्व अशा तिनही गुणांचा नियंत्रक आहेस ज्याचे असंख्य गण त्या गुणांची योजना करत असतात त्या महादेवाला माझे प्रणाम, जो अन्न बनून प्राण्यांचे पोटं भरतो त्या अन्नब्रह्माला माझे प्रणाम. ज्याच्या माथ्यावर स्वर्गस्थ गंगा उतरली त्या गंगाधराला माझे प्रणाम. जो प्राणायाम आहे, जो सगळ्यांचा श्वास आहे त्याला माझे नमन आहे. ज्याच्यातून कर्तव्य (धर्म), हित आणि सुखाच्या त्रिवेणी आल्या त्या शंकराला माझे अनेक प्रणाम. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ज्याने दाखवले ज्यातून मोक्षाचा मार्ग सुकर झाला त्या उमापतिला माझे अनेक प्रणाम. सांख्ययोग सांगणार्या महायोग्याला माझे प्रणाम. काळ्या सांबाराचे कातडे वरील अंग झाकण्यासाठी आणि जो सापाचे जान्हवे परिधान करतो तशा योगीराजाला माझे प्रणाम. अरे ईशानदेवा तुझे अंग वज्रासारखे आहे. तू अंबिकेचे अर्धांग आहेस. तू महत आहेस, तू अव्यक्त आणि व्यक्त सृष्टी आहेस. तू इच्छा नष्ट करण्याची प्रेरणा आहेस ज्यामुळे योगी साधना करू

शकतात. तू अनंत आहेस तू मोक्ष मार्ग आहेस. तू तपस्या मूर्ती आहेस ज्या कडून सगळे तपस्वी प्रेरणा घेतात. तू ज्वर निर्माण केला ज्यामुळे वृत्राचा नाश झाला त्या ज्वरदेवाला माझा नमस्कार असो. तूंच वायू आणि तूंच अग्नी आहे, अहो देवादिदेवा तुझ्या कृपेची आस धरणार्यांना तू कधी नाराज करत नाहीस अशा महादेवा मी तुला नमन करतो. तू चराचरांचा स्वामी आहेस कारण तू त्यांच्यात आहेस. तूंच ब्रह्म आणि तूंच विष्णू आहेस. सगळ्या सृष्टाचा तू निर्माण करता आणि विनाश करता सुद्धा आहेस. तू मनाचा ध्राता आहेस. तू दरिद्रीपणा आणि तूंच वैभवसुद्धा आहेस. अध्यात्मिक उर्जा तू आहेस. तूंच चैतन्याचे बीज आहेस. तू अंडज, गर्भज, पंकज (चिखलातून उत्पन्न होणारे क्षुद्र जीव) आणि वनस्पति अशा चार श्रेणीतून जीवसृष्टी प्रारंभ केलीस. तूंच ज्वराचे विषाणू वृत्राला मारण्यासाठी तयार केलेस ते त्यानंतर सगळ्या जीवांना मृत्यू देण्याचे कार्य करत आहेत. ते सगळे तुझ्या इच्छेनेच होत असते अशा महादेवाला माझा प्रणाम. तूंच ॐकार आहेस. ब्रह्माचा जप करणारे तुझेच नांव जे हर हर, हरी हरी, हय हरी, हुव हरी असें जपत असतात ते तुझ्यात एकरुप होतात त्या हराला माझा नमस्कार असो. तू यजूंमध्ये, ऋचांमध्ये, सामांमध्ये सामावलेला आहेस. तू यज्ञाचा अग्नी आणि संमिधा आहेस. तू वेद आणि उपनिषद आहेस. तू चार वर्णांत (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र) असतोस कारण ते समाजाचे चार खांबे असतात. त्यातील एक खांबा जरी कमकुवत झाला तरी समाज व्यवस्था कोलमडून पडते, जे त्यांचे संरक्षण करतात ते तुझे भक्त होतात. तू चार आश्रम (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वनप्रस्थ आणि सन्यास) दिले त्यातील गृहस्थाश्रम तू श्रेष्ठ ठरवलास कारण त्यामुळे जगरहाटी चालत असते. अशा व्यवस्थेमुळे मोक्ष मार्ग सुकर झाला. तूंच विचार सागराचे विचार असतोस ज्यामुळे माणसास ज्ञान प्राप्ती होते. तू शस्त्र तयार केलेस. तू इच्छा आहेस आणि तूंच औदासिन्य आहेस. तूंच न्याय आणि अन्यायसुद्धा असतोस अशा माझ्या प्रिय भगवंताला माझे शतशः प्रणाम. तूंच यश आणि अपयश आहेस ते ज्यांना समजले ते मुक्त होतात. अशा महादेवाला माझा नमस्कार. सगळ्या सजीवांचे व निर्जीवांचे मूळ आहेस. सगळे रंग तुझ्यातून आले आहेत. तरी तूं स्वतः रंगहीन असतोस. तू सगळ्या देवांत असतेस तसा सगळ्या दैत्यात, असुरात आणि दानवातसुद्धा असतोस. तू

मानवातसुद्धा असतोस. तू माझ्यात आहेस म्हणून मी तुझी प्रार्थना करतो. तू ग्रहगोल आहेस, तू नक्षत्र आहेस, तू वडवानल आहेस, तू ग्रहांचे ग्रहण आहेस, तू चित्रभानू नांवाचा अग्नी आहेस. यज्ञातील अग्नी तू आहेस त्यावर ओतले जाणारे तुप तू आहेस. ते जळतांना त्यातून येणार्या ज्वाळा तू असतोस असा तू सर्वस्व आहेस. तुझ्या शिवाय कांहीं नाही म्हणून मी तुझी पूजा करत आहे. तू पावित्र्य आहेस, तू चित्त आहेस, तू शरीराचा जीव असतोस. तू नित्य असलास तरी मायेच्या प्रभावात तू मर्त्य सुद्धा होत असतोस अशी तुझी माया विलक्षण आहे. ते पांच वायू (प्राण, अपान, समन, उदान, व्यान) ज्यामुळें सजीव जगतात, ते तुझी रुप आहेत. तू मासे आहेस व त्यांना जाळ्यात पकडणारा मासेमारीसुद्धा तूंच आहेस. तू गति आणि स्थब्धता असतोस. गरजेनुसार ते होत असतात. तू मारतोस व तूंच मरत असतोस. तूंच तलवार आणि ढाल सुद्धा आहेस. तू माया निर्माण केली आहेस व त्यात तूंच गुंतला आहेस. तू यज्ञातील स्वाहा आहेस, तूंच प्रणव सुद्धा असतोस. तू राजा असतोस व तूंच प्रजा आहेस. तू कलाकार आणि तूंच त्याची कला आहेस. तू भागाचे डोळे फोडलेस व तूंच पुशानचे दात पाडलेस. तू सजा करतोस व ती तूंच भोगत असतोस. तू मित्र आणि तूंच शत्रू असतोस. तू नंदी आहेस व तूंच मारुती आहेस. तुला महाप्रसवा बोलतात. तू चंद्रधर आहेस. तू पिशाच्चांचा स्वामी आहेस. तूंच गोविंद आहेस, तू इंद्रियाना समजत नाहीस कारण तू अव्यक्त असतोस, तुला समजण्यासाठी अंधश्रद्धा असावी लागते. तू विवेकाने समजत नाहीस म्हणून जे केवळ विवेक मानतात ते तुला समजू शकत नाहीत व म्हणून ते तू नाहीस असे समजतात. तू अमृत आहेस व जहरसुद्धा (हलाहल) आहेस. तू युद्धातील जय आणि पराजय असतोस. कोणी जय मांगतो तर कोणी पराजय परंतु, ते दोनही तूंच आहेस ते त्यांना समजत नाही. तूंच सुख आणि दुःख आहेस. तू नर आहेस व नारीसुद्धा म्हणून तुला अर्धनरीनटेश्वर असें म्हणतात. तुला कोणी खर्या अर्थाने समजू शकत नाही. कारण तू मायेबाहेर असतोस व तुला समजण्याचा प्रयत्न करणारे मायेच्या भ्रमात गुंतलेले असतात. जे त्या भ्रमातून बाहेर येतात तेंच तुला समजू शकतात. तूंच स्वयंभू आहेस, तूंच मनस आहेस आणि तूंच महत आहेस. तुझी अनेक रुप आहेत ज्ञानी ऋषीनी तुला ज्या रुपात अजमावले ते

रुप तुझे ते सांगतात वेदात पण तुझे सत्य रुप कधीच कोणाला अजमावता येत नाही. कारण तू अव्यक्त असतोस. तुला समजण्यासाठी त्याला स्वताला अव्यक्त अवस्थेत जावे लागते. मी शरण जातो त्या जटाधारी यतीला ज्याचे उदर मोठे आहे. त्याचे कमंडलू त्याच्या मागे लावलेले आहे जो ब्रह्माचा आत्मा आहे. तोंच विचारसागराचा आत्मा आहे. राहूचे तोंड धरणारा आणि सोम पिणारा अशा स्वरभानू माझे संरक्षण कर. आता सांगतो मी तुला कां माझ्या यज्ञास आमंत्रण दिले नाही ते समजून घे. अहो रुद्र, आपण सगळ्या सृष्टीचे कारण असता, आपण सगळ्या जीवांतील आत्मा अहात, म्हणून मी तुम्हाला ह्या यज्ञात बोलावले नाही. आपण असे अहात कीं ज्याची पुजा सगळ्या यज्ञात होत असते. पुष्कळ दानं दिली जातात, अहो महादेव, आपल्या मायेने मी भ्रष्ट बुद्धी झालो होतो. मला क्षमा करा व माझे नुकसान भरून द्या. जे तुमच्या मायावी विरभद्राने व भद्रकालीने केले आहे त्यांच्या रौम्यकांच्या मदतीने. तुमच्या मनात जो गैरसमज झाला आहे तो कृपया दूर करून माझ्यावर कृपा करा.

ती स्तुती ऐकून महादेव त्याच्यावरील क्रोध काढून टाकतात. महादेव कोणाचे उगाचच नुकसान करणारे नाहीत. ते ममतेच्या सुरात बोलतात, "अरे दक्षा, तू चांगला तपस्वी आहेस, तू माझी जी स्तुती केली आहेस त्यामुळे मी प्रसन्न झालो आहे. आता आणखीन कांहीं बोलू नकोस. तू माझ्या सोबतीत राहू शकतोस. माझी कृपा तुझ्यावर असेल. तुझा हा यज्ञ मी नष्ट केला म्हणून मी तुला नुकसान भरपाई म्हणून हजार अश्वयज्ञ आणि शंभर वाजपेयी यज्ञ ह्यांचे फळ देत आहे. पुढे महादेव बोलतात कीं गेल्या कल्पात सुद्धा मी तुझा असांच एक यज्ञ उध्वस्त केला होता. मी तुला आणखीन दुवा देणार आहे त्यामुळे ह्या यज्ञाची भरपाई होईल. आता तू नाराज होऊ नकोस. माझी कृपा झाली आहे. तुमचे दानव वेदात दिलेल्या तपस्या करून पुष्कळ पुण्य जमवून राहीले आहे. ते त्याच्या बळावर मोक्ष मिळवू शकतात. इंद्रीयसंयमनाने ते अनेक सिद्धी मिळवू शकतात. पुढील काळात. अरे दक्षा, मी पशुपत लोक तयार केला आहे. तेथे तू जा. तुझ्या मनातील किल्मिष काढून टाक कीं, मी तो यज्ञ उध्वस्थ केला आहे. कोणतीही द्वेषाची भावना नसावी म्हणजे मी तुला त्या लोकांत ठेवीन. असे बोलून महादेव उमा व त्यांचे सहकारी तेथून अंतर्धान पावतात.

जे हे आख्यान ऐकतील अथवा वाचतील त्यांना दीर्घ आयुष्य मिळेल. हे आख्यान श्रुतीच्या योग्यतेचे आहे. ज्यांना ऐहिक जीवनात प्रसिद्धी, सौख्य आनंद पाहिजे त्यानी हे आख्यान नेहमी वाचावे. रोगराई, दुर्धर आजार अशा सगळ्या आपत्तीपासून त्यांची सुटका होईल. तसेंच राजाची अवकृपा, धंद्यातील नुकसान हे आख्यान नेहमी ऐकल्याने नाहीसे होईल.

राक्षस बाधा, भूतबाधा, विनायकांची बाधा, घरात संकट असे सगळे संपेल.

जी बाई ब्रह्मचर्य पाळत हे आख्यान नेहमी वाचत असेल तिचे सगळे प्रश्न आपसुकपणे सुटतील. तिच्यावर उमेची कृपा होईल. नवर्याची मर्जी संपादन होईल. जो कोणी हे आख्यान मनोभावे वाचत असेल त्याचे सगळे ऐहिक प्रश्न निकालात निघतील ज्यामुळे त्याचे जीवन संमृद्ध होईल. महादेवाला प्रसन्न करण्यासाठी हे आख्यान उत्तम आहे. त्याच्या वाचनाने आणि ते इतरांना सांगण्याने जर त्याचवेळी तो इंद्रियसंयमन करत असेल तर त्याला महादेव, उमा, गुह (कार्तिकेय), नंदी असे सगळे त्याच्यावर प्रसन्न होतील. असे लोक त्यांच्या मृत्यूनंतर सरळ मोक्षाकडे जातील. कारण त्यांच्या वासना संपलेल्या असतील. असे व्यासमुनी सांगत होते असे भिष्म युधिष्ठीराला सांगतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बारावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे तेरावा

युधिष्ठीर विचारतो, "माणसाच्या जीवनात अध्यात्म कसे काम करते ते सांगा".
भिष्म सांगतात, अध्यात्मविद्या जर तू शिकलास तर ते तुला व्यवस्थितपणे समजेल. ती विद्या सगळ्या विद्यांमध्ये श्रेष्ठ आहे. मी माझ्या समजूतीनुसार ते सांगण्याचा प्रयत्न करणार आहे ते तू ऐक. पंचमहाभूत पृथ्वी, वायू, अवकाश, पाणी, प्रकाश आहेत हे तुला माहीत आहे. त्यांच्यातून सगळ्या चरांचराचे जन्म व मृत्यू होत असतात. सजीवांची दोन शरीर आहेत एक सुक्ष्म आणि दुसरे स्थूल आहे. स्थूल शरीर व्यक्त असते म्हणून ते दिसते. सुक्ष्म शरीर अव्यक्त असते ते दिसत नाही. त्याला शास्त्रीय भाषेत लिंगदेह असें म्हणतात. ती दोन शरीरं त्या पंचमहाभूतांच्या विविध रचनांतून तयार होतात असें समजले जाते. जेव्हां जन्म होतो तेव्हां त्या पंचमहाभूतांच्या विशिष्ट रचनेतून तो गर्भ तयार होत असतो त्यासाठी त्याबाबतचे नियम त्यांच्या रचनेला कारणीभूत असतात. जेव्हां मृत्यू होतो तेव्हां त्या शरीराचे विघटन होऊन त्या शरीराच्या भागांचे त्या पंचमहाभूतात पुन्हा रुपांतर होत असते. जल भाग सृष्टीतील पाण्यात जातो. पृथ्वी भाग मातीत मिसळतो. वायू भाग वातावरणात जातो आणि अग्नी सृष्टीच्या उष्णतेत मिसळतो, आकाश तसेंच अव्याप्त अवस्थेत रहाते. अशारितीने त्या व्यक्त शरीराची विल्हेवाट होत असते. अव्यक्त शरीर त्याच्या अव्यक्त भूतात (हा सहावा अव्यक्त महाभूत आहे, त्यालाच अध्यात्मिक उर्जा असें समजतात जी चैतन्यमय असते.) विलिन होत असतो. विधाता त्या रचना त्या त्या जीवांच्या आवश्यकते नुसार करत असतो. माणसाला जी ज्ञानेंद्रियं दिली आहेत त्याप्रमाणे जे समजते ती त्याची जाण असते व त्यानुसार तो त्याच्या भोवतीच्या सृष्टीचा अर्थ काढत असतो. हे सगळे ज्या मूळ अध्यात्मिक उर्जेच्या मदतीने होत असते त्याच्या कमी जास्त होण्यानुसार त्या माणसाचे गुण सिद्ध होत असतात. त्या गुणांच्या कार्यात जे अव्यक्त विचार सूत्र काम करते त्यात मन, बुद्धी आणि आत्मा आहेत. त्यातील मन व बुद्धी शरीराच्या कामात मदत करत असतात. त्यात लिंगदेह जे त्या आत्म्याचे गत जन्माचे कर्मविपाक आहेत ते ढवळाढवळ

करत असतात. अशारितीने त्या माणसाचे शरीर काम करत असते. हे सगळे व्यक्त आणि अव्यक्त एकमेकांशी संयोगाने काम करत असतात. माणसाच्या जन्माचा प्रमुख उद्देश त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवत नेणे असा असतो. साधारण अध्यात्मिक उर्जा असेल तर तो रजोगुणी समजला जातो. उच्च दर्जाची असेल तर तो सात्विक समजला जातो आणि सामान्यापेक्षा कमी असेल तर तो तमोगुणी समजला जातो. त्यातील आत्म्यास क्षेत्रज्ञ म्हंटले आहे व शरीराला क्षेत्र समजले जाते. मन कल्पनारम्य विचार वाढवते त्याउलट बुद्धी तर्क शुद्ध विचार करत असते. त्या दोन प्रकारच्या विचारांतून मनुष्य त्याचे जीवनाचे कार्य करत असतो. ज्ञानेंद्रियांच्या कडून जे समजते त्याचा अर्थ मन कल्पनाविलासाने लावते. त्याच वेळी बुद्धी तर्कशुद्ध अर्थ काढत असते. अशाप्रकार ज्ञानेंद्रियांच्या कडून आलेली माहीती समजून घेण्याचे काम जीव करत असतो. हा जीव त्या शरीराची कार्यकारी प्रेरणा असते जी अव्यक्त असली तरी सगळ्या व्यक्त गोष्टींमध्ये कार्यरत असते. जीव त्या शरीराचा भाग असतो. मन व बुद्धी त्याच्या द्वारे कामं करत असतो. मन आणि बुद्धी जसे अर्थ काढतात त्याप्रमाणे त्या जाणीवांतून सूख अथवा दुःख त्याला प्राप्त होत असते. त्याशिवाय मन त्याच्या कल्पनानेसुद्धा सुख अथवा दुःख उत्पन्न करत असते. ते सगळी मनाचे खेळ असतात. म्हणून प्रत्यक्षात वास्तवात सुख आणि दुःख असे कांहीं नसते. त्या मनाच्या कल्पना असतात. त्या सुख अथवा दुःख ह्यात माणसाचा आत्मा गुंतला तर अनेक प्रश्न उत्पन्न होतात. अध्यात्मविद्या ते शिकवते कीं, ज्याअर्थी सुख आणि दुःख केवळ काल्पनिक आहेत त्यात क्षेत्रज्ञाने स्वताला गुंतून घ्यावयाचे नसते. जो त्यात न गुंतता राहू शकतो त्याला शहाणा असें समजले जाते. जे त्यात गुंततात व त्यानुसार पाप अथवा पुण्य कर्मात अडकतात ते रजोगुणी किंवा तमोगुणी समजले जातात. अशारितीने काल्पनिक गोष्टींत न रमण्याचे संस्कार अध्यात्मविद्या देत असते. एकदा ते संस्कार धृढ झाले कीं तो आत्मा (त्या माणसाचा) अध्यात्मिक प्रगतीकडे जाऊ लागतो. तो सुखाच्या मागे जात किंवा दुःखाच्या पासून दूर जाण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी शरीराच्या विविध गरजा पुरवतांना त्यात न गुंतता आत्मा फक्त शरीराला अध्यात्मिक शक्ती देण्याचे काम करत असतो. आत्म्याने शरीराच्या गरजांपासून मुक्त कसे रहावयाचे ते अध्यात्मविद्या शिकवते. त्यात निरिच्छा,

औदासिन्य, इंद्रिय संयमन, ब्रह्मचर्य, आत्मसंतुष्टता असे विविध योग त्याला साध्य करावयाचे असतात. त्यानंतर मन व बुद्धी विशिष्ट शिस्तीत काम करावे म्हणून कांहीं योग शिकवले जातात. त्यात जप साधना, विपाशना, ध्यान साधना, तपस्या असे बरेच येतात. त्याशिवाय अध्यात्मविद्या विश्वातील इतर शक्ती ज्यांना देवता म्हणतात त्यांना कसे मदतीस बोलवायचे ते शिकवले जाते. त्या भागाला आगम विद्या असे म्हणतात. त्या महादेवानी, विष्णूनी, गणपतीनी अशा अनेक देवतांनी सांगितले आहेत. त्यात यज्ञ करण्याचे तंत्र आहे. त्याशिवाय इतर सोपे मार्ग शिकवले जातात. त्यातून कर्मकांड शिकवले जाते. माणसाच्या इच्छा कशा उत्पन्न होतात त्याचे विवरण त्यात असते. शरीराच्या नित्य गरजा आणि प्रासंगिक गरजा ह्या त्या जीवाला पूर्ण कराव्या लागतात परंतु, त्यात आत्म्याने कसे न गुंतता त्याना सहाय्य करावयाचे ते शिकवले जाते. त्या करतांना जीवाला अहंकार होतो तो त्याला ते सहा दोष वाढवण्यास भाग पाडतो. म्हणून अहंकार हा माणसाचा एक समाईक दोष आहे त्याचे नियंत्रण कसे करावे ते अध्यात्म विद्या शिकवते. अहंकाराची सहा लक्षणं (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) अध्यात्मविद्या शिकवते कीं, ज्यामुळे सुख अथवा दुःखा पेक्षा समाधानात कसे रहावयाचे. त्याशिवाय सत्पात्र संबंध आणि अपात्र संबंध ह्याचे परिणाम कसे माणसाच्या अध्यात्मिक प्रगतीत प्रभाव टाकत असतात ते पाहिले जाते. सर्वच गोष्टी केवळ ज्ञानेंद्रियाने प्राप्त होत नाहीत. त्या करता इतरांकडून (गुरू, वाचन, चर्चा, वेद, उपनिषद) ते घ्यावे लागते. त्याचा अभ्यास व गुरूकृपा सुद्धा त्यात येतात. मनुष्य जीवनाच्या (स्वताच्या व इतरांच्या) निरीक्षणातून बरेच शिकत असतो ते सुद्धा अध्यात्म विद्येत येते. माणसातील अनेक दोष त्याच्या इतरांशी स्वताची तुलना करण्यामुळें येतात त्यासाठी ते कसे व कां टाळावे ते अध्यात्मविद्या शिकवते. चांगुलपणा, माणूसकी आणि भुतदया ह्या त्रिसुत्रीच्या मदतीने पुण्य कसे मिळवावयाचे ते त्यात दिले आहे. अज्ञान व ज्ञान ह्याच्यामुळे होणारे प्रश्न त्यात पाहिले जातात. जसे त्याचे त्यात शिक्षण पूर्ण होते तो योगी होऊन मोक्षमार्गाकडे जातो. मोक्ष धर्म पर्व भाग एकशे तेरावा संपला.

## - महाभारत शांती पर्व भाग सातवा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चानें शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

## ई साहित्य  प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून  देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,